
सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | शनिवार, १० जानेवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३११ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला कार्य विस्ताराच्या दृष्टीने योजना तयार करताना एक गोष्ट अवश्य ध्यानात घेतली पाहिजे की, गेले वर्षभर आपले कार्य समाजव्यापी आणि सर्वस्पर्शी होण्याच्या दिशेने कुठपर्यंत अपुरे राहिले आहे? आणि हा अपुरेपणा राहू नये यासाठी आगामी वर्षात कशा प्रकारची योजना आखावी लागेल? केवळ शाखा, उपशाखांचे उद्दिष्ट पूर्ण करून चालणार नाही.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# लालू कुटुंबाचे पाय खोलात

**नोकरीच्या बदल्यात जमीन प्रकरण** | **दोन्ही पुत्र, कन्यांसह ४० जणांवर आरोप निश्चित**

◆ **पाटणा, ९ जानेवारी**

नोकरीच्या बदल्यात जमीन प्रकरणात लालू कुटुंबाच्या अडचणी वाढल्या आहेत. न्यायालयाने लालू यादवांच्या कुटुंबावर आरोप निश्चित केले आहेत. एकूण ४० लोकांवर आरोप निश्चित झाले आहेत. या लोकांवर आता खटला चालेल. यात न्यायालयाने ५२ लोकांना निर्दोष मुक्त केले आहे.

सुनावणीसाठी शुक्रवारी लालू यादव यांची मोठी मुलगी मीसा भारती आणि मुलगा तेजप्रताप दिल्लीतील राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात पोहोचले. हे प्रकरण केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) द्वारे दाखल करण्यात आले आहे. न्यायालयाने पुराव्यांच्या आधारे हे स्वीकारले आहे की लालू यादव यांच्या विरोधात लावलेले आरोप योग्य आहेत. या आधारावर आता त्यांच्या विरोधात या प्रकरणाचा खटला चालेल. खटल्यात युक्तिवाद होईल, त्यानंतर यावर अंतिम निर्णय दिला जाईल. तर, लालू यादव कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करू शकतात.

मागील सुनावणीदरम्यान, सीबीआयने न्यायालयात एक पडताळणी अहवाल सादर केला, ज्यात नमूद केले होते की आरोपपत्रात नमूद केलेल्या १०३ आरोपींपैकी पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तपास संस्थेने लालू प्रसाद यादव, त्यांची पत्नी आणि बिहारच्या माजी मुख्यमंत्री राबडी देवी, पुत्र तेजस्वी यादव यांच्यासह इतरांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. (वृत्तसंस्था)



लालू यादव | राबडीदेवी | तेजस्वी | तेजप्रताप | मिसा भारती | हेमा यादव

### लालूंच्या मुलींवरही आरोप

**सीबीआयने या प्रकरणात केवळ लालू आणि त्यांच्या मुलांवरच नाही, तर त्यांच्या मुलींवरही आरोप ठेवले आहेत. विशेषतः खासदार मीसा भारती आणि हेमा यादव यांच्याविरोधातील आरोपपत्रानुसार त्यांनाही नाममात्र किमतीत जमीन हस्तांतरित करण्यात आली होती.**

# व्यापार करारासाठी भारताकडून प्रतिसाद नाही

**अमेरिकेच्या वाणिज्य सचिवाचा दावा** | **ट्रम्प यांच्यासोबत मोदींनी चर्चा करणे टाळले**

◆ **वॉशिंग्टन, ९ जानेवारी**

भारतासोबतचा व्यापार करार कोणत्याही धोरणात्मक वादामुळे थांबलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत चर्चा करणे टाळल्याने करार रखडला. ट्रम्प यांना मोदींनी स्वतः त्यांच्याशी बोलून करार अंतिम करावा असे वाटत होते, परंतु असे न झाल्याने राष्ट्राध्यक्ष दुखावले असा दावा अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी शुक्रवारी केला.

एका पॉडकास्टमध्ये लुटनिक यांनी म्हटले की, भारतासोबतचा व्यापार करार जवळपास पूर्ण झाला होता. भारताला अंतिम चर्चा करण्यासाठी तीन आठवड्यांचा अवधी देण्यात आला होता. ट्रम्प स्वतः तो पूर्ण करू इच्छित होते. यासाठी मोदींना राष्ट्राध्यक्षांना फोन करायचा होता. मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. आम्हाला वाटले की भारतासोबत करार आधी होईल, पण मोदींनी फोन न केल्यामुळे आम्ही इंडोनेशिया, फिलिपाईन्स आणि व्हिएतनामसोबत व्यापार करार केला. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर यांनी मुदत संपण्यापूर्वी स्वतः ट्रम्प यांना फोन केला आणि दुसऱ्याच दिवशी कराराची घोषणा झाली. मात्र भारताच्या पंतप्रधानांनी असे केले नाही, पर्यायाने त्यांना फटका बसला. भारतासोबत ज्या अटी आधी ठरल्या होत्या, त्या आता संपुष्टात आल्या आहेत. अमेरिका आता त्या व्यापार करारातून मागे हटला आहे. जर आता चर्चा झाली, तर भारताला कदाचित कठोर अटींसह करार करावा लागेल. (वृत्तसंस्था)

### ट्रम्प यांचे मानसिक संतुलन ढासळले : सॅक्स

भारतावर ५०० टक्के शुल्क लावण्याच्या मुद्द्यावर बोलताना अमेरिकेचे अर्थतज्ज्ञ जेफ्री सॅक्स म्हणाले, ट्रम्प यांचे मानसिक संतुलन ढासळले असून, त्यांना उपचाराची आवश्यकता आहे. भारतावरील व्यापार शुल्क वाढविल्यास अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचेच नुकसान होईल. ट्रम्प यांच्यामुळे देशाची आर्थिक परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. अशातच भारतावरील शुल्कात वाढ केल्यास आणि निर्बंध लादल्यास मोठे आर्थिक संकट ओढवू शकते.

### बजाज समूहाचा कारभार आता संपूर्ण भारतीय

**नवी दिल्ली** : भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रातील एक ऐतिहासिक भागीदारी आता संपुष्टात आली आहे. बजाज फिनसर्व्हने आपली जर्मन भागीदार कंपनी अलायन्झ सोबतचा २४ वर्षांचा जुना संबंध अधिकृतपणे संपवला आहे. बजाज समूहाने अलायन्झचा २३ टक्के हिस्सा तब्बल २१,३९० कोटी रुपयांचा खरेदी केला असून आता दोन्ही विमाकंपन्यांचे पूर्ण नियंत्रण बजाजच्या हाती येणार आहे. बजाज जनरल इन्शुरन्सने अलायन्झचा २३ टक्के १२,१९० कोटी रुपयांना खरेदी केला. तर बजाज लाईफ इन्शुरन्सने अलायन्झचा २३ टक्के हिस्सा ९२०० कोटी रुपयांना खरेदी केला. या व्यवहारामुळे बजाज फिनसर्व्हची दोन्ही कंपन्यांमधील मालकी ७४ टक्क्यांवरून ९७ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. उर्वरित तीन टक्के हिस्सा येत्या जुलैपर्यंत शेअर बायबॅकच्या माध्यमातून पूर्ण केला जाईल.

# वैरागमध्ये भाजपचा शक्तिसोहळा : शेकडो कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.९ जानेवारी-**

बार्शी नगरपरिषद आणि बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नूतन सभापती, उपसभापती व सर्व संचालकांचा नागरी सत्कार समारंभ आज दि.९ जानेवारी रोजी वैराग येथे पार पडला. यावेळी माजी ग्रामपंचायत सदस्य अरुण सावंत यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश केला. या सोहळ्याने वैरागच्या राजकीय वातावरणात मोठी खळबळ उडवून दिली आहे.



शिवशक्ती तालीम संघ, जय हनुमान तरुण मंडळ, भुसार गल्ली आणि समस्त वैरागकरांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी चंदूभाऊ तावस्कर होते. यावेळी माजी आमदार राजाभाऊ राऊत, वैरागचे नेते संतोष निंबाळकर, बाजार समितीचे सभापती विजय गरड, उपसभापती बाबा गायकवाड, अरुणभाऊ कापसे, अनिल काका डिसले, सदानंद गाडे, भाजप तालुकाध्यक्ष मदन दराडे, अरुण सावंत, झुंबर जाधव, सुरेश गुंड, अभिजित कापसे, रामेश्वर पाटील, विवेक ताकभाते, नेताजी घायतिडक, भरतेश गांधी, प्रवीण गायकवाड, साहेबराव देशमुख, बाबासाहेब कापसे, गजेंद्र मुकटे, वैजिनाथ आदमाने, श्रीशैल्य भालशंकर, उद्योजक शीतल गांधी, सुरेश घोडके यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**विकासाचा 'रोडमॅप': आमदार राजाभाऊ राऊत यांची मोठी घोषणा**

कार्यक्रमात बोलताना राजाभाऊ राऊत यांनी वैरागच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या. वैरागसाठी स्वतंत्र तहसील कार्यालयाचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून लवकरच त्याला मंजुरी मिळेल. तसेच, वैराग आणि परिसराचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी 'अमृत-२' योजनेतून पाठपुरावा सुरू आहे. ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले असून, त्यासाठी १४ ते १५ कोटींच्या निधीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. यामुळे गोरगरीब रुग्णांना हक्काचे उपचार गावातच मिळतील. एमआयडीसीच्या माध्यमातून वैरागचे नाव संपूर्ण राज्यात लौकिक करू, असे आश्वासन दिले. यावेळी नूतन सभापती विजय गरड, उपसभापती बाबा गायकवाड आणि सर्व संचालकांचा वैराग ग्रामस्थांच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला. अरुण सावंत यांच्या भाजप प्रवेशामुळे वैराग भागात भाजपची ताकद वाढली असल्याचे चित्र होते.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बॅलेट व कंट्रोल युनिट स्ट्राँग रुमकडे रवाना

**३४९४ बॅलेट युनिट तर १३६५ कंट्रोल युनिटचा समावेश**

**विविध ७ निवडणूक निर्णय अधिकारी निहाय युनिट यंत्रणा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी महापालिका कौन्सिल हॉल इमारतीच्या ठिकाणी असलेल्या मुख्य स्ट्राँग रूम मधून विविध ठिकाणच्या निवडणूक निर्णय अधिकारी स्ट्राँग रूम कडे ३ हजार ४९४ बॅलेट युनिट आणि १ हजार ३६५ कंट्रोल युनिट पोलीस बंदोबस्तात आज पाठवण्यात आले.

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची जय्यत तयारी महापालिका प्रशासनाकडून सुरू आहे.



सोलापूर शहरात विविध सात निवडणूक निर्णय अधिकारी अंतर्गत विविध सात ठिकाणी मतदान आणि मतमोजणी होणार आहे. सोलापूर महापालिका आवारातील कौन्सिल हॉल इमारतीच्या खालील मुख्य स्ट्राँग रूम मधून बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट अशी यंत्रणा आज दिवसभरात विविध निवडणूक निर्णय अधिकारी स्ट्राँग रूम कडे पाठविण्यात आले आहेत. सोलापूर शहरातील वेलणकर हॉल दयानंद कॉलेज, सिंहगड कॉलेज, शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर, कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय इमारत, विलासचंद मेहता माध्यमिक प्रशाला, नर्सरी फुलपाखरू कलादालन नूतन मराठी विद्यालय, शहीद राहुल शिंदे बहुउद्देशीय सभागृह, एसआरपीएफ कॅम्प येथील ईव्हीएम स्ट्राँग रूम कडे हे बॅलेट व कंट्रोल युनिट हे ट्रक मधून पाठविण्यात आले, अशी माहिती नियंत्रण अधिकारी तपन डंके यांनी दिली.

> विविध निवडणूक निर्णय अधिकारी स्ट्राँग रूम कडे पाठविलेले अनुक्रमे बॅलेट आणि कंट्रोल युनिट या प्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी (आरओ) क्रमांक एक येथे ५०० बॅलेट युनिट २०० कंट्रोल युनिट, आरओ २ - ५७० /२१०, आरओ ३ - ४३८ /१८९, आरओ ४ - ३९३/१९७, आरओ ५ - ५५५/२००, आरओ - ६ - ३६३/१४९, आरओ ७ - ६७५/२२० युनिट असे एकूण ३ हजार ४९४ बॅलेट युनिट आणि १ हजार ३६५ कंट्रोल युनिट पोलीस बंदोबस्तात पाठविण्यात आले आहेत. त्या त्या ठिकाणच्या स्ट्राँग रूममध्ये हे युनिट्स ठेवण्यात येणार आहेत. त्यानंतर १४ जानेवारी रोजी संबंधित मतदान केंद्रावर पाठविण्यात येतील. हे सर्व युनिट्स सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्यासह रवाना करण्यात आले आहेत. महापालिकेतील हे युनिट ७० मजुरांच्या सहकार्यातून ट्रक मध्ये ठेवण्यात आले. उपअभियंता तपन डंके यांच्या नियंत्रणाखाली कर्मचारी व संबंधित अधिकाऱ्यांनी मोजून व तपासणी करून हे युनिट्स वितरित केले.

## महत्वाचे...



### जिल्हा परिषद सीईओ कुलदीप जंगम यांची मार्डी गावास भेट! कामकाजाचा घेतला आढावा

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत विविध कामाचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी मार्डी येथे भेट देऊन येथील विविध विकासकामांचा आढावा घेतला आणि समाधान व्यक्त केले. यावेळी उत्तर सोलापूर गट विकास अधिकारी राजाराम भोंग, विस्तार अधिकारी शिंदे, उपसरपंच कांतीलाल मार्तंडे, काशिनाथ कदम, युवराज पवार, गणेश पवार, अझर शेख, संजय इनामदार, अरुण मुडके व सर्व प्रशासकीय कर्मचारी वर्ग उपस्थित होता. सीईओ जंगम यांनी ग्रामविकास अधिकारी नंदकुमार पाटील, सरपंच प्रांजली पवार यांच्यासोबत गावामध्ये या अभियानांतर्गत होत असलेल्या विविध कामाची पाहणी केली. अंगणवाडी सेविका प्राथमिक आरोग्य केंद्र येथील सर्व डॉक्टर व कर्मचारी तसेच जि.प. प्राथमिक शाळा, मराठी व उर्दू शाळांच्या प्रगतीपथावर असलेल्या कामाचा तपशील मुख्याध्यापकांकडून घेतला. त्याचबरोबर मार्डी गावातील आशा वर्कर, महिला बचत गट यांच्याही कामकाजाचा आढावा यावेळी घेतला. यावेळी जंगम यांनी ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी कशाप्रकारे देता येईल, त्याचबरोबर सुशासन, पारदर्शकता आणि ग्रामीण विकास कार्यात कशाप्रकारे सुधारणा करता येईल, यावरती मार्गदर्शनही केले.

### निष्काळजीपणे ट्रॅक्टर चालविल्यामुळे एकाचा मृत्यू; ट्रॅक्टर चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.९ जानेवारी-**

शेतामध्ये ट्रॅक्टर पाठीमागे घेत असताना निष्काळजीपणा करुन ऋतीक संजय वाकडे (वय २६) याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी राहुल रामचंद्र वाकडे (रा.मंगळवेढा) याच्या विरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,दि.८ रोजी १०.१५ वाजता यातील फिर्यादी राजेंद्र वाकडे यांचा मुलगा मयत ऋतीक वाकडे हा राहुल वाकडे याने आणलेला न्यू हॉलंड ३६३० या कंपनीचा ट्रॅक्टर नंबर एम.एच.१३ डी.टी.८८३७ यास पाठीमागे रोटर जोडून शेतजमीन रोटरत असताना आरोपी राहुल वाकडे याने सदर ट्रॅक्टर पाठीमागे घेत असताना रोटर असलेल्या शेतातील परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन जोरात पाठीमागे घेवून अविचाराने ट्रॅक्टर चालवून तो ट्रॅक्टर व्यवस्थित चालतो अगर कसे ? हे पाहण्यासाठी उभे असलेल्या ऋतीक वाकडे याचे अंगावर ट्रॅक्टर घालून रोटरच्या मशिनमध्ये अडकून त्यास डोकीस, हातास,पायास, खांद्यास गंभीर जखमा करुन अति रक्तस्त्राव होवून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.







### महिलांनी मार्केटिंगचे कसब आत्मसात करून भरारी घ्यावी : चंद्रशेखर जगताप

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

महिलांनी आपल्या उत्पादित वस्तू मोठ्या प्रमाणात विक्री होण्यासाठी मार्केटिंगचे कसब आत्मसात करून भरारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या संकल्पेतून उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सोलापुर जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना विक्रीसाठी आणि कायमस्वरूपी बाजारपेठ मिळण्यासाठी खरेदीदार-विक्रेता संमेलन आयोजित करण्यात आले होते त्यावेळी प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप बोलत होते. या संमेलनात सोलापुर जिल्ह्यातील ११ तालुक्यातील ६९ समूहांनी आपापल्या उत्पादनांचे नमुने म्हणून येथे आणले होते. त्यासाठी जिल्ह्यातील महिला शेतकरी उत्पादक कंपनी व इतर खरेदीदारांना आमंत्रित करण्यात आले होते.यामध्ये १७ घाऊक व किरकोळ व्यापारी खरेदीदार व १२ महिला शेतकरी उत्पादक कंपनी व उत्पादक समूह सहभागी झाले होते. यावेळी सेंद्रिय शेतमाल, फळे, ड्रायफ्रूइट्स, विविध खाद्य पदार्थ उत्पादने असे ८० उत्पादने या संमेलनात प्रदर्शित केली होती.

# सोलापुरात उद्या १४ केंद्रांवर ‘एमपीएससी’ पूर्व परीक्षा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ ही दि.११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा. ते १२ वा. या वेळेत सोलापूर शहरातील खाली नमुद १४ परीक्षा उपकेंद्रांवर होणार आहे.

सदर परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्राच्या परिसरात झेरॉक्स सेंटर, फॅक्स, ईमेल, रेडिओ, इंटरनेट अशा दळणवळण सुविधा यांचा परीक्षेच्या अनुषंगाने गैरवापर होण्याची शक्यता आहे, अशा सुविधा कार्यरत ठेवणे, वायरलेस सेट, ट्रांझिटर, मोबाईल फोन, टॅबलेट, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, संगणक गणनायंत्र (कॅल्क्युलेटर), ई-मेल, इंटरनेट, झेरॉक्स सेंटर यासारख्या दळणवळण साधनांचा परीक्षा केंद्राच्या आवारात उपयोग केला जातो. तसेच परीक्षा प्रक्रियेशी संबंधीत नसलेली व्यक्तीं परीक्षा केंद्राच्या आवारात प्रवेश करणे. तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात बाह्य उपद्रव कमी करणे, परीक्षार्थीना कोणताही अडथळा होऊ नये आणि परीक्षा प्रक्रियेशी संबधित शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांचे परीक्षेशी संबंधित कर्तव्ये चोखपणे, कोणताही अडथळा अथवा उपद्रव न होता बजावता यावे म्हणून परीक्षा केंद्राच्या सभोवताली १०० मीटर परीसरात कलम १६३ चा आदेश लागू केला आहे.

हा आदेश पोलीस उप आयुक्त, (गुन्हे/विशा), डॉ. अश्विनी पाटील यांनी काढला आहे. हा आदेश दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ०८.०० वा. ते दुपारी १३.०० वा. पर्यंत पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हद्दीचे कार्यक्षेत्रातील खाली नमुद सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षा केंद्रापासून १०० मीटर परिसरात राहणार आहे.

> **शहरातील परीक्षा केंद्रांची यादी याप्रमाणे**
>
> श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय बाळीवेस, बीएफ दमानी हायस्कूल बुधवार पेठ, संभाजीराव शिंदे प्रशाल मुरारजी पेठ जुनी मिल कंपाऊंड, एस व्ही सी एस हायस्कूल भवानी पेठ, उमाबाई श्राविका हायस्कूल बुधवार पेठ , एस आर चंडक इंग्लिश हायस्कूल बुधवार पेठ सम्राट चौक, सिद्धेश्वर वुमन्स पॉलीटेक्निक भवानी पेठ रुपा भवानी रोड, दयानंद काशिनाथ असावा हायस्कूल भवानी पेठ , श्री सिद्धेश्वर बालमंदिर माध्यमिक स्कूल भवानी पेठ, के .एल. ई. अण्णाप्पा काडादी हायस्कूल भवानी पेठ, हिंदुस्तान कॉन्व्हेंट चर्च हायस्कूल रेल्वे लाईन, संगमेश्वर कॉलेज रेल्वे लाईन, जागृती विद्यामंदिर हायस्कूल नेहरूनगर, शांती इंग्लिश मीडियम स्कूल न्यू संतोष नगर.

# ग्रामपंचायत कर सवलतीस ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ द्या

**ग्रामविकास मंत्री गोरे यांचेकडे सरपंच परिषदेची मागणी**

**पाणी पुरवठा वीजपुरवठा एकरकमी भरणा केल्यास सवलत मिळावी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाप्रमाणे ग्रामपंचायतीस ५० टक्केची कर वसुलीची सवलत ३१ मार्चपर्यंत मिळावी. ग्रामपंचायत पाणीपुरवठा विज बिल थकबाकी एकरकामी भरण्यास सवलत मिळण्याची मागणी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचेकडे सरपंच परिषदेच्या वतीने पत्राद्वारे करण्यात आली.

शासनाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानास ३१ डिसेंबर पर्यंत असलेली मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवण्यात आली. तर या दरम्यान ग्रामपंचायत कर वसुलीस ५० टक्के सवलतीस मात्र मुदतवाढ दिलेली नाही. शासनाच्या कर वसुली सवलतीमुळे ग्रामपंचायतीचा मोठया प्रमाणात कर वसूल झाला. पर्यायाने गावाच्या विकासात्मक देखभाल दुरुस्तीस त्याचा फायदा झाला. मात्र कर वसुलीचा कालावधी ३१ डिसेंबर रोजी संपलेला आहे. समृध्द अभियानाप्रमाणे कर वसुली सवलतीस मार्च अखेर मुदतवाढ देण्याची मागणी ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांच्याकडे करण्यात आले. ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा वीज बिलास शासनाने २०२२ पूर्वीचे बिल वसुल न करण्याचे तोंडी आदेश दिले होते. तेव्हापासून वीज महामंडळाने पाणीपुरवठा योजनेच्या बिलाची मागणी ग्रामपंचायतीस केली नाही. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानास ग्राम पंचायतीचे वीज देयक भरणा केल्यास गुणांक आहेत. त्यामुळे सन २०२२-२३, २०२३-२४ ते २०२४-२५ या तीन वर्षाची पाणीपुरवठा बिलाची एकरकमी रक्कम ग्रामपंचायती सवलत दिल्यास भरण्यास तयार आहेत. तरी बिल भरण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन व विज महामंडळाने मार्ग काढावा त्यामुळे ग्रामपंचायतींना एकरकामी बिल भरणा करण्यास प्रोत्साहन मिळेल असे सरपंच परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव, जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, महिला जिल्हाध्यक्षा कविता घोडके-पाटील, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष उमेश भगत, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष शिवानंद बंडे यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

> **ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा विज बिलास सवलत मिळावी - भगत**
>
> शासनाने २०२२ पूर्वीची पाणीपुरवठा विज बिल वसुली स्थगिती दिली. तेव्हापासून विज मंडळांने थकबाकीची मागणी केली नाही. शासनाच्या अभिनव मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात विज बिल थकबाकी नसेल तर गुणांक असल्याने अनेक ग्रामपंचायती सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षाची विज बिलात ५० टक्के सवलत दिल्यास ग्रामपंचायती विज देयके भरण्यास पुढे येतील.
>
> **- उमेश भगत**
> **सरपंच, ग्रामपंचायत नरोटेवाडी**

# पोलीस रेझिंग डे निमित्त ४६ गुन्ह्यांतील फिर्यादींना मुद्देमाल परत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

पोलीस रेझिंग डे निमित्त २ ते ८ जानेवारी पोलीस आयुक्तालयामार्फत जनजागृतीपर व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. नागरिकांना सुरक्षित व सुलभ वातावरण उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला.




पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील सात पोलीस ठाण्यांमध्ये दाखल घरफोडी, जबरी चोरी, मोटारसायकल चोरी व इतर चोरीच्या एकूण ४६ गुन्ह्यांमधील तब्बल ७४ लाख ६६ हजार ७९९ रुपये किमतीचा मुद्देमाल संबंधित फिर्यादींना परत देण्यात आला. यामध्ये फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हा तब्बल दहा वर्षांनंतर उघडकीस आणण्यात पोलीसांना यश आले.या गुन्ह्यातील मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात आला. विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे दाखल मंदिरातील चोरीचा गुन्हा अवघ्या १२ तासांत उघडकीस आणून, विविध देवतांच्या मूर्ती फिर्यादीस परत करण्यात आल्या.फिर्यादींमध्ये समाधान व्यक्त होत असून, सर्व फिर्यादींनी पोलीस दलाच्या कार्यक्षमतेबद्दल सहर्ष आभार मानले. यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उप-आयुक्त गौहर हसन, उप-आयुक्त (परिमंडळ) विजय कबाडे, उपायुक्त (गुन्हे/विशेष शाखा) डॉ. अश्विनी पाटील, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने यांच्यासह विविध विभागांचे सहायक पोलीस आयुक्त, पोलीस निरीक्षक, अधिकारी, अंमलदार व संबंधित गुन्ह्यातील फिर्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महात्मा बसवेश्वरांचे विचार आजही मार्गदर्शक : डॉ. लक्ष्मीकांत दामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

बाराव्या शतकात होऊन गेलेल्या बसवेश्वरांनी समाजातील जातीव्यवस्था आणि वर्णभेद नाकारून स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार दिला. त्यांनी स्त्रियांना अनुभव मंटपमध्ये प्रवेश देऊन अक्कमहादेवी, लिंगम्मा आणि रायम्मा यांसारख्या कर्तृत्ववान महिलांना साहित्य निर्मितीसाठी प्रोत्साहित केले, ज्यांनी स्वतःचा ठसा उमठवला, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन आणि कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या विशेष व्याख्यानाचे उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. प्रितम कोठारी होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.अश्विन बोन्दार्डे होते. महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक प्रा. चंद्रकांत गार्डी, विद्यापीठाच्या महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे सल्लागार समितीचे डॉ. प्राचार्य डॉ. गजाजन धरणे, रोहित पावले, महादेव न्हावकर हे उपस्थित हिते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. विद्या भोसले यांनी केले.आभारप्रदर्शन डॉ. दत्ता वाघमारे यांनी केले तर बहारदार सूत्रसंचालन कु. कांचन मरीकंटी यांनी केले.

> **इष्टलिंगाची पूजा स्वतःची स्वतः करावी**
>
> प्रमुख व्याख्याते डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची समकालीन प्रासंगिकता या विषयावर बोलतांना म्हणाले, बसवेश्वरांनी केवळ मंदिरे बांधण्यापेक्षा आपले शरीर हेच देवालय हा विचार मांडला. त्यांनी मूर्तीपूजा, कर्मकांड आणि पुरोहितशाहीला कडाडून विरोध केला. वेदांचे प्रामाण्य नाकारून त्यांनी पशुहिंसेला विरोध केला. इष्टलिंगाची पूजा स्वतःची स्वतः करावी, असा सोपा आणि सुटसुटीत मार्ग त्यांनी सामान्य लोकांसाठी खुला केला.

# श्री सिध्देश्वर यात्रेसाठी कडक वाहतूक निर्बंध

**१२ ते १६ जानेवारी दरम्यान नो-पार्किंग व नो-व्हेईकल झोन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी -**

ग्रामदैवत श्री. सिद्धेश्वर महाराज यांच्या परंपरागत मुख्य महायात्रेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाकडून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चार स्वतंत्र जाहीरनाम्यांद्वारे कडक वाहतूक व पार्किंग निर्बंध लागू करण्यात आले आहेत. ही महायात्रा दि. १२ जानेवारी ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.



या यात्रेसाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यांतून अंदाजे ३ ते ४ लाख भाविक सोलापूर शहरात दाखल होतात. याच कालावधीत नंदीध्वजाची भव्य मिरवणूक, अक्षता सोहळा, होम विधी, ६८ लिंग प्रदक्षिणा तसेच जनावरांचा मोठा बाजार भरत असल्याने शहरातील वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण येण्याची शक्यता आहे.

पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) अन्वये दिलेल्या आदेशानुसार, दि. १२ ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत नो पार्किंग झोन लागू राहणार आहे. अक्षता सोहळ्याच्या दिवशी 'नो व्हेईकल झोन' करण्यात आला आहे. दि. १३ जानेवारी २०२६ अक्षता सोहळा दिवशी सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत असेल.

दि. १२ ते १६ जानेवारी २०२६ दरम्यान नंदीध्वज मिरवणूक ज्या-ज्या मार्गावरून जाईल त्या मार्गावर तात्पुरती वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे.

यामध्ये प्रमुख मिरवणूक मार्ग हे हिरेहब्बु मठ, कसबा चौक माणिक चौक, विजापूर वेस पंचकट्टा, रिपन हॉल संमत्ती कट्टा, डफरिन चौक रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड सम्राट चौक, बाळीवेस ६८ लिंग प्रदक्षिणा मार्ग असेल, मिरवणूक पुढे सरकत जाईल त्यानुसार संबंधित मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गांवर वळवण्यात येणार आहे.

या सर्व आदेशांचा भंग करणाऱ्या व्यक्तीवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिक व भाविकांनी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, वाहतूक नियमांचे पालन करावे आणि पर्यायी मार्गांचा वापर करून श्री. सिद्धेश्वर महायात्रा शांततेत व सुरक्षिततेत पार पडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन सोलापूर शहर पोलिसांनी केले आहे.

> **या वाहनांना सर्व निर्बंधांतून आले वगळण्यात आले**
>
> ✻ रुग्णवाहिका ✻ अग्निशामक दल ✻ पोलीस वाहने ✻ लष्कर, नौदल, हवाई दल ✻ पॅरामिलिटरी फोर्स ✻ संरक्षित व्यक्तींची वाहने ✻ पोलिसांची विशेष परवानगी असलेली वाहने

> **या परिसरात सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश पूर्णतः बंद**
>
> ✻ श्री. सिद्धेश्वर मंदिर परिसर ✻ फडकुले सभागृह ते डफरिन हॉस्पिटल ✻ पार्क चौक ते मार्केट पोलीस चौकी ✻ हरीभाई देवकरण प्रशाला ते मार्केट पोलीस चौकी ✻ होम मैदान परिसर ✻ भाविकांनी मंदिरात जाण्यासाठी संमत्ती कट्टा उतार मार्गाचा व बाहेर पडण्यासाठी महाद्वार व विष्णू घाट मार्गाचा वापर करावा, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

> **या प्रमुख धार्मिक स्थळांवर ‘नो पार्किंग झोन’**
>
> ✻ श्री. सिद्धेश्वर मंदिर परिसर ✻ श्री. मल्लिकार्जुन मंदिर ✻ संमत्ती कट्टा परिसर ✻ श्री. रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसर ✻ जनावर बाजार परिसर ✻ तसेच होम मैदान परिसरात १४ जानेवारी (होम विधी) ✻ १५ जानेवारी (शोभेचे दारुकाम) या कालावधीत संपूर्ण नो पार्किंग झोन राहील.

# ‘देवाभाऊं’कडेच सोलापूरचे पालकत्व; यंदा मनपा ७५ पार

## सोलापूरच्या वेगाने विकासासाठी भाजपाच पाहिजेचा सूर

## मुख्यमंत्र्यांमुळे दैनंदिन पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी

## विमानसेवा, आयटी पार्क मंजूरीनंतर आता दोन्ही उड्डाणपूल, बोरामणी विमानतळासाठी भाजपा सज्ज; देवाभाऊ आज काय करणार घोषणा, सोलापूरकरांसह कार्यकर्त्यांचे लागले लक्ष

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

अनेक वर्षांपासून रखडलेल्या सोलापूरच्या विकासाला भाजपाने गती देण्याचा केलेला यशस्वी प्रयत्न उल्लेखनीय असून महाराष्ट्राच्या लाडक्या देवाभाऊंनी सोलापूरचे पालकत्व स्वीकारल्यानंतर अनेक विकासकामे मार्गी लागत आहेत. सोलापुरातून नियमित विमानसेवा सुरु झाली, आयटी पार्कला मंजूरी मिळाली असून ते लवकरच साकारणार, उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी पूर्ण झाली, शहरातील अंतर्गत पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी ९०० कोटींच्या आराखड्याला मंजूरी राज्यातील भाजपा सरकारने दिल्यामुळे सोलापूरकरांचे विकासाचे स्वप्न सत्यात उतरत आहे. शहरातील दोन उड्डाणपूलही होणार असून बोरामणी विमानतळाचे काम पूर्ण करण्याचेही सूतोवाच सरकारने केले आहे. होटगी रोड विमानतळाचे विस्ताकरीकरण करून नाईट लँन्डीगदेखील सुरु करण्याचे नियोजन सुरु आहे. लाडक्या बहिणींची साथ तर देवाभाऊंना होतीच पण आता लाडके भाऊ, लाडके ज्येष्ठ, लाडके युवा-युवती देखील आता सोलापूरच्या विकासासाठी भाजपाच महापालिकेत सत्तेवर पाहिजे, असा सूर लावत आहे. विकासाच्या घोषणा केलेल्या पूर्ण करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिलेला शब्द खरा करतात हे अनुभवलेल्या भाजपामय सोलापूरकरांनी महापालिका निवडणुकीतही भाजपालाच साथ देण्याचे नियोजन केल्याची चर्चा असल्याने भाजपाचा ७५ पारचा नारा यंदा सत्यात उतरणार हे निश्चित आहे. आज सोलापुरात होणाऱ्या सभेत देवाभाऊ सोलापूरसाठी काय घोषणा करणार याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

सन १९६४ मध्ये सोलापूर महापालिका अस्तित्वात आल्यानंतर मधला पुलोदचा काही काळ अपवाद वगळता सोलापूर महापालिकेवर सन २०१७ पर्यंत काँग्रेसची जवळपास एकहाती सत्ता होती. तर १९९९ साली शरद पवारांकडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर काँग्रेसबरोबर राष्ट्रवादीदेखील मनपाच्या सत्तेत सोबत होती. १९९२ साली सोलापूरची मोठ्या प्रमाणात हद्दवाढ होवून लगतच्या ११ ग्रामपंचायतींचा समावेश सोलापूरच्या महापालिका हद्दीत झाला. काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे यांनी उजनी-सोलापूर पहिली जलवाहिनी करून सोलापूरकरांचा पाणीप्रश्न काहीअंशी सोडवला खरा पण इतक्या प्रदीर्घ सत्तेच्या काळानंतरही काँग्रेस सोलापूरचा विकास क्षमतेने करू शकली नसल्याची शोकांतिका लोक व्यक्त करतात. केंद्र व राज्यात सरकार आणि सोलापूर महापालिकेवर एकहाती सत्ता असतानाही काँग्रेस-राष्ट्रवादीकडून सोलापूरच्या भरीव विकासाकडे अक्षम्य दुर्लक्षच झाले. २०१४ साली देशात आलेल्या मोदी लाटेनंतर मात्र काँग्रेसच काय पण विरोधी पक्षांना राजकीय गळती लागली. लाट आहे का स्तुनामी हे समजून घेण्यातच विरोधी पक्षांना सावरणे कठीण झाले. २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत महापालिकेच्या १०२ नगरसेवकांपैकी ४९ जागांवर विजय मिळवून भाजपाने एकहाती सत्ता आणली. केंद्र, राज्य आणि महापालिकेत भाजपाचीच सत्ता असल्याने सोलापूरच्या विकासाला गती मिळाली.



### दैनंदिन पाणीपुरवठा दृष्टिपथात

स्मार्ट सिटीच्या माध्यमातून शहरातून जवळपास एक हजार कोटींची कामे झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पार्क मैदानावर भूमिपूजन केल्यानंतर सरकारने दिलेल्या भरीव निधीमुळे उजनी ते सोलापूर समांतर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाले. सोलापूरकरांना दैनंदिन पाणीपुरवठा होण्यासाठी शहरातील अंतर्गत पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेल्या ९०० कोटींच्या आराखडल्या मंजुरी भाजपा सरकारने मंजुरी दिलेली असून हे काम देखील सुरु होणार आहे. त्यामुळे वर्षेनुवर्षे पाण्याचा वनवास भोगणाऱ्या सोलापूरकरांना दैनंदिन आणि योग्य वेळी आणि नियमितपणे पाणीपुरवठा होणार हे दृष्टीपथात आहे.

### विमानसेवेचे स्वप्न पूर्ण

होटगी रोडवरील विमानतळावरून विमानसेवा सुरु करण्याची सोलापूरकरांची प्रामाणिक मागणी ओळखून मुख्यमंत्री फडणवीस यांनी विमानसेवेत अडथळा येणारी कारखान्याची अनधिकृत चिमणी पाडून सोलापूर-मुंबई, सोलापूर-गोवा विमानसेवा सुरु केली असून ती मोठ्या जोमात सुरु आहे. आता लवकरच सोलापूर-तिरुपती, सोलापूर-हैदराबाद, सोलापूर-बंगळरू विमानेसवा सुरु होण्याच्या मार्गावर आहे. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, पंढरपूरचे श्री विठ्ठल-रुक्मिणीमाता मंदिर, तुळजापूरची कुलस्वामीनी या सोलापूरलगतच्या तिर्थक्षेत्रांचा विकास करून भाजपा सरकारने धार्मिक पर्यटनाला चालना दिल्याने सोलापूरचा चादर, टॉवेल उद्योग, कडक भाकरी, शेंगो चटणीसह रुचकर भोजनाचा स्वाद घेण्यासाठी लाखो पर्यटक दरवर्षी सोलापूरला येत आहेत. विमानेसेवेसह रेल्वेचे मोठे जाळे आणि सोलापूरला जोडणाऱ्या सर्वच दिशांना चारपदरी महामार्गामुळे पुण्यानंतर आता उद्योग आणि उद्योजकांकडून सोलापूरला पसंती मिळत आहे. तर नाशीक-सोलापूर-अक्कलकोट या सहापदरी कॉरिडोर महामार्गाला भाजपाने नुकतीच मंजुरी दिली आहे. १२३ टीएमसी इतक्या विशालकाय क्षमतेचे उजनी धरण, एनटीपीसी आणि पॉवरग्रीडमुळे वीजेची पुरेशी उपलब्धतता, अद्ययावत अशा औद्योगिक वसाहती, कुशल आणि मेहनती कामगार यामुळे सोलापूरला मोठे उद्योग येत आहेत. सिमेंट कंपन्यांचे तर सोलापूरला मोठे जाळेच आहे.



### आयटी पार्कचा प्रश्न मार्गी

सोलापूरच्या उच्च शिक्षित युवा-युवतींना रोजगारासाठी पुणे-मुंबईला जावे लागत असल्याची तक्रार ओळखून देवाभाऊंनी सोलापूरला आयटी पार्कची घोषणा केली आणि जिल्हाधिकारी यांनी तातडीने अभ्यासपूर्ण दिलेल्या जागेच्या प्रस्तावाला शासनाच्या विभागाने मंजुरीदेखील दिलेली आहे. लवकरच सोलापुरात आयटी उद्योगांचेही मोठे जाळे उभारले जाणार असल्याने सोलापूरच्या युवा-युवतींना रोजगारासाठी सोलापूर सोडण्याची वेळ येणार नाही. देवाभाऊंनी आयटी पार्कचा शब्दही पूर्ण केला.

### अनेक विकासकामे मार्गी

उजनीसारखे विशालकाय धरण उशाशी असतानाही सोलापूरकरांना आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा हा त्रास ओळखून भाजपा सरकारने उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीचे पूर्ण ते काम केले आहे. अंतर्गत पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी ९०० कोटींचा निधी मंजूर करून सोलापूरकरांना नियमित दैनंदिन आणि योग्यवेळी पाणीपुरवठा होईल यासाठीचे सर्व निर्णय मार्गी लावले आहेत. महापालिका निवडणुकीच्या अगोदर भाजपाने सोलापूर विकासाची अनेक कामे मार्गी लावल्यामुळे सोलापूरचा विकास असाच झपाट्याने होण्यासाठी महापालिकेवर पुन्हा भाजपाचीच सत्ता असावी याकडे सोलापूरकरांचा कल दिसतो आहे. लाडक्या देवाभाऊंनी सोलापूरकरांचा विश्वास सार्थ ठरविलेला आहे.

### भाजपासह देवाभाऊंवर सोलापूरकरांचा विश्वास का?

मागील काही वर्षात सोलापूरच्या विकासासाठी भाजपाच्या सरकारकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली सर्व आश्वासने पूर्ततेच्या मार्गावर आहेत. अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत तर उर्वरित विकासकामे देवाभाऊच पूर्ण करू शकतील असा विश्वास सोलापूरकरांना वाटतो आहे. केंद्र, राज्यासह सोलापूर महापालिकेवर अनेक वर्षे सत्ता असलेल्या विरोधकांनी हातात असतानाही सोलापूरचा विकास म्हणावा तसा आणि म्हणाव्या त्या गतीने केलेला नसल्यामुळे सोलापूरकरांनी गतवेळी महापालिकेची सत्ता भाजपाच्या हातात एकहाती दिली. भाजपानेदेखील विकासकामे करून सोलापूरकरांचा विश्वास सार्थ ठरविला आहे. आता सोलापुरात आयटी पार्क सुरु होणे, दैनंदिन पाणीपुरवठा, दोन्ही उड्डाणपूल, विमानतळावर नाईट लॅन्डिग, बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळ ही कामे गतीने पूर्ण करण्यासाठी महापालिकेत भाजपाचीच सत्ता पाहिजे हे आता सोलापूरकरांनी ओळखले आहे.

### पालकमंत्री जयाभाऊंचा ७५ पारचा नारा दृष्टिपथात...



सोलापूरच्या राजकारणाची नस ओळखून कामाला लागलेले सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी महापालिका निवडणुकीसाठी मजबूत फिल्डिंग लावली आहे. महापालिका निवडणूक स्वबळावर लढवून भाजपाच्या कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. यंदा महापालिकेत ७५ पार नगरसेवक विजयी करण्याचा संकल्प जयाभाऊंनी घोषित केला आहे. पक्षातंर्गत विरोध बाजूला सारत, नाराजांची नाराजी दूर करत सर्वांना भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी मैदानात उतवणारे जयाभाऊ यांचा ७५ पारचा नारा आता १६ जानेवारीला साक्षात उतरणार असल्याची चर्चा रंगली आहे.



प्रशांत माने
मो.९८८११९१४४३

### दोन्ही उड्डाणपूल आणि बोरामणी विमानतळ

शहरातील अवजड वाहतुकीची कोंडी कमी होवून अपघात टाळण्यासाठी शहरात होणाऱ्या दोन्ही उड्डाणपूलांच्या भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात आहे. ते देवाभाऊ नक्कीच पूर्ण करण्याचे आदेश प्रशासनाला देतील. तसेच बोरामणी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी येणाऱ्या माळढोकच्या अडथळ्यालाही ते दूर करतील असा सोलापूरकरांना विश्वास आहे.

---

# अंबरनाथमध्ये शिंदे गटाची भाजपला धोबीपछाड!

## अजित पवार गटासह ५ नगरसेवक फोडून सत्ता स्थापनेसाठी दावा

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी मुंबई, दि. ९ जानेवारी**

नगरसेवकांच्या जबरदस्त कोलांटउड्यामुळे राज्यात नव्हे देशात चर्चेला आलेल्या अंबरनाथ नगरपालिकेमध्ये अद्यापही पळवापळवीचे राजकारण तिसऱ्या दिवशीही कायम राहिले आहे. शिवसेना शिंदे गटाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजपाने काँग्रेसच्या१२ नगरसेवकांना आपल्या पक्षात पावन करून घेतले असताना शिंदे गटाने त्यांच्यात सहभागी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या ४ नगरसेवकासह एका अपक्ष नगरसेवकाला आपल्याकडे वळवून घेत

भाजपाच्या सत्ता स्थापनेच्या स्वप्नांना सुरू लावले. ३२ नगरसेवकांची यादी प्रशासनाला सादर करीत बहुमत मिळवीत सत्ता स्थापन करण्याचा दावा केला आहे.५ नगरसेवकअंडर ग्राउंड झाले असून त्यांचे मोबाईल बंद आहेत. याठिकाणी नगरपालिकेच्या निवडणुकीत शिंदे गटाचे सर्वाधिक २७ नगरसेवक निवडून आले आहेत. तर भाजपा १४, काँग्रेस १२, राष्ट्रवादी अजित पवार ४ व एक अपक्ष निवडून आले होते. शिंदे गटाला सत्तेपासून बाजूला ठेवण्यासाठी अन्य सर्व विरोधकांना एकत्र करून विकास आघाडी स्थापन केली होती. मात्र स्थानिक काँग्रेसने सत्तेसाठी भाजपाशी हात मिळवणी केल्याने राजकीय वर्तुळात तुफान चर्चा रंगली. त्यामुळे प्रदेश नेतृत्वाने बुधवारी १२ नगरसेववकांना तडकाफडकी निलंबित केले होते. त्यानंतर त्या सर्वांनी गुरुवारी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला. त्यामुळे त्या ठिकाणी भाजपा सत्तेत येईल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती.

मात्र शिवसेना शिंदे गटाने भाजपाची खेळी त्यांच्यावर उलटवली. त्यांच्यासोबत गेलेल्या अजित पवार गटाचे ४ आणि १ अपक्ष नगरसेवक फोडून सत्ता स्थापनेची तयारी केली आहे. ३२ नगरसेवकांचा बहुमताचा आकडा गाठून सत्ता स्थापण्याचा दावा केला आहे. त्यांच्यासमवेत गेलेले पाचवी नगरसेवक नॉट रिचेबल झाले आहेत.

---

# राजकीय पक्ष सोडताहेत विचारधारा

## पुढारी फोडण्यासाठी पैशाचा वापर • नेते कुठेही जात आहेत अन् काहीही करीत आहेत

### अजित पवारांनी व्यक्त केली खंत!

**◆ पुणे, ९ जानेवारी**

आपल्या पक्षाचा विस्तार करण्यासाठी अनेक राजकीय पक्ष विविध प्रकारच्या क्लुप्त्यांचा वापर करीत आहेत. पैसा आणि बळाच्या माध्यमातून पुढाऱ्यांना फोडले जात आहे. अनेक पक्ष आपली मुळ विचारधारा सोडत आहेत, अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली आहे.



पीटीआयला दिलेल्या विशेष मुलाखतीत पवार यांनी विविध मुद्यांना हात घातला. या पक्षातून त्या पक्षात उड्या मारण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. नेत्यांना आमिष दाखवून अथवा दबाव टाकून पक्ष बदलण्यास भाग पाडले जात आहे. अलीकडे राजकीय पक्षांनी आपल्या मूळ विचारधारेचा त्याग केला असून नेते वाटेल त्या पक्षात जात आहेत आणि मनाला वाटेल तसे वागत आहेत. ही परिस्थिती फारच चिंताजनक आहे, असे पवार म्हणाले.

पक्ष बदलण्यासाठी काही नेत्यांना प्रलोभने दाखविल्या जात आहेत तर काहींना प्रलंबित चौकशी पुन्हा सुरू करण्यासाठी दबाव टाकल्या जात आहे. तसेच जे नेते पक्षांतरासाठी तयार झाले त्यांना चौकशी संस्थांचा ससेमिरा टाळण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन दिले जात आहे. सध्याच्या राजकारणात मोठ्या प्रमाणात पैसा आणि बळाचा वापर केला जात असल्याची टीकाही उपमुख्यमंत्र्यांनी केली.

मनपा निवडणूक रणधुमाळी

### पवारांना तीन मिनिटांत गप्प करतो



पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवेसी यांची सभा झाली. अजित पवार आणि एकनाथ शिंदे एकाच माळेचे मणी आहेत. अजित पवारांना माझ्यासमोर आणा; मी त्यांना तीन मिनिटांमध्ये गप्प करतो, असे आव्हान ओवेसी यांनी दिले. ■

### ५० खोके एकदम ओके

मुंबईतील चेंबूर येथे प्रचारफेरीदरम्यान भाजप आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच जुंपली. भाजपच्या उमेदवार शिल्पा केळुसकर आणि शिवसेनेच्या पूजा कांबळे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दीक चकमक झडली. भाजपच्या कार्यकर्त्यांनी ‘५० खोके , एकदम ओके’ च्या घोषणा दिल्या. यामुळे शिवसेनेचे कार्यकर्ते चांगलेच खवळले. याला प्रत्युत्तर म्हणून ‘गली गली मे शोर है, एबी फॉर्म चोर है’ अशा घोषणा शिवसैनिकांनी दिल्या.◀ (वृत्तसंस्था)

### अंबरनाथमध्ये शिवसेनेला अजित पवारांची साथ

अंबरनाथ नगरपरिषदेत उलटफेर झाला असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने शिवसेना सत्ता स्थापनेचा दावा करणार आहे. यापूर्वी शिवसेनेला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसच्या चार तर काँग्रेसच्या १२ नगरसेवकांचा पाठिंबा घेतला होता. मात्र, २७ नगरसेवक असलेल्या शिवसेनेने राकाँ आणि अपक्ष नगरसेवकाच्या मदतीने सत्तास्थापनेसाठी ३२ चा आकडा पूर्ण केला आहे. ■

### परिषदेची एक जागा मिळणारः आठवले



मनपा निवडणुकीत आमच्यावर अन्याय झाला. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा झाली आहे. विधान परिषदेची एक जागा देण्याबरोबरच मुंबई मनपाच्या विविध समित्या आणि महामंडळांवर प्रतिनिधीत्व देण्याचे आश्वासन फडणवीस यांनी दिले आहे, असे रिपाइं(आठवले)चे नेते रामदास आठवले यांनी म्हटले आहे. ■

---

# देशातील ४४ टक्के शहरांमधील हवा दूषित

**नवी दिल्ली, ९ जानेवारी**

देशातील सुमारे ४४ टक्के शहरे दीर्घकाळापासून वायू प्रदूषणाचा सामना करीत आहेत. सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर (सीआरईए) ने सॅटेलाईट डेटाच्या मदतीने देशातील ४,०४१ शहरांमध्ये पीएम २.५ प्रदूषणासंदर्भात संशोधन केले. यामध्ये असे समोर आले आहे की, मेघालयमधील बर्नीहाट, दिल्ली आणि गाझियाबाद ही देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरे आहेत.

या शहरांमध्ये प्रदूषणाची समस्या एक-दोन दिवसांची नसून वर्षभर कायम असते. प्रदूषणाचे मुख्य कारण वाहने, कारखाने आणि इतर कारणांमुळे सातत्याने होणारे प्रदूषण आहे. अहवालात म्हटले आहे की, २०१९ ते २०२४ दरम्यान दरवर्षी किमान १,७८७ शहरांमध्ये पीएम २.५ ची पातळी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त होती. यामध्ये कोविडमुळे प्रभावित झालेल्या २०२० या वर्षाचा डेटा विचारात घेण्यात आलेला नाही. भारतातील ४४ टक्के शहरे ‘क्रॉनिक एअर पॉल्यूशन’ म्हणजेच सततच्या वायू प्रदूषणाच्या श्रेणीत येतात. या शहरांपैकी केवळ ४ टक्के शहरेच नॅशनल क्लीन एअर प्रोग्रामच्या कक्षेत समाविष्ट आहेत.

---

# अयोध्येत मांसाहाराच्या डिलिव्हरीवर बंदी

**अयोध्या :** अयोध्येतील राम मंदिर आणि पंचकोशी परिक्रमा मार्गाच्या आसपास मांसाहारी पदार्थांच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश ऑनलाइन अन्न वितरण करणाऱ्या कंपन्यांनाही लागू करण्यात आला आहे. या संदर्भात हॉटेल, होम स्टे आणि ऑनलाइन अन्न वितरण करणाऱ्या कंपन्यांना माहिती दिली आहे. उल्लंघन केल्यास कारवाई केली जाईल, असा इशाराही दिला आहे. हा आदेश आल्यानंतर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. काही लोक या आदेशाच्या बाजूने तर काही लोक विरोधात उभे राहिले आहेत.

---


# पोलीस स्कॉर्पिओच्या धडकेने अक्कलकोटचा तरुण जागीच ठार

## इंदापूरजवळील घटना; चालकाविरोधात गुन्हा दाखल


**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ९ जानेवारी**

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर तालुक्यातील गलांडवाडी नं.१ परिसरात घडलेल्या भीषण अपघातात अक्कलकोट तालुक्यातील मनोहर दिपक कदम (वय ३६) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

भरधाव वेगात येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ (एम एच १२ पीटी ५७०८) या वाहनाने रस्ता ओलांडत असताना त्यांना जोराची धडक दिली. याप्रकरणी मृताचा भाचा अविनाश राजू चव्हाण (वय २७, व्यवसाय - ड्रायव्हर, रा. कसबा, ता. अक्कलकोट) यांनी इंदापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, अविनाश चव्हाण व त्यांचे मामा मनोहर कदम हे बुलेट मोटारसायकल (एम एच १२ युडी २४७५) वरून अक्कलकोटहून पुण्याच्या दिशेने जात असताना लघुशंकेसाठी महामार्गालगत थांबले होते. सोमवारी रात्री सुमारे साडेआठ वाजण्याच्या सुमारास, मनोहर कदम हे रस्ता ओलांडत असताना पुण्याहून सोलापूरकडे जाणाऱ्या भरधाव स्कॉर्पिओने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांना जोरदार धडक दिली.



या धडकेत कदम गंभीर जखमी झाले. त्यांच्या डोक्याला, डोळ्याला व तोंडाला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने इंदापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. विशेष म्हणजे, अपघातास कारणीभूत ठरलेली स्कॉर्पिओ ही पोलीस विभागाची असून ती सचिन तुकाराम पवार (रा. समर्थनगर, ता. अक्कलकोट) हे चालवत असल्याची माहिती फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी इंदापूर पोलीस ठाण्यात भरधाव व निष्काळजी वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी संबंधित चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या अपघातामुळे कदम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




---

# शिवानंद पाटलांनी घेतली सुनील तटकरेंची भेट

## तालुक्यात राष्ट्रवादीत जाण्याच्या चर्चेला उधाण

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. ०९ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे माजी आमदार स्व.सिद्रामप्पा पाटील यांचा तालुक्यातील एक गट अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाण्याच्या तयारीत असल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची सोलापूर येथे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी भेट घेतली. यावेळी अक्कलकोट तालुक्यातील श्री स्वामी समर्थ कारखाना जीर्णोद्धारासाठी व तालुक्यातील शेतकऱ्यांची अडचण सोडवण्याबाबत राजकीय व सामाजिक चर्चा झाली.



यावेळी कृषिमंत्री तथा सोलापूरचे माजी पालक मंत्री दत्ता मामा भरणे, महाराष्ट्र राज्य महिला आयोग अध्यक्ष रुपालीताई चाकणकर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटीलसह जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते उपस्थित होते.

## अग्रलेख...

# विनाशकाले विपरीत बुद्धी

तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या अतिशय वाचाळ आणि आक्रमक नेत्या म्हणून ओळखल्या जातात. आपल्या या आक्रमकतेच्या आधारावरच त्यांनी राज्यातील डाव्या आघाडीच्या ३४ वर्षांच्या राजवटीचा शेवट करीत सत्ता बळकावली, एवढेच नाही तर सलग तीन विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला निर्विवाद बहुमत मिळवून देत मुख्यमंत्रिपदाची हॅट्ट्रिकही केली. कोणत्याही कारणाने चर्चेत राहण्याची आणि वादळ उठवीत त्याचा राजकीय फायदा उचलण्याची हातोटी त्यांना साधली आहे. डाव्या पक्षांची काही दशकांची गुंडगिरी मोडून काढत निवडणूक सलग तीनदा जिंकणे, ही काही मामुली गोष्ट नाही. शेराला सव्वाशेर असल्याशिवाय ते शक्य होत नाही. डाव्यांच्या गुंडगिरीचा सामना करताना ममता बॅनर्जी आणि त्यांच्या पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते कधी गुंडगिरीच्या मार्गावर गेले, हे कोणाला कळलेच नाही. खुद्द ममतादीदींनाही नाही.

अनेकवेळा आक्रमकता आणि आक्रस्ताळेपणा यांच्यातील सीमारेषा अतिशय पुसट असते. आक्रमकता कधी संपते आणि आक्रस्ताळेपणा कधी आणि कसा सुरू होतो, हे समजतच नाही. ममता बॅनर्जी यांची सध्याची स्थिती तशीच झाली आहे. कोलकाता येथे आय-पॅक कंपनीचे प्रतीक जैन यांच्या कार्यालयावर आणि निवासस्थानावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) घातलेल्या छाप्यानंतर ममता बॅनर्जी यांनी जो तमाशा केला, तो तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून त्यांना शोभणारा असला तरी राज्याच्या मुख्यमंत्री म्हणून पूर्णपणे अशोभनीय. आपल्या कृतीने ममता बॅनर्जी यांनी कारण नसताना संवैधानिक संकट निर्माण केले आणि आपल्याच हातांनी आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे, असे म्हणावे लागेल. प्रत्येक घटनेचा राजकीय फायदा उचलण्याचे अफलातून कसब ममता बॅनर्जी यांच्यात आहे हे खरेच. त्यानुसार ईडीच्या छाप्याचेही राजकारण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. असे करीत असताना त्यांनी ममता बॅनर्जी म्हणून स्वत:चे नाही तर मुख्यमंत्रिपदाचे अवमूल्यन करून टाकले. कोलकाता पोलिसांच्या भूमिकेवरही यामुळे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, काळ सोकावतो, याचे दु:ख व्हावे अशी ही घटना. ममता बॅनर्जी यांची आणखी एक मोठी घोडचूक म्हणजे त्यांनी ईडीच्या छाप्याच्या कारवाईत अडथळा आणला. काही कागदपत्रे तेथून जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतली. एवढेच नाही तर केंद्राच्या यंत्रणेसमोर आपल्या राज्याची यंत्रणा उभी करत दोघांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. केंद्र आणि राज्य असा संघर्ष पश्चिम बंगालला नवा नाही, पण यावेळी त्यांनी याला थेट युद्धाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. मुळात ईडीने जो छापा घातला, तो ममता बॅनर्जी यांच्या, त्यांच्या निकटवर्तीयांच्या तसेच तृणमूल काँग्रेसच्या कोणत्याही नेत्याच्या निवासस्थानावर घातला नव्हता. तर हा छापा घालण्यात आला, तो इंडियन पॉलिटिकल ॲक्शन कमेटी (आय-पॅक) कंपनीचे सहसंस्थापक प्रतीक जैन यांच्या निवासस्थानावर आणि कार्यालयावर. प्रतीक जैन हे जसे आय-पॅकचे सहसंस्थापक आहेत, तसेच ते तृणमूल काँग्रेसच्या आयटी विभागाचे प्रमुखही आहेत, म्हणजे त्यांच्याकडे दुहेरी जबाबदारी आहे. तरीही त्यांचा थेट संबंध राजकारणाशी आहे असे म्हणता येत नाही. आय-पॅक ही तशी प्रशांत किशोर यांची कंपनी. देशातील राजकीय पक्षांच्या आणि नेत्यांच्या निवडणुकीचे व्यवस्थापन करताना प्रशांत किशोर यांनाही राजकीय पक्ष स्थापन करण्याची तसेच बिहार विधानसभेची निवडणूक लढवण्याची अवदसा आठवली होती. त्यात त्यांचा दारुण पराभव झाला. म्हणजे प्रशांत किशोर यांची निवडणूक लढवण्याची हिंमत झाली नाही, पण त्यांच्या पक्षाच्या जेवढ्या उमेदवारांनी निवडणूक लढवली, त्या सर्वांची जमानत जप्त झाली. यावरून निवडणूक व्यवस्थापन करणे, व्यूहरचना ठरवत दुसऱ्या पक्षाला निवडणूक जिंकण्यात हातभार लावणे सोपे असते. पण स्वत: निवडणूक जिंकणे, आपला पक्ष जिंकवून देणे कठीण असते, याचा अनुभव त्यांना नक्कीच आला असेल. तर अशा या आय-पॅककडे ममता बॅनर्जी यांनी निवडणूक जिंकवून देण्याची सुपारी दिली. आय-पॅक साम, दाम, दंड, भेद अशा सर्व मार्गांचा अवलंब निवडणूक जिंकण्यासाठी करून देत असते, असा आरोप आहेच. ईडीचे छापे हे त्यांच्या एका जुन्या प्रकरणाशी संबंधित आहेत. कोळसा घोटाळा प्रकरणात ईडीने गुरुवारी सकाळी कोलकात्यात सहा ठिकाणी आणि राजधानी दिल्लीत चार ठिकाणी छापे घातले. २०२० च्या या प्रकरणात सीबीआयने तृणमूल काँग्रेसचे खासदार आणि ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या पत्नीचीही चौकशी केली आहे. कोळसा घोटाळ्यातील मोठ्या प्रमाणातील पैसा आय-पॅक कंपनीला मिळाल्याचा आरोप आहे. या पैशाचा उपयोग तृणमूल काँग्रेसने आय-पॅकच्या माध्यमातून गोवा विधानसभा निवडणुकीत केला, असे म्हणतात. ईडीच्या छाप्याच्या कारवाईला विधानसभा निवडणुकीचा मुद्दा बनवण्याचे ममता बॅनर्जी यांनी ठरवलेले दिसते. मोदी सरकारच्या इशाऱ्यावर ईडी सूडबुद्धीची कारवाई करीत असल्याचा त्यांचा आरोप आहे. राजकीय कारणाने नव्हे तर कोळसा घोटाळ्यातील आय-पॅकच्या सहभागावरून ईडीला धनशोधनाच्या प्रकरणात ही कारवाई करावी लागली, ही वस्तुस्थिती आहे. पण आले ममतादीदींच्या मना तेथे कोणाचे काहीच चालेना, अशी स्थिती आहे. त्यामुळे आता काय खरे आणि काय खोटे हे पश्चिम बंगालच्या जनतेलाही कळून चुकले आहे. ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेसचे नेते धुतल्या तांदळासारखे नाहीत, तर भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकरणांत बरबटलेले आहेत. 'कर नाही त्याला डर कशाला' अशी एक म्हण आहे. ममता बॅनर्जी आणि त्यांच्या बगलबच्च्यांनी काही गैर केले नसेल तर त्यांना घाबरण्याचे कारण काय? पण, घाबरगुंडी उडाली हे दिसतेच आहे आणि त्यामुळेच संशयाला वाव आहे.

विशेष म्हणजे ममता बॅनर्जी यांच्या कृतीचा भाजपानेच नाही तर काँग्रेस आणि डाव्या पक्षांनीही विरोध केला आहे, त्यांच्या अटकेची मागणी केली आहे. राज्यात राष्ट्रपती राजवट लावण्याची मागणीही यानिमित्ताने जोर धरू लागली आहे. राज्यात आधी १९६८, १९७० आणि १९७१ मध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाली होती. २०२१ मध्ये राज्यात उसळलेल्या हिंसाचारानंतरही राष्ट्रपती राजवटीची मागणी उठली होती. केंद्रीय तपास यंत्रणांविरुद्ध दंड थोपटण्याची ममता बॅनर्जी यांची ही पहिली वेळ नाही. २०१९ मध्ये सीबीआयच्या छाप्याच्या वेळी ममता बॅनर्जी मुख्यमंत्री असूनही धरण्यावर बसल्या होत्या. ममता बॅनर्जी यांचे आतापर्यंतचे संपूर्ण राजकारण तुष्टीकरणाचे म्हणावे लागेल. राज्यात ३० टक्के मुस्लिम मतदार आहेत. त्यामुळे मुस्लिम मतदारांचे तुष्टीकरण करताना ममता बॅनर्जी राज्यातील हिंदू मतदारांची उपेक्षा करू लागल्या होत्या. आता त्यांचे डोळे थोडे थोडे उघडू लागले होते. मात्र आता त्याला बराच उशीर झाला आहे. पाणी त्यांच्या डोक्यावरून गेले आहे. ममता बॅनर्जी यांच्या या लोकशाही तसेच संविधानविरोधी कृत्याच्या विरोधात ईडीने कोलकाता उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ईडीच्या चौकशीत आवश्यक असलेली कागदपत्रे आणि आवश्यक साहित्य ममता बॅनर्जी यांनी ईडीच्या ताब्यातून बळकावले, असे न्यायालयात सिद्ध झाले तर त्याची मोठी राजकीय किंमत यावेळी ममता बॅनर्जी यांना चुकवावी लागेल, यात शंका नाही. त्यांना अटकही होऊ शकते, तसेच राज्यातील त्यांचे सरकार बरखास्त करण्याची कारवाईही केली जाऊ शकते. विनाशकाले विपरीत बुद्धी म्हणतात तसे ममता बॅनर्जी यांचे झाले आहे. पश्चिम बंगालमधील त्यांचे दिवस भरले आहेत. त्यामुळेच ईडीच्या छाप्याच्या वेळी त्यांनी वेड्यासारखी कृती करत आपल्या राजकीय शेवटाचा पाया घातला आहे. प्रत्येकवेळी आक्रमकतेने केलेल्या कृतीचा राजकीय फायदा मिळतोच असे नाही, अनेक वेळा बूमरँगही होत असते, जसे यावेळी झाले. ममतादीदी सर्वज्ञ असल्याच्या आविर्भावात वावरतात. कधी तरी आपल्या वर्तनाकडे स्वपरीक्षणाच्या नजरेने पाहायचे असते, हे त्यांना कधी तरी कळेल?

## यंगिस्तान

# मुंबईकरांचे प्रश्न आणि बंगलेकरांचा जश्न

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

सध्या मुंबईत छान असं कौटुंबिक वातावरण आहे. कौटुंबिक मेळे होत आहेत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन चुलत भाऊ एकत्र आले आहेत. राजकीय मंचावर त्यांचं सबंध कुटुंब दिसत आहे. जणू राजकीय मंच नसून फॅमिली फंक्शन आहे. त्यामुळे सगळाच कसा आनंदी आनंद आहे. १५ जानेवारीला मुंबई महानगरपालिकेबरोबर इतर पालिकांचीही निवडणूक आहे. पण ठाकरे बंधूंनी आपलं सगळं लक्ष मुंबई पालिकेवर केंद्रित केलं आहे. काही ठिकाणी उद्धव ठाकरे मुलाखती देत आहेत. त्यातही मुंबई हाच विषय आहे. शक्यतो दुसऱ्या विषयावर ते बोलत नाहीत. आता संजय राऊत आणि महेश मांजरेकर यांनी उद्धव व राज ठाकरेंची मुलाखत घेतली, त्यातही केंद्रबिंदू मुंबईच होती. त्याचं कारण मुंबई ही सर्वांत श्रीमंत पालिका असून इथला नगरसेवक आमदाराच्या तोडीचा असतो. या मुलाखतीत राज ठाकरे यांनी एक मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह बहुतांश राज्यकर्ते हे मुंबईतील नाहीत. ते मुंबईच्या बाहेरचे आहेत. त्यामुळे त्यांना मुंबईकरांचे प्रश्न कळू शकत नाहीत.'' आपलं म्हणणं पटवून देण्यासाठी त्यांनी स्वीडनचं उदाहरण दिलं. ''मी एकदा स्वीडनला गेलो होतो. तिथे मी तो देश पाहत होतो. गाड्या फिरतात, सगळ्यांकडे उत्तम नोकऱ्या आहेत, सुंदर रस्ते आहेत, उत्तम निसर्ग आहे. सगळे सगळे व्यवस्थित छान. हे सगळे पाहताना माझ्या मनात पहिला प्रश्न आला की, इथला विरोधी पक्ष काय करतो? म्हणजे निवडणुकीच्या तोंडावर काय सांगत असेल, की मी तुम्हाला हे देईन, मी तुम्हाला ते देईन.'' असं राज ठाकरे म्हणाले.

याचा अर्थ असा की बाहेरून आलेल्या माणसाला सगळं छान दिसतं. पण तिथल्या समस्या स्थानिकांनाच माहिती असतात. वरवर पाहता राज ठाकरेंचा मुद्दा योग्य वाटतो. पण याचा सखोल विचार केल्यावर आपल्याला ठाकरेंची वैचारिक व्याप्ती दिसून येते. एका चर्चेमध्ये ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे यांनी उद्धव ठाकरेंचा एक किस्सा सांगितला. उद्धव ठाकरे जेव्हा मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांना आमदार व्हायचे होते. आमदारकीचा फंड वापरण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी पहिलं काम केलं, ते म्हणजे शिवाजी पार्कला विद्युत दिवे बसवून घेतले. म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याचं पहिलं लक्ष गडचिरोलीत राहणाऱ्या आदिवासींकडे जाण्याऐवजी किंवा धारावीतील झोपडपट्टींवासीयांकडे जाण्याऐवजी शिवाजी पार्कच्या सुशोभीकरणाकडे जातं, तेव्हा त्यांचं वैचारिक अवकाश किती मर्यादित आहे, ते आपल्याला दिसतं. असं मत म्हात्रे यांनी व्यक्त केलं.



पुढे ते म्हणाले की, ''मुंबई-पुणे-नाशिक या गोल्डन ट्रँगलमध्ये ज्या महापालिका येतात, ज्यांचा अर्थसंकल्प सुमारे १ लाख कोटींपेक्षा जास्त आहे, त्या अर्थसंकल्पावर नजर ठेवून ते एकत्र आलेत.''

म्हात्रे यांनी काय टीका केली, त्याकडे आपण दुर्लक्ष करू. पण उद्धव ठाकरे यांची वैचारिक व्याप्ती ही खूपच कमी आहे. हा महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणूनच कोरोना काळात त्यांनी वर्क फ्रॉम होम केलं. कारण उद्धव ठाकरेंना तसा कामाचा अनुभव नाही. हे त्यांनी स्वतःच मान्य केलंय. मात्र काम शिकण्याची त्यांना कदाचित गरजही वाटत नसावी. आता आपण राज ठाकरे यांच्या विधानाकडे येऊया. राज म्हणाले की, मुंबईतील प्रश्न समजून घ्यायचे असतील तर नेता हा मुंबईकर असायला हवा. हा त्यांचा मुद्दा उद्धव ठाकरे यांच्याबाबत अगदी बरोबर आहे. उद्धव ठाकरे हे मुंबईकर असल्याने आणि मुंबईबाहेरच्या समस्या त्यांना माहितीच नसल्याने त्यांनी प्रथम प्राधान्य शिवाजी पार्कला दिलं. पण दुसरी गोष्ट अशी की धारावी सुद्धा मुंबईतच आहे. मग त्यांचं पहिलं लक्ष धारावीकडे का गेलं नाही? म्हणजे राजकारणात प्रदीर्घ काळ घालवल्यानंतरही त्यांना केवळ वांद्रे आणि दादर इथल्या समस्या कळल्यात का? किंवा मातोश्रीच्या आजूबाजूच्या आणि शिवसेना भवनाच्या आसपासच्याच समस्या कळल्यात का? असे काही प्रश्न महाराष्ट्राच्या जनतेला पडतात. राज ठाकरे यांच्या विधानाला फडणवीसांनी उत्तर दिलंय. पण त्या राजकीय जुगलबंदीत आपण सामान्य माणसाने पडू नये.

आपण आपल्या समस्यांना व तर्काला धरून राहूया. राज ठाकरे यांच्या तर्कानुसार प्रत्येक शहराला, प्रत्येक गावाला एक वेगळा मुख्यमंत्री असायला हवा. म्हात्रे यांनी सांगितल्यानुसार जशी उद्धव ठाकरे यांची व्याप्ती आहे, तशी ही राज ठाकरेंची व्याप्ती असावी. पण आज इतके मुख्यमंत्री झाले, पंतप्रधान झाले. मग त्यांनी मुख्यमंत्री वा पंतप्रधान होण्यासाठी कुठे जन्म घ्यावा? सयाजीराव गायकवाड यांचा जन्म मालेगावात झाला. पण पुढे ते बरोड्याचे महाराज झाले आणि त्यांनी उत्तम शासन केले. तुम्ही कुठे जन्माला येता हे महत्त्वाचं नसतं तर तुमची वैचारिक व्याप्ती किती आहे, हे जास्त महत्त्वाचं आहे. तुम्हाला लोकांच्या प्रश्नांची किती जाणीव आहे, याचा अधिक महत्त्व आहे. आज राज आणि उद्धव ठाकरे हे मराठी माणसांचा मुद्दा उपस्थित करत आहेत, पण त्यांना मराठी माणसाच्या समस्या कळल्या आहेत का? मराठी माणसाच्या हातात दगड देऊन त्याचं भलं होणार आहे का? मुंबईत मराठी माणसाची टक्केवारी का कमी झाली? कारण तो पनवेल, नालासोपारा, विरार इथे फेकला गेला. आता तर तो सफाळा, बोईसर, पालघरला चाललाय. कारण मुंबईतील घरे त्याला परवडत नाही. 'घर' हा मराठी माणसासाठी कळीचा मुद्दा आहे. मराठी माणसाला आता १० बाय १० च्या घरात राहायचं नाही. त्याला थोडं सुटसुटीत राहायचंय आणि मुंबई बिल्डरांच्या घशात गेल्यामुळे त्याला इथे घर घेणं जमत नाही. मुंबई बिल्डरांच्या घशात कशी गेली? याचं उत्तर या नेत्यांनी शोधलं पाहिजे. त्यासाठी ते एक प्रयोग करू शकतात. आरशासमोर उभे राहू शकतात. कदाचित त्यांना उत्तर सापडेल. आज बीएमसीच्या माध्यमातून अनेकांना काँट्रॅक्ट मिळतात. किती मराठी काँट्रॅक्टर आहेत, याची यादी द्यावी. मुंबई मेट्रोमुळे आज मुंबईकर मजेत प्रवास करू शकतोय. २० रुपयांत तो अशा ठिकाणी पोहोचतो, जिथे पोहचायला त्याला तासभर लागायचा. ही मेट्रो १० वर्षांपूर्वी मुंबईत यायला हवी होती. मग का नाही आली? मुंबईतले स्वच्छतागृहे का स्वच्छ नाहीत? मुंबईत पूर्वी ठिकठिकाणी स्वच्छतागृहे का उभारली जात नव्हती? पालिका तर त्यांच्याच हातात होती. सांगायचं तात्पर्य असं की राजकीय नेत्यांना आपली वैचारिक व्याप्ती बदलावी लागणार आहे. ती खऱ्या अर्थाने व्यापक करावी लागणार आहे.

आपल्या बंगल्याच्या आवारातून शिवाजी पार्कच दिसणार. उर्वरित मुंबई कशी दिसेल? बंगल्याच्या बाहेरही एक मुंबई आहे. त्या मुंबईच्या काही सकारात्मक गोष्टी आहेत, तशा काही समस्याही आहेत. त्या समस्या केवळ मुंबईत जन्मल्याने कळणार नाही. बंगल्यातून बाहेर पडून जनतेत मिसळल्याने कळणार आहेत. बाकी, शिवाजी पार्कच्या आवारात किती अमराठी लोकांनी घरे घेतली आहेत?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# तांदळात भारताची जागतिक भरारी

भारत हा सर्वांत मोठा तांदूळ उत्पादक देश म्हणून समोर आला आहे. तांदूळ उत्पादनात क्रमांक एकवर असलेल्या चीनला मागे टाकत भारताने कृषी क्षेत्रात अव्वल स्थान पटकावत हा झेंडा रोवला. देशाच्या स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे भारताने दुष्काळाचा सामना केला. अन्न टंचाईमुळे होणारे मृत्यू हे वेदनादायी होते. त्यावेळी भारताने जगातील मित्रराष्ट्राकडे गहू, तांदूळ या प्रमुख खाद्यान्नाची मागणी केली. पण तेव्हाच्या मोठ्या राष्ट्रांनी या मागणीकडे दुर्लक्षच केले. एवढेच नव्हे तर काहींनी आमच्या येथे होणाऱ्या भूकबळींचा उपहास करीत या निमित्ताने लोकसंख्या कमी होत असल्याचे म्हटले. त्या परिस्थितीतवरही भारताने मात केली आणि आता तर ऐतिहासिक कामगिरी करीत भारताने चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक तांदूळ उत्पादक देश म्हणून स्थान मिळवले.

विशेष म्हणजे ही माहिती अमेरिकेच्या यूएसडीए अर्थात युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चरच्या डिसेंबर २०२५ च्या अहवालात नमूद करण्यात आली आहे. जगभरात उत्पादित होणाऱ्या तांदळाच्या उत्पादनापैकी २८ टक्के तांदूळ भारतात होतो. चीनमध्ये १४६ दशलक्ष मेट्रिक टन, तर भारतात १५२ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादन झाल्याची नोंद या अहवालात आहे. म्हणूनच भारत अव्वल ठरल्याचे अहवालात नमूद आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताची कृषी निर्यात ४,५०,८४० कोटींवर पोहोचली. ज्यात तांदळाचा वाटा २४ टक्के होता. बासमती तांदळासह विविध जातींच्या तांदूळ निर्यातीतून सुमारे १,०५,७२० कोटींचे परकीय चलन मिळाले. यावरून तांदूळ उत्पादन वाढ आणि निर्यात अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी आहे हे अधोरेखित होते.

भारताने तांदूळ उत्पादनात चीनला मागे टाकत जगातील पहिला क्रमांक मिळवला, ही बाब कृषिक्षेत्रापुरती मर्यादित नाही; तर हा भारताच्या स्वातंत्र्योत्तर विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. अन्नसुरक्षेच्या प्रश्नावरून आयातीवर अवलंबून असलेल्या देशाने आज जागतिक अन्नपुरवठ्यात निर्णायक भूमिका मिळवणे, हे दीर्घकालीन धोरणात्मक परिवर्तनाचे यश आहे. सर्वाधिक तांदूळ उत्पादनाचे हे यश जगाचा पोशिंदा म्हणविल्या जाणाऱ्या शेतकऱ्याच्या श्रमातून मिळाले यात दुमत असूच शकत नाही. पण या यशात संशोधकांचे भक्कम पाठबळ आणि सरकारची कृषी क्षेत्राबाबत असलेली सकारात्मक दृष्टी याचेही योगदान आहे. स्वातंत्र्यानंतर शेती उत्पादन नेहमीच निसर्गाच्या लहरीवर अवलंबून होते. सिंचनाची सोय, शेती उत्पादनाची साठवणूक, उत्पन्नाला मिळणारा बाजारभाव याची देखील चिंता शेतकऱ्याला सतत छळत असे. तत्कालीन शासनाने याबाबत उपाययोजना केल्या नाहीत असे म्हणणे योग्य नसले तरी त्या-त्या वेळच्या सरकारची भूमिका केवळ तात्पुरती मलमपट्टी करणे अशीच राहिली. दरम्यान, विकसित भारत हे ध्येय घेऊन काम करणारे सरकार स्थापन झाल्यानंतर अनेक निर्णय दूरदृष्टी ठेवून घेण्यात आले. शेतीतील उत्पादन केवळ अन्नाची गरज पूर्ण करणारेच नव्हे तर देशाची अर्थव्यवस्था बळकट करणारे ठरू शकते. ही भूमिका स्वीकारून त्याप्रमाणे सरकारने धोरणे निश्चित केले. नवनवीन वाणांचे संशोधन, रोगप्रतिबंधक उपाययोजना आणि कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारे बीज यासह शेतकऱ्यांच्या लहान-लहान प्रश्नांवर उत्तरे शोधण्यासाठी प्रयोगशाळेतील संशोधन थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यात आले. तर दुसरीकडे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या किमान आधारभूत किंमत व्यवस्थेत पारदर्शकता, सरकारी खरेदी यंत्रणांचे सक्षमीकरण झाल्याने शेतकऱ्यांचा विश्वास वाढला. या सर्व धोरणांचा सकारात्मक परिणाम शेतकऱ्यांना मिळायला लागला. तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांना देखील फायदा झाला आणि तांदूळ उत्पादनात सातत्याने वाढ झाली. म्हणूनच तांदूळ उत्पन्नाची चीनची मक्तेदारी आपल्या देशाने मोडीत काढली. वास्तविक विशाल सिंचन व्यवस्था, यांत्रिकीकरण आणि केंद्रीकृत नियोजन असलेल्या चीनपेक्षा अधिक उत्पादन घेणे हे सोपे नाहीच. पण भारताने हवामानातील वैविध्यता, लहान शेतजमिनी आणि लाखो शेतकऱ्यांच्या सहभागातूनच हे यश मिळवले. हीच भारतीय शेतीची ताकद आहे. उत्पादनाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर येणे म्हणजे व्यवस्थापनाची परिपक्वता आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारताने देशांतर्गत गरजा पूर्ण करून तांदूळ निर्यातीत स्थान मिळविले. अनेक देश अन्नासाठी तांदळाच्या आयातीवर अवलंबून असताना भारत विश्वसनीय पुरवठादार म्हणून समोर येणे ही बाब परराष्ट्र धोरणाला बळकटी देणारी आहे.

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

# आश्वासनांची मिठी आणि विश्वासघात

**नागेश दाचेवार**

कोहिनूर मिल म्हणजे केवळ एक गिरणी नव्हे, तर ती मराठी माणसाच्या घामाची, संघर्षाची आणि मुंबई घडवणाऱ्या श्रमिक परंपरेची ओळख होती. गिरणगावातील हजारो मराठी कुटुंबांची उपजीविका, स्वाभिमान आणि भविष्य या गिरणीशी जोडलेले होते. ती कोहिनूर मिल बंद होताना मराठी कामगारांना आणि स्थानिक रहिवाशांना एक स्वप्न दाखवण्यात आलं. तुमच्याच जागेवर, तुमच्याच हक्काचं घर तुम्हाला मिळेल. हे आश्वासन त्यावेळी स्वत: सत्तेत असलेल्यांनी दिलं, मुंबई महानगरपालिका आणि राज्यात सत्तेवर असलेल्या नेतृत्वाकडून दिलं गेलं.

पण प्रत्यक्षात घडलं काय? मराठी कामगारांना घरे मिळाली नाहीत, पण बिल्डरांना सोन्याची खाण मिळाली. मराठी माणूस 'री-डेव्हलपमेंट'च्या नावाखाली मुंबईबाहेर ढकलला गेला आणि टॉवर्समध्ये परकीय, परप्रांतीय, हिंदीभाषी संपत्तीदारांचीच घरे भरली गेली. आणि आज त्या कोहिनूर मिलच्या जागी उभे असलेले चकचकीत टॉवर पाहिले की एक प्रश्न ठसठसून समोर येतो, मराठी माणसाला घर देण्याच्या नावाखाली नेमका कोण मराठी माणसाच्या पाठीत खंजीर खुपसून गेला? कोणी आश्वासनांची मिठी मारली आणि विश्वासघाताचा वार केला?

**मराठी माणसाच्या पाठीत खंजीर कोणी खुपसला? :** मुंबई हे फक्त महानगर नाही, मराठी माणसाच्या रक्तातून, घामातून आणि संघर्षातून उभी राहिलेली राजधानी आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात १०६ मराठी माणसांनी आपल्या प्राणांची आहुती दिल्यानंतर ही मुंबई महाराष्ट्राच्या नशिबी आली. पण आज, याच मुंबईत मराठी माणूस दुय्यम ठरत चालला आहे. मराठी माणूस परका ठरताना दिसत आहे. हा बदल अचानक घडलेला नाही, तर तो मागील २५ वर्षांच्या सत्ताकाळाचा परिणाम आहे, याकडे डोळेझाक करून चालणार नाही. मुंबई महानगरपालिकेवर सलग अडीच दशके शिवसेनेची, पर्यायाने ठाकरे कुटुंबाची सत्ता राहिली. इतका प्रदीर्घ काळ एखाद्या कुटुंबाकडे सत्ता असताना, ज्यांच्या जिवावर ही सत्ता उपभोगता आली, तो मराठी माणूस अधिक सक्षम व्हायला हवा होता. पण प्रत्यक्षात घडलं उलट. सत्ता टिकली आणि मराठी माणूस हरत गेला. लालबाग, परळ, दादर, गिरगाव ही नावे कधीकाळी मराठी अस्मितेची ओळख होती. गिरणी कामगारांनी उभारलेल्या या मुंबईतून गिरण्या गेल्या, त्यासोबत मराठी माणूसही गेला. उरले ते फक्त गगनचुंबी टॉवर्स आणि बिल्डरांचे फलक. गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळतील ही



आश्वासने हवेत विरली. प्रत्यक्षात मात्र, मराठी कुटुंबांना विरार, बदलापूर, कर्जत, कसाऱ्याच्या दिशेने ढकलले गेले. मुंबई घडवणाऱ्यालाच मुंबईतून हद्दपार करणारी ही कोणती राजवट होती? आणि ती कोणाच्या आशीर्वादाने चालली होती? प्रदीर्घ काळ सत्ता भोगणाऱ्यांना या अस्वस्थतेचा स्पर्शही होत नाही, हे सर्वांत धक्कादायक आहे. इतका दीर्घ काळ सत्ता हातात असताना, जर एखाद्या समाजाची अवस्था सुधारत नसेल, तर प्रश्न अपरिहार्यपणे विचारला जातो, ही सत्ता नेमकी कुणासाठी होती आणि मराठी माणसाच्या पाठीत खंजीर कोणी खुपसला?

**७४ हजार कोटींचे बजेट, मराठी उद्योजक कुठे? :** मुंबई महानगरपालिकेचे बजेट हे अनेक राज्यांच्या नव्हे तर काही देशांच्या बजेटपेक्षा मोठे आहे. गेल्या २५ वर्षांत लाखो कोटी रुपये खर्च झाले. पण या पैशातून किती मराठी उद्योगपती, कंत्राटदार, मोठे ठेकेदार घडले? उत्तर अस्वस्थ करणारे आहे. जवळजवळ कोणीच नाही. नाले, रस्ते, पूल, कचरा व्यवस्थापन सगळी कंत्राटे ठरावीक लॉबीभोवतीच फिरत राहिली. मराठी माणसाला 'अस्मिता'च्या घोषणा देऊन समाधानी ठेवले गेले. पण आर्थिक सत्तेपासून मात्र, कायम दूर ठेवले गेले. ही चूक नव्हे, तर जाणीवपूर्वक आखलेली राजकीय नीती होती, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

मराठी माणसाच्या भविष्यासाठी शिक्षण हा कणा असायला हवा होता. पण पालिकेच्या मराठी शाळा बंद पडल्या, पटसंख्या घटली, गुणवत्ता ढासळली. दुसरीकडे इंग्रजी शाळांचा बाजार फोफावला. निवडणुकांच्या तोंडावर मराठी भाषेचे गोडवे गायचे, पण सत्तेत असताना मराठी शिक्षण व्यवस्थेला वाऱ्यावर सोडायचे हा दुटप्पीपणा मराठी समाजाला आता स्पष्ट दिसू लागला आहे.

आजचा मराठी माणूस मुंबईत काम करतो, पण मुंबईत राहू शकत नाही. पहाटे घराबाहेर पडतो, रात्री उशिरा घरी परततो. चार-पाच तासांचा लोकल प्रवास त्याच्या नशिबी आला आहे. परवडणाऱ्या घरांची कोणती ठोस योजना राबवली गेली नाही. पुनर्विकासात मूळ रहिवाशांना न्याय मिळाला का? की बिल्डर आणि दलालांचीच भरभराट झाली? हे प्रश्न यांना अस्वस्थ करत नाहीत, यातून यांचे अपयश अधोरेखित होते.

**निवडणूक आली की मराठी माणसाची आठवण :** मराठी माणूस हा शब्द निवडणुकीत ओरडून सांगायचा, पण प्रत्यक्षात त्याला मुंबईत टिकवण्यासाठी काहीही करायचं नाही, हा दुटप्पीपणा कोहिनूर मिल प्रकरण, पत्राचाळ प्रकरणात उघड झाला. सत्ता धोक्यात आली की मराठी माणूस, मराठी अस्मिता, मराठी स्वाभिमान हे शब्द पुन्हा बाहेर काढले जातात. पण यावेळी मराठी मतदार बदललेला आहे. तो आता घोषणा नव्हे, तर हिशेब मागतो आहे. २५ वर्षांत काय दिले? घर दिले का? का दिले नाही? नोकऱ्या दिल्या का? आर्थिक ताकद दिली का? कंत्राटे दिले का? पत्राचाळीतील मराठी कुटुंबांना का फसवलं? फसवणूक करणाऱ्यावर कारवाई केली का? का नाही केली? कोहिनूर टॉवरमध्ये एकाही मराठी व्यावसायिकाला जागा का नाही? या प्रश्नांची उत्तरे नसतील, तर भावनिक आवाहनांचा आता उपयोग राहिलेला नाही. मुंबईतील मराठी लोकसंख्या घटत जाणे ही केवळ आकडेवारी नाही, तर ती एका अपयशी राजवटीची साक्ष आहे. मुंबई आपली म्हणण्याआधी, मुंबईत मराठी माणूस टिकवला का?, याचे उत्तर द्यावेच लागेल. मराठी माणूस वापरायचा, पण वसवायचा नाही... ही यांची 'चलाखी' आता मराठी माणूस चांगल्यानं ओळखून आहे. यावेळी निवडणूक केवळ सत्तेसाठी नाही, तर मराठी माणसाच्या भविष्यासाठी असल्याचं दोन्ही बंधूंकडून सांगितलं जात आहे. खरंच आहे, मात्र, आपलं भविष्य कोणाच्या हातात सुरक्षित आहे? याची पूर्ण जाणीव मागील काळात मराठी माणसाला चांगल्याने झाली आहे. आता कोणत्याही आश्वासनांची मिठी मारली तरी हा मराठी माणूस त्याला भुलणार नसून, कोणताही विश्वासघाताचा वार झेलायचा नसल्यानं, मराठी मतदार आता डोळसपणे निर्णय घेणार, हे निश्चित आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### शिक्षकांची ओळख जपली जावी

तरुण भारतमध्ये नुकताच प्रकाशित झालेला 'शिक्षकांना 'गुरुजी'च राहू द्या' हा अग्रलेख अत्यंत समयोचित आणि विचारप्रवर्तक वाटला. एक शिक्षक म्हणून सध्या अनुभवत असलेली व्यथा आणि चिंता या अग्रलेखातून नेमक्या शब्दांत व्यक्त झालेली दिसते. आज शिक्षकांवर अध्यापनाव्यतिरिक्त अनेक प्रकारची प्रशासकीय, डिजिटल आणि सर्वेक्षणात्मक कामे लादली जात आहेत. त्यामुळे शिक्षकाचा वेळ, ऊर्जा आणि मानसिक एकाग्रता यांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे. परिणामी, वर्गातील अध्यापनावर आणि शिक्षणाच्या गुणवत्तेवर त्याचा विपरीत परिणाम होतो आहे. हा प्रश्न केवळ शिक्षकांचा नसून तो थेट विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेला आहे, हे या अग्रलेखाने योग्य प्रकारे अधोरेखित केले आहे.

शिक्षक म्हणजे केवळ उपलब्ध मनुष्यबळ नव्हे; तो समाज घडवणारा घटक आहे. त्याची मुख्य जबाबदारी अध्यापनाची असताना, त्याला सातत्याने इतर कामांत गुंतवणे ही दीर्घकालीन दृष्टिकोनातून शिक्षणव्यवस्थेसाठी घातक बाब ठरू शकते. या वास्तवाकडे शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. या पृष्ठभूमीवर तरुण भारतने या संवेदनशील विषयाला अग्रलेखातून वाचा फोडली, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. कुणावरही दोषारोप न करता, समतोल आणि अभ्यासपूर्ण मांडणी करून समाजाचे लक्ष एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे वेधल्याबद्दल तरुण भारतचे मनःपूर्वक आभार. अशीच जबाबदार आणि जागरूक पत्रकारिता शिक्षणव्यवस्थेला योग्य दिशा देण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल.

**गणेश जोशी**/९४०३१७५६८३

●● ●●

### संक्रांतीचे हळदी-कुंकू आणि मतदान

१५ जानेवारीला महानगरपालिकेची निवडणूक आहे. सोबतच संक्रांतीचे हळदी-कुंकूही आहे. या काळात स्त्रियांचा उत्साह दांडगा असतो. संक्रांतीचे वाण, हलव्याचे दागिने, काळ्या साड्या याने बाजारपेठ सजली आहे. त्यामानाने पाच वर्षांनी येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीचे सामान्य माणसाला विशेष कौतुक नसते. कारण कुणीही निवडून येवो, पळसाला पाने तीन. त्यातच निवडणुकीच्या दिवशी सर्वांनाच सुटी नसते. हळदी-कुंकू, घरचे काम, ऑफिस यात निवडणुकीचे म्हणजे मतदान करणे चौथ्या क्रमांकावर. त्यात ज्येष्ठांची वेगळीच गडबड असते. कोणीतरी येईल व आम्हाला घेऊन जाईल ही अपेक्षा. मतदानात महिलांचा सिंहाचा वाटा असतो. यावेळी मतदान व स्त्रियांचे संक्रांतीचे हळदी-कुंकू एकाच दिवशी आहे. नव्या नवरीचा सण सासर-माहेरचे मिळून दुसऱ्या दिवशी साजरा करतात. हे सर्व सांभाळून किती भगिनी मतदानाला जाणार? मतदान स्त्रियांचा हक्क असला तरी पूर्वापार चालत आलेले सण साजरे करताना स्त्रियांना आनंद, समाधान, परंपरा सांभाळतो याचा अभिमान वाटतो. १५ तारखेला महिलांना मतदान आणि हळदी-कुंकू करताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### युवांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद

१२ जानेवारीला स्वामी विवेकानंदांची जयंती आहे. हाच दिवस आपण राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करतो. स्वामींना अध्यात्माची ओढ लहानपणापासूनच होती. त्यांचे गुरू रामकृष्ण परमहंस यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी आपली साधना सुरू केली. स्वामी विवेकानंदांनी देव, देश आणि धर्म यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले. त्यांनी धर्माचा प्रसार, प्रचार करण्यासाठी भारतभर आणि जगभर भ्रमण केले. १८९३ मध्ये अमेरिकेत शिकागो येथे धर्म परिषद होती. त्याकाळी पश्चिमी देश भारताला तुच्छ लेखत असे. त्या परिषदेत स्वामी विवेकानंदांनी दिलेले प्रवचन (भाषण) जगात अजरामर झाले. भाषणाची सुरुवातच त्यांनी 'माझ्या बंधू आणि भगिनींनो' अशी केली आणि सर्वच भारावून गेले. त्यांनी हिंदू धर्म, अध्यात्म, संस्कार, साहित्य याची ओळख आपल्या ओघवत्या वाणीतून पाश्चात्य जगाला करून दिली. त्यांची आध्यात्मिक साधना असल्यामुळे, वाणीत चैतन्य होते. संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध होऊन त्यांचे विचार ऐकत होते. त्यानंतरही त्यांनी काही वर्षे पाश्चात्त्य राष्ट्रात हिंदू धर्माचा प्रसार, प्रचार केला. न्यू यॉर्कमध्ये वेदांत सिटीची स्थापना केली. तसेच कॅलिफोर्नियात शांती आश्रमाची स्थापना केली. त्यानंतर ते भारतात परतले. इथेही ते सतत भ्रमंतीवर असायचे. भारतात रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशनची स्थापना केली. तेव्हा भारतात ब्रिटिश राजवट होती. त्यांनी देशातील तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित केली. म्हणून त्यांचा जन्मदिवस (१२ जानेवारी) राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा केला जातो.

आजच्या पिढीने स्वामीजींचे विचार वाचले तर त्यांना राष्ट्रधर्माविषयी लहानपणापासूनच प्रेम निर्माण होईल. भारताची सध्याची स्थिती बघता स्वामींच्या विचारांची नितांत गरज वाटते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रधर्मासाठी वाहिले. त्यांचे हे कार्य युगे युगे स्मरणात राहील. अशा या भारत मातेच्या सुपुत्राला कोटी कोटी नमन.

**माधवी पत्की**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सिध्दरामेश्वर यात्रेतील विधींना आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेतील विधींना आज शनिवार, दि. १० जानेवारीपासून प्रारंभ होणार आहे. दरवर्षीप्रमाणे योगदंड पूजन, नंदीध्वजास साज चढविणे, तैलाभिषेक, अक्षता सोहळा, होम प्रदीपन, दारूकाम, नंदीध्वजांचे वस्त्र विसर्जन हे धार्मिक विधी होणार असल्याची माहिती ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महायात्रेचे पहिल्या नंदीध्वजाचे मानकरी राजशेखर हिरेहब्बू यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवार, दि. १० जानेवारी रोजी योगदंडाची पूजा शेटे वाड्यात होणार आहे. शनिवारी सकाळी ८ वाजता मानकरी हिरेहब्बू यांच्याकडे घागरी सुपूर्द केले जाणार आहे. त्यासाठी कसब्यातील कुंभारवाडापासून ते हिरेहब्बू वाडापर्यंत मिरवणुकीने घागरी आणले जाणार आहेत.

रविवारी दि. ११ जानेवारी रोजी रात्री १२.०५ वाजता हिरेहब्बू वाड्यात मानाच्या पहिल्या आणि दुसऱ्या नंदीध्वजास साज चढविण्याचा कार्यक्रम होणार आहे. सोमवार, दि. १२ जानेवारी रोजी श्री सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगांना तैलाभिषेक करुन धार्मिक विधींना प्रारंभ होणार आहे. ही मिरवणूक सकाळी ८ वाजता हिरेहब्बू वाड्यापासून सुरुवात होणार आहे.

मंगळवार, दि. १३ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता हिरेहब्बू वाड्यापासून नंदीध्वज मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. ही मिरवणूक ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरात आल्यानंतर संमती कट्ट्यावर लाखो भाविकांच्या उपस्थितीत अक्षता सोहळा होणार आहे. प्रथेप्रमाणे मकरसंक्रांतीच्या एक दिवस आधी सिद्धेश्वर



महाराजांच्या यात्रेतील अक्षता सोहळा पार पडत असतो. त्यामुळे १३ जानेवारीला सिद्धेश्वर महाराजांच्या योगदंडाशी कुंभार कन्येचा अक्षता सोहळा पार पडणार आहे.बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांतीच्या दिवशी होम मैदानावर होमप्रदीपनाचा समारंभ होणार आहे. गुरुवारी दि. १५ जानेवारी रोजी किंक्रांत असून त्यादिवशी होम मैदानावर शोभेचे दारूकाम होणार आहे. तर शुक्रवारी दि. १६ जानेवारी रोजी नंदीध्वजांच्या वस्त्रविसर्जनाचा कार्यक्रम होणार आहे. या यात्रेसाठी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक येथून जवळपास तीन ते चार लाख भाविक येतात. नंदीध्वजांच्या मिरवणुकीला हिरेहब्बू मठातून सुरुवात होते, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

### मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजशेखर हब्बू यांचे आवाहन

लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या सिध्देश्वर यात्रा सुरक्षितपणे पार पाडावी यासाठी महापालिका निवडणुकीतील उमेदवार, नेते, राजकीय पदाधिकारी कार्यकर्ते व भक्तांनी यात्रेत सहभागी होताना राजकीय बिल्ला लावू नये, असे आवाहन यात्रेतील प्रमुख मानकरी राजशेखर हिरेहब्बू यांनी केले आहे. महापलिका निवडणुक आणि सिध्देश्वर यात्रा ही एकाच वेळी आहे. यात्रेत राजकीय चर्चा करु नये, चर्चेमुळे वाद विवाद निर्माण होतात. त्यामुळे शिस्तीत परंपरेनूसार यात्रा पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन हिरेहब्बू यांनी केले आहे.

### यात्रेचा मतदान प्रक्रियेवर परिणाम नाही

यावेळी राजशेखर हिरेहब्बू यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्याकडून महापालिका निवडणूक लक्षात घेऊन सिध्देश्वर यात्रेबाबतचा संयुक्त अहवाल राज्य निवडणूक आयोग आणि पोलीस महासंचालकांकडे पाठविण्यात आला होता. या अनुषंगाने या दोन्ही विभागांकडून आम्हाला पत्र मिळाले आहे. मतदानाच्या आधी महत्वच्या धार्मिक विधींची सांगता होणार आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी सायंकाळी साडेपाच नंतर नंदीध्वज मिरवणूकीने मार्गस्थ होणार असल्याने मतदान प्रक्रियेवर कोणताही परिणाम होणार नाही.

## महत्वाचे...

### आफताब-ए-सहाफत विभागीय पुरस्कारासाठी ॲड. इक्बाल शेख यांची निवड

**लातूर, दि. ९ जानेवारी-**

साहित्यिक, स्तंभलेखक, कवी, पत्रकार तसेच विधिज्ञ ॲड. इक्बाल रसूलसाब शेख यांना नांदेड येथील खादमीन-ए-उम्मत या स्वयंसेवी संघटनेतर्फे जाहीर करण्यात आलेला आफताब-ए-सहाफत (पत्रकारितेचा सूर्य) विभागीय पत्रकारिता पुरस्कार येत्या १८ जानेवारी रोजी नांदेड येथे एका विशेष समारंभात प्रदान केला जाणार आहे. ॲड. शेख यांच्या कविता व लेखनाचे मराठी व हिंदी वृत्तपत्रांतून नियमित प्रकाशन होत असते. ते स्तंभलेखक असून 'प्रश्नचिन्ह' व 'आँखों देखा हाल' या नावाने प्रसिद्ध होणारे त्यांचे स्तंभलेख वाचकप्रिय ठरले आहेत. गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ ते मराठी व हिंदी पत्रकारितेत सक्रिय असून, सध्या ते विविध वर्तमानपत्रांमध्ये लेखन करीत आहेत. पत्रकारितेसोबतच ते सामाजिक कार्यातही अग्रेसर असून, गेल्या २५ वर्षांपासून 'खिदमत-ए-खल्क' व 'सोशल वेल्फेअर सोसायटी' च्या माध्यमातून सामाजिक कार्यात सतत कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान असून, ऑर्बिट प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल व राहत अकॅडमीच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य ते करीत आहेत.





### विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाकडून बेबी किटचे वाटप

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराज यात्रा व नूतन वर्षाचे औचित्य साधून विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने शासकीय महिला रुग्णालय व इतर रुग्णालय येथे ६० नवजात बालकांना उपयुक्त असणारे बेबी किट वाटप करण्यात आले.मंडळाच्या वतीने दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमास रुग्णालयाचे मान्यवर डॉक्टर्स व स्टाफ, विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे संस्थापक सदस्य विजय शाबादी, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे,ज्येष्ठ नागरिक सिद्धराया होर्तीकर, मध्यवर्ती मंडळ चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव विश्वनाथ आमणे, महिला पदाधिकारी सुरेखा गोब्बूर, सुजाता आमणे आदी उपस्थित होते. मध्यवर्ती मंडळाचे सेक्रेटरी प्रसाद गाजरे यांनी आभार मानले. या उपक्रमासाठी डॉ.प्रशांत दौंड, करजगीकर बंधू, इनामदार परिवार, शाबादी परिवार यांचे विशेष सहकार्य लाभले.



### ऑपरेशन सिंदूर नृत्यातून 'नेताजी'च्या विद्यार्थ्यांनी जागवल्या देशभक्ती

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ऑपरेशन सिंदूर गीतावर बहारदार नृत्य सादर पालकांमध्ये देशभक्ती जागवल्या. हुतात्मा स्मृती मंदिर येथे स्कूलचे स्नेहसंमेलन पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर बहारदार कलाविष्कार सादर करुन पालकांचे मने जिंकली. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुम शेट्टी, विजयकुमार हुल्ले, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार आदींच्या हस्ते श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. सूत्रसंचालन तेजस्विनी जोगीपेठकर यांनी केले तर कीर्ती बुरा यांनी आभार मानले.

## ग्रंथालये ही ज्ञाननिर्मितीची केंद्रे : प्र-कुलगुरू डॉ. दामा

### सोलापूर विद्यापीठातील ग्रंथालय कार्यशाळेत ११० जणांचा सहभाग!



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

आजच्या डिजिटल युगात ग्रंथालये केवळ पुस्तक साठवणूक केंद्र न राहता ज्ञाननिर्मिती, संशोधन आणि नवोन्मेषाची केंद्रे बनली आहेत. ग्रंथपालांची भूमिका अधिक व्यापक होत असून त्यांची क्षमता वाढविणे हे उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

विद्यापीठातील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने आणि पीएम उषा विभागाच्या सहकार्याने आयोजित ग्रंथालय क्षमता विकास कार्यशाळेचा समारोपप्रसंगी डॉ. दामा बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार तसेच वाई येथील डॉ. शिवाजी कांबळे उपस्थित होते.

ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. अनिल घनवट यांनी प्रास्ताविक केले. या कार्यशाळेत विविध महाविद्यालयांमधील ११० ग्रंथपाल, ग्रंथालय कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. यात विद्यापीठातील सेवानिवृत्त संचालक, ग्रंथालय, प्रा. एस. व्ही. लोणीकर व प्रा एस. एस. सूर्यवंशी आणि सेवानिवृत्त वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक श्री पी. टी. रणदिवे व श्री पी. आर. जावळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संतोष माने, महादेव चव्हाण आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वरिष्ठ ग्रंथालय सहायक डॉ. पल्लवी सावंत यांनी केले.

## रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी इंटिग्रेटेड गव्हर्नमेंट ऑनलाइन ट्रेनिंग सेमिनार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने रेल्वे कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकास आणि कौशल्य वाढीच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून ८ जानेवारी २०२६ रोजी इंटिग्रेटेड गव्हर्नमेंट ऑनलाइन ट्रेनिंग कर्मयोगी प्लॅटफॉर्मवर एका सेमिनारचे यशस्वी आयोजन केले. विविध विभागांतील सुमारे ७५ कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात सक्रियपणे सहभाग घेतला.

या सेमिनारमध्ये इंटिग्रेटेड गव्हर्नमेंट ऑनलाइन ट्रेनिंग कर्मयोगी प्लॅटफॉर्मच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आणि दैनंदिन कार्यालयीन कामकाजात कार्यक्षमता व परिणामकारकता वाढवण्यासाठी त्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. सहभागींना प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असलेल्या विविध अभ्यासक्रमांची माहिती



देण्यात आली, ज्यात रेल्वे-विशिष्ट, तांत्रिक, गैर-तांत्रिक आणि इतर अभ्यासक्रमांचा समावेश आहे. सहज प्रवेश सुलभ करण्यासाठी अभ्यासक्रम पाहणे आणि नोंदणी करण्याची थेट प्रात्यक्षिक देखील सादर करण्यात आले.

सेमिनारदरम्यान यावर जोर देण्यात आला की, सर्व स्तरांवर सर्वसमावेशक क्षमता विकास सुनिश्चित करण्यासाठी, इंटिग्रेटेड गव्हर्नमेंट ऑनलाइन ट्रेनिंग कर्मयोगी उपक्रमाची माहिती क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसह प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचली पाहिजे. सध्याच्या निर्देशानुसार, निर्धारित अभ्यासक्रम पूर्ण करणे हे वार्षिक कार्यप्रदर्शन मूल्यांकन अहवालाशी जोडलेले आहे, अशी माहितीही सहभागींना देण्यात आली.

मिशन कर्मयोगी, जो नागरी सेवा क्षमता विकासासाठी राष्ट्रीय कार्यक्रम आहे, याचा उद्देश भारताच्या विकासाच्या प्राधान्यक्रमांशी आणि २०२७ पर्यंत विकसित भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत, सक्षम आणि भविष्यासाठी सज्ज अशी नागरी सेवा तयार करणे आहे.

## पैशाच्या वादातून महिलेवर हल्ला; चार जणांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पैशाच्या वादातून एका महिलेवर मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




फिर्यादी श्रीदेवी कल्याणी कुंभार वय ४५, रा. मित्रनगर, शेळगी, सोलापूर या ६ जानेवारी रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास आपल्या घरात असताना आरोपी कल्याणी कुंभार, विनायक कुंभार, अजय कुंभार व दिपाली कुंभार यांनी खर्चासाठी पैसे देण्याच्या कारणावरून त्यांना घाण घाण शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी आरोपी कल्याणी कुंभार यांनी तु घरात कशी राहतेस ते पाहतोच अशी धमकी देत हातातील चांदीच्या कड्याने फिर्यादीच्या कपाळावर मारून जखमी केले. या प्रकरणी ८ जानेवारी रोजी दुपारी २.३५ वाजता जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जगताप हे करीत आहेत.

## आजच्या युवकांच्या हाती उद्याच्या भारताचे भवितव्य : न्यायाधीश प्रशांत पेठकर

### कायदेविषयक शिबीर उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ९ जानेवारी-**

आजच्या युवकांच्या हाती उद्याच्या भारताचे भवितव्य असून हे युवक समाजात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडू शकतात. कायदा हा लोकशाहीचा कणा असून आजच्या युवकांनी कायदे दूत म्हणून भूमिका बजावावी, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रशांत पेठकर यांनी केले.

युवा दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा हे होते. या प्रसंगी व्यासपीठावर सचिव तथा न्यायाधीश प्रशांत पेठकर, लोक अभीरक्षक शिवकैलास झुरळे, सामाजिक कार्यकर्त्या ॲड. सरोजिनी तमशेट्टी, पोलीस हेड कॉन्स्टेबल अंजली काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

युवकांनी सोशल मिडीयाचा वापर जागरुकतेने, जबाबदारीने व सुरक्षित मार्गाने करावे जेणेकरून डिजिटल अरेस्ट होणार नाही असे मत सायबर सुरक्षा या विषयावर बोलताना प्रांजली काळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर हे तरुणांचे भान जपण्यासाठी व जबाबदार युवक घडण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल असे मत व्यक्त केले.

### युवा दिनानिमित्त निबंध स्पर्धा

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित निबंध स्पर्धेत गायत्री मेट्रे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, द्वितीय क्रमांक अक्षता शिवशरण, तृतीय क्रमांक समीक्षा थोरा, उतेजनार्थ सानिया नायडू व कर्तव्या बालसराफ यांनी पटकविले. विजेत्यांना प्रशस्तीपत्र व पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my name is **Dhanaji Uttareshwar Dhawale** and **Dhanaji Uttareshwar Dhavle**. Both the names are the same person. Address :- At-Malegaon, Post-Tembhurni, Tal. Madha, Dist. Solapur. Pin - 413211

## बालकास मोटार सायकलस्वाराची धडक; गंभीर जखमी

**मंगळवेढा दि.९ जानेवारी-**

हाजापूर येथे शाळेला निघालेल्या लहान मुलास मोटर सायकल चालकाने निष्काळजीपणे मोटर सायकल चालवून जोराची पाठीमागून धडक देवून गंभीर जखमी केल्याप्रकरणी गणेश युवराज गळवेविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस दिलेली माहिती अशी, १७ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता फिर्यादी चरणसिंग रजपूत यांची मुलगी जान्हवी, मुलगा रणवीर हे शाळेला जाण्यासाठी निघाले असता हाजापूर जाणाऱ्या रोडवर ते आल्यावर मोटर सायकल चालक तथा आरोपी गणेश गळवे याने मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ ए.एच.५१४१ ही भरधाव वेगाने चालवून मुलगा रणवीर हा बालवाडीकडे निघाला असता त्याला पाठीमागून धडक देवून गंभीर जखमी केले. याचा अधिक तपास पोलीस हवालदार ताटे हे करीत आहेत.

**महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, (मुंबई), खंडपीठ पुणे यांचे कार्यालय**
**पी.एम.टी. बिल्डींग, ३ रा मजला, स्वारगेटजवळ, पुणे-४११०४२,**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

किरकोळ अर्ज क्र. ५९/२०२५

**सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, महावीर पथ, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर** - अर्जदार

विरुध्द

**१. श्री. धनाजी भिमराव जाधव रा. खंडाळी, ता. माळशिरस, जि. सोलापूर** - जाब देणार

अर्जदार यांनी दाखल केलेल्या कामात जाब देणार क्र. १ यांचा पत्ता उपलब्ध होत नसल्यामुळे जाहोर तोटीस देत आहेत. उपरोक्त निर्दिष्ठ अपिलाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक १८/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता पुणे येथे खाली नमूद केलेल्या सुनावणीच्या ठिकाणी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

**पुणे- पी.एम.टी. बिल्डींग, आयकर कार्यालयासमोर, स्वारगेटजवळ, पुणे-४११०४२.**

सदर नोटीशीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाब देणार क्र. १ वरील दिनांकास व वेळेस उपस्थित न राहील्यास आपले काहीही म्हणणे नाही असे समजून, आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी घेण्यात येईल व तसेच वरील दिनांकास अगर तत्पूर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रह समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २३/१२/२०२५ रोजी माझी सही व शिक्क्यानिशी दिली असे.

**सही/-**
**मुख्य लिपीक/अकौंटंट**
**महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, (मुंबई), खंडपीठ पुणे**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (विद्युत अभियंता) यांनी रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/20R कामाचे नाव: सोलापूर विभागातील टर्नआउट्स आणि क्रॉसओव्हरवर 105 चौरस मिमी जंपर्सच्या जागी 160 चौरस मिमी जंपर्स प्रदान करून OHE चे अपग्रेडेशन. (पुनर्निविदा) अंदाजे किंमत : रु. 2,09,93,886/- बयाणा रक्कम : रु. 2,55,000/- पूर्ण कालावधी: 12 महिने. निविदा ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 02/02/2026 दुपारी 15:00 वाजता. ANJ-01

**तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्याकडून मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (विद्युत अभियंता) यांनी रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/21R कामाचे नाव: सोलापूर विभागातील दौंड-भिगवण आणि कलबुर्गी-वाडी विभागांच्या OHE मध्ये MCI फिटिंग्ज कॅन्टीलिव्हर ब्रॅकेट असेंब्ली फोर्ड फिटिंग्जने बदलून सुधारणा करणे. (पुनर्निविदा) अंदाजे खर्च: रु. 3,05,14,570/- बयाणा रक्कम: रु 3,02,600/- पूर्ण कालावधी: 12 महिने. निविदा ऑफरची वैधता: ६० दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 03/02/2026 दुपारी 3:00 वाजता. ANJ-02

**तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा.**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**आर्थिक मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या अंमलबजावणीच्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांची कर्जे आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आली. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 142918005 | मालमत्तेवर कर्ज | 1. इब्राहिम महमद शेख 2. चाँदबी इब्राहिम शेख 3. मुमताज शेख 4. रेहाना नदाफ 5. सुल्ताना आसिफ नदाफ | 11/11/2025 | INR 23,73,178.86/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत घर असलेल्या स्थावर मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल मालमत्ता क्रमांक 2827, सर्व्हे क्रमांक 1001/2A/1 येथे स्थित, मंद्रुप गावाच्या अधिकार क्षेत्रात, तालुका: दक्षिण सोलापूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-413221, सोलापूर महानगरपालिकेच्या स्थानिक मर्यादेपलीकडे, आणि अधिक तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणे आहे: मालमत्तेमध्ये समाविष्ट आहे - 1. प्लॉट क्रमांक 33, 127.66 चौ. मीटर, पूर्व-पश्चिम लांबी दोन्ही बाजूंना अंदाजे 9.00 मीटर आणि दक्षिण-उत्तर लांबी पूर्वेला 14.51 मीटर आणि पश्चिमेला 13.86 मीटर; आणि 2. प्लॉट क्रमांक 32 चा पूर्वेला भाग, 60.93 चौ. मीटर. माउंट, दोन्ही बाजूंना पूर्व-पश्चिम लांबी 4.50 मीटर आणि दक्षिण-उत्तर लांबी 13.86 मीटर पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे 13.22 मीटर; एकत्रितपणे एकूण 188.59 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेले, स्थित, **चतु:सिमा खालीलप्रमाणे :-** पूर्व: प्लॉट क्रमांक 34, पश्चिम: अमीन रमजान नदाफची जमीन (प्लॉट क्रमांक 32), उत्तर: गट क्रमांक 1001/B/1, दक्षिण: रस्ता.

या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे त्यांच्या संबंधित तारखांपासून करारित व्याजदरासह रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी येथे नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 10/01/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**SHREE PANDURANG SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD.,**
SHREEPUR-413 112, TAL- MALSHIRAS DIST. SOLAPUR (Maharashtra)
**Phone-** (02185)255233, 255344, Fax- 255435
**Email :** spssk_sugar@yahoo.com & spssk_sale@yahoo.com
**Website -** www.pandurangsugar.com

**TENDER NOTICE**

**SALE OF SUGAR FOR EXPORT**

Sealed tenders are invited for Export of White Crystal Sugar against export policy declared by Central Government of India, from Recognized exporters, those are having IEC No. and registration with GST, DGFT & APEDA.

| Sr. No. | Particulars | Sugar Specifications |
|---|---|---|
| 1 | Grade | S2-30 White Sugar |
| 2 | Production Year | 2025-2026 |
| 3 | Quantity | 5060.0 MT |
| 4 | Packing | 50Kg pp Bags inner lining |
| 5 | Icumsa | 2025-2026 Below 100 Method-10 |
| 6 | Rate | To be quoted Ex-Mill |
| 7 | EMD | Rs. 5000/- per MT. against Confirmation |
| 8 | Inspection/ Transportation | To buyers account |
| 9 | Subsidy | If any announced by State & Central Govt. will be on account of Sugar Factory. |

**Other Terms and condition for export.**
1. GST/ Central Excise "No default Certificate" is essential.
2. Exporter shall mention the name of country, where sugar will be export.
3. All Terms and conditions export policy declared by Central Government Season 25-26 (15 LMT.) dated 14th November, 2025 And other related export terms and conditions binding on exporter.
4. All tenders should be reached at our Factory site on or before 30/01/26 upto 3.00 PM by way of E-Mail / post or by hand

**Note - 1)** Quantity of White sugar may be changed as per government Quota and rate availability.
**2)** Management reserves all the rights to any changes in above terms and accept or reject any or all the tenders and cancel this tender without any reasons thereof.

**KAILAS KHULE** Vice-Chairman
**DR.YASHWANT KULKARNI** Managing Director
**PRASHANTRAO PARICHARAK** Chairman

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### बडोदा शहरावर रोहित-कोहलीची क्रेझ

**बडोदा** : भारतातील सर्वात जुन्या क्रिकेट केंद्रांपैकी एक व पूर्वीचे एक संस्थान असलेल्या बडोदा शहरात भारतीय पुरुष क्रिकेटपटूंची एक झलक पाहण्यासाठी हजारो चाहते एका हॉटेलबाहेर संयमाने वाट पाहत होते, असे दृश्य जवळपास १५ वर्षांपूर्वी दिसले होते. भारतीय संघ मुक्कामास असलेल्या हॉटेलबाहेरील रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. रस्त्यावरील लोक आधुनिक काळातील महान खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्याकडून अभिवादन मिळवण्याच्या आशेने गर्दी करत आहेत. केवळ बडोद्याचे रहिवासीच रोहित-कोहली या क्रेझने भारावले आहेत असे नाही. पुढील आठवड्यात, न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारत तयारी करत असताना, ही क्रेझ संपूर्ण देशात आणि कदाचित क्रिकेट जगतातही पसरणार आहे.

### किर्गिओस ऑस्ट्रेलियन ओपन एकेरी सामने खेळणार नाही



**सिडनी** : मी या महिन्याच्या ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत एकेरी सामने खेळणार नाही, कारण मी पाच-सेटचे सामने खेळण्यासाठी सज्ज नाही, असे विम्बल्डनचा माजी उपविजेता निक किर्गिओसने शुक्रवारी सांगितले. ३० वर्षीय किर्गिओस २०१५ मध्ये आपल्या घरच्या ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला होता, परंतु अलीकडच्या हंगामात त्याला अनेक दुखापतींशी झुंजावे लागले आहे, तो या स्पर्धेत केवळ दुहेरी सामने खेळेल. ही स्पर्धा १८ जानेवारीपासून मेलबर्न पार्कमध्ये सुरू होत आहे. किर्गिओसची जागतिक क्रमवारीत ६७० व्या क्रमांकावर घसरण झाली आहे आणि त्याला एकेरी सामने खेळण्यासाठी वाईल्डकार्डची आवश्यकता असती. स्टॅन वावरिंकाला वाईल्डकार्ड देण्यात आले आहे. या हंगामाच्या शेवटी निवृत्त होण्यापूर्वी तीन वेळा ग्रँड स्लॅम विजेत्याची ही या स्पर्धेतील शेवटची उपस्थिती असेल, असे टेनिस ऑस्ट्रेलियाने (टीए) शुक्रवारी सांगितले.

### मुंबई मॅराथॉनमध्ये विक्रमी ६९,१०० स्पर्धकांचा सहभाग

**मुंबई** : ६९ हजारहून अधिक धावपटूंनी मुंबई मॅराथॉन २०२६ मध्ये आपला सहभाग निश्चित केला आहे. धावपटूंच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आशियातील सर्वात प्रभावी सहभागात्मक क्रीडा चळवळ म्हणून या स्पर्धेचा दर्जा अधोरेखित होतो. प्रोकॅम इंटरनॅशनलद्वारे आयोजित या शर्यतीची २१ वी आवृत्ती १८ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. वर्ल्ड ॲथ्लेटिक्स गोल्ड लेबल शर्यत असलेल्या मुंबई मॅराथॉनमध्ये विक्रमी ६९,१०० स्पर्धक सहभागी होतील, यात प्रत्यक्ष मैदानावर ६५ हजार ४०० हून अधिक धावपटू आणि व्हर्च्युअल रनमध्ये ३,७०० हून अधिक जण सहभागी होतील. या वर्षी अनेक महत्त्वाच्या टप्प्यांवरून या स्पर्धेची सातत्यपूर्ण वाढ दिसून येते. तब्बल १४,०५९ धावपटू प्रथमच पूर्ण मॅराथॉनचे अंतर धावण्याचा प्रयत्न करतील, तर हाफ मॅराथॉन आणि ओपन १० किमी गटांमध्येही सहभाग वाढला आहे.

### के. लालरेमरुआटा निधनाबद्दल बीसीसीआयला दुःख

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने मिझोरामचे माजी रणजी खेळाडू के. लालरेमरुआटा याच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. स्थानिक क्रिकेट सामन्यादरम्यान कोसळल्यानंतर बुधवारी त्याचे निधन झाले. मिझोरामचा क्रिकेटपटू के. लालरेमरुआटा यांच्या निधनाने आम्ही खूप दुःखी आहोत. त्याने रणजी करंडक व सय्यद मुश्ताक अली चषकामध्ये अभिमानाने मिझोरामचे प्रतिनिधित्व केले. बीसीसीआय आपल्या कुटुंबियांना, मित्रांना आणि मिझोराम क्रिकेट समुदायाला मनःपूर्वक शोकसंवेदना, सहानुभूती आणि प्रार्थना व्यक्त करते, असे बीसीसीआय डोमेस्टिकने एक्सवर शेअर केले.

### जादुमणी, पवन अंतिम फेरीत

**नवी दिल्ली, ९ जानेवारी**

गौतम बुद्ध विद्यापीठ, ग्रेटर नोएडा येथे शुक्रवारी झालेल्या एलिट पुरुष आणि महिला राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेत जादुमणी सिंगने पुरुष ५० ५५ किलो गटाच्या उपांत्य फेरीत २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता अमित पांघालवर वर्चस्व गाजवत अंतिम फेरीत प्रवेश केला. पवन बर्तवालनेही सहज विजय मिळवत अंतिम फेरीत जादुमणीशी रोमांचक लढतीची शक्यता निर्माण केली आहे. उपांत्य फेरीत, जादुमणीने अमित पांघालवर ५-० असा एकतर्फी विजय नोंदवला, तर पवन बर्तवालने मणिपूरच्या व्हिक्टर सिंगवरही त्याच फरकाने विजय मिळवला. दरम्यान, अखिल भारतीय पोलिसांची विश्वविजेती मीनाक्षी (महिला ४५-४८ किलो) हिने मध्य प्रदेशच्या मलिका मोरला ५:० ने पराभूत केले, तर दोन वेळची माजी विश्वविजेती निखत झरीन (४८-५१ किलो) हिने उत्तर प्रदेशच्या कुसुम बघेलविरुद्ध ४:१ च्या स्प्लिट निर्णयाने उपांत्य फेरी जिंकली.

# सिंधूची उपांत्य फेरीत धडक

**मलेशिया ओपन बॅडमिंटन**



**क्वालालम्पूर, ९ जानेवारी**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू शुक्रवारी येथे आयोजित मलेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचली. जपानची तिची प्रतिस्पर्धी अकाने यामागुची दुखापतीमुळे उपांत्य फेरीतून निवृत्त झाली.

सिंधूने सुरुवातीचा गेम २१-११ असा जिंकला, त्यानंतर तीन वेळा विश्वविजेती व तिसरी मानांकित यामागुचीने गुडघ्याचे ब्रेस घातले होते आणि नंतर तिने सामन्यातून माघार घेण्याचा निर्णय घेतला.

या विजयामुळे जागतिक क्रमवारीत १८ व्या क्रमांकावर असलेल्या सिंधूचा तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या यामागुचीविरुद्धचा हेड-टू-हेड रेकॉर्ड १५-१२ असा झाला.

दुखापतीतून दीर्घकाळ विश्रांती घेतल्यानंतर सिंधू आपल्या पहिल्याच स्पर्धेत भाग घेत आहे.

उपांत्य फेरीत सिंधूचा सामना दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या वांग झियी व इंडोनेशियाच्या सहाव्या मानांकित पुत्री कुसुमा वर्दानी यांच्यातील लढतीतील विजेत्याशी होईल.

दिवसाच्या उत्तरार्धात, भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी यांची गाठ इंडोनेशियाच्या फजर अल्फियान आणि मुहम्मद शोहिबुल फिक्री यांच्याशी पडेल. (वृत्तसंस्था)

**सात्त्विक-चिराग पराभूत**

दिवसाच्या उत्तरार्धात भारताच्या सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या अव्वल पुरुष दुहेरी जोडीचे पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत आव्हान संपुष्टात आले. या भारतीय जोडीला इंडोनेशियाच्या फजर अल्फियान आणि मुहम्मद शोहिबुल फिक्री या जोडीकडून १०-२१, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला.

# युपी वॉरियर्स गुजरातविरुद्ध विजयी सुरुवात करण्यास उत्सुक

**महिला प्रीमियर लीग**

**मुंबई, ९ जानेवारी**

युपी वॉरियर्झ आणि गुजरात जायण्ट्स या दोन्ही संघांसाठी एक नवीन अध्याय सुरू होत आहे. हे दोन्ही संघ शनिवारी नवी मुंबईत आपल्या महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) मोहिमेची सुरुवात करणार आहेत. गत हंगामातील भिन्न कामगिरीनंतर दोन्ही संघ पहिल्या विजेतेपदाच्या शोधात आहेत.

युपी वॉरियर्स संघ नवीन कर्णधार मेग लॅनिंगवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असेल. लॅनिंगच्या नेतृत्वाखाली दिल्ली कॅपिटल्सने सलग तीन अंतिम सामने गाठले होते. पहिल्या तीन हंगामांमध्ये संघ तिसऱ्या, चौथ्या आणि नंतर तळाच्या स्थानावर राहिला होता, ही घसरण थांबवण्याचे आव्हान तिच्यासमोर असेल.

या ऑस्ट्रेलियन महान खेळाडूच्या आगमनामुळे अशा संघाला स्पष्टता आणि शांतता मिळेल अशी अपेक्षा आहे. गत वर्षी कर्णधार ॲलिसा हिलीच्या अनुपस्थितीत हा संघ संतुलन आणि सातत्यासाठी संघर्ष करीत होता.

युपी वॉरियर्स संघात शिप्रा गिरी ही एकमेव विशेषज्ञ पर्याय आहे. फलंदाजीच्या आघाडीवर फोबी लिचफिल्ड लवचिकता प्रदान करते. ती किरण नवगिरेसोबत सलामीला येऊ शकते. लॅनिंग आणि हरलीन देओल यांचा समावेश असलेली मधली फळी धावा उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

सोफी एक्लेस्टोन, दीप्ती शर्मा, अनुभवी शिखा पांडे व क्रांती गौडसारख्या खेळाडूंच्या उपस्थितीमुळे युपी वॉरियर्सकडे एक प्रभावी गोलंदाजी आक्रमण आहे.

दुसरीकडे, गुजरात जायण्ट्स दोन निराशाजनक हंगामानंतर गेल्या वेळी प्लेऑफमध्ये पोहोचल्यामुळे नव्या आत्मविश्वासाने मैदानात उतरत आहे. ॲशले गार्डनरच्या नेतृत्वाखालील गुजरात जायण्ट्स संघात परदेशी खेळाडूंचा एक मजबूत गाभा आहे, परंतु त्यांच्याकडे आघाडीची भारतीय फलंदाज नाही.

यष्टिरक्षणाची जबाबदारी व सलामीची भूमिका बेथ मुनी सांभाळेल, तर सोफी डिव्हाईन २०२५ च्या हंगामाला मुकल्यानंतर पुन्हा डब्ल्यूपीएलमध्ये परतली आहे. रेणुका सिंग ठाकूरच्या नेतृत्वाखालील वेगवान गोलंदाजीचा मारा किम गार्थ आणि काश्वी गौतमच्या पाठिंब्यामुळे संतुलित दिसतो. गार्डनर, जॉर्जिया वेअरहॅम, राजेश्वरी गायकवाड व तनुजा कंवर यांच्या रूपाने फिरकी गोलंदाजीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

दोन्ही संघ संक्रमणाच्या अवस्थेत असल्याने, शनिवारचा सामना त्यांच्या संबंधित मोहिमांसाठी दिशा ठरवू शकतो. (वृत्तसंस्था)

**युपी वॉरियर्स वि. गुजरात जायण्ट्स**
**स्थळ** : डी. वाय. पाटील स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



युपी वॉरियर्स कर्णधार मेग लॅनिंग आणि ॲशले गार्डनर

## हनी सिंगच्या लुंगी डान्स गाण्यावर स्टेडियममधील प्रेक्षकही थिरकले

### महिला प्रीमियर लीगचा थाटात शुभारंभ

**मुंबई, ९ जानेवारी**

रॅप गायक हनी सिंगने नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर आपल्या पार्टी ऑल नाईट या हिट गाण्याने महिला प्रीमियर लीग क्रिकेटचा उद्घाटन सोहळा थाटात पार पडला. यावेळी अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस आणि हरनाज कौर संधू त्याच्यासोबत व्यासपीठावर सहभागी झाल्या आणि मुंबई इंडियन्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातील हंगामातील पहिल्या सामन्यापूर्वी प्रेक्षकांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

हनी सिंगने रंगमंचावर प्रवेश केला आणि त्याने लुंगी डान्स गाणे सादर केले. या गाण्यावर डी. वाय. पाटील स्टेडियममधील प्रेक्षक थिरकले. गाणे वाजत असताना ही त्रिकूट एकत्र दिसली व थिरकली.

यावेळी हनी सिंगने आपल्या लोकप्रिय ब्लू आईज या गाण्याचे सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली.

डब्ल्यूपीएलच्या उद्घाटन समारंभानंतर नाणेफेक करण्यात आले, यात आरसीबीची कर्णधार स्मृती मंधानाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. (वृत्तसंस्था)

## स्टॅन वावरिंका, थॉम्पसन, ओकॉनेलला वाईल्डकार्ड

**मेलबर्न** : माजी विजेता स्टॅन वावरिंका आणि ऑस्ट्रेलियन खेळाडू जॉर्डन थॉम्पसन व ख्रिस ओकॉनेलला ऑस्ट्रेलियन ओपनच्या मुख्य ड्रॉसाठी वाईल्डकार्ड देण्यात आले आहेत. ही स्पर्धा १८ जानेवारीपासून मेलबर्न पार्क येथे सुरू होत आहे. वावरिंकाने आपल्या तीन ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदांपैकी पहिले विजेतेपद २०१४ च्या ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये जिंकले होते, त्याच हंगामात त्याने जागतिक क्रमवारीत तिसरा क्रमांक पटकावला होता. वावरिंकाची ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये एकेरीच्या सामन्यांमध्ये खेळम्याची २० वी वेळ आहे.

## सूरमा हॉकी क्लबची हैदराबाद तुफान्सवर मात

**चेन्नई** : शुक्रवारी चेन्नई येथील महापौर राधाकृष्णन हॉकी स्टेडियमवर झालेल्या पुरुष हॉकी इंडिया लीग २०२५-२६ च्या सामन्यात, सूरमा हॉकी क्लबने निर्धारित वेळेत १-१ अशी बरोबरी साधल्यानंतर हैदराबाद तुफान्सविरुद्ध पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये ३-१ असा रोमांचक विजय नोंदवला. सूरमा हॉकी क्लबसाठी कर्णधार हरमनप्रीत सिंगने (२० व्या मिनिटाला) गोल केला, तर हैदराबाद तुफान्ससाठी अमनदीप लाक्राने (४६ व्या मिनिटाला) गोल केला.

पहिल्या चरणात दोन्ही संघांनी अनेकदा प्रतिस्पर्ध्याच्या क्षेत्रात प्रवेश केला आणि गोलच्या संधी निर्माण केल्या, परंतु दोन्ही बाजूंच्या बचावपटूंनी चिवट बचाव करत सर्व आक्रमण परतवून लावले. सूरमा हॉकी क्लबने सामन्याची जोरदार सुरुवात केली

# महाराष्ट्राला सागरी जलतरण,कबड्डी, सॉकरमध्ये कांस्य

### दुसरी खेलो इंडिया बीच स्पर्धा

**दीव, दि. ९ जानेवारी-**

खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सागरी जलतरण, कबड्डी व सॉकरमध्येही कांस्यपदकांची लयलुट केली आहे. सागरी जलतरणात साताऱ्याच्या दिक्षा यादवचे रौप्यपदक अवघ्या ७ दशांश सेकंदाने हुकले. पुरूषाच्या बीच कबड्डीत केवळ ३ गुणांनी महाराष्ट्र उपांत्य फेरीत पराभव स्वीकारावा लागला.

दीवमधील अरबी समुद्रात सकाळच्या सत्रात १० कि.मी. सागरी जलतरणाचा थरार रंगला. महिलांच्या गटात सुरूवातीपासून महाराष्ट्राच्या २० वर्षीय दिक्षा यादवे मुसंडी मारली होती. दुसऱ्या फेरीत ती मागे पडली. अखेरच्या टप्प्यात २.४८.०४ वेळ नोंदवून तीने कांस्य पदकाचा पल्ला गाठला. अवघ्या ७ दशांश सेकंदाने कर्नाटकच्या असरा सुधीरने रौप्य पदक तर २.४६.३४ वेळेत कर्नाटकच्याच अश्मिता चंद्राने सुवर्णपदकावर नाव कोरले.



गतवर्षी याच प्रकारात दिक्षाने सुवर्णपदकाला गवसणी घातली होती. साताऱ्यातील दिक्षा ही पुण्यातील शासनाच्या क्रीडा प्रबोधिनीत सराव करते. खेलो इंडिया विद्यीपीठ स्पर्धा, खेलो इंडिया युवा स्पर्धा तर खेलो इंडिया बीच स्पर्धेत १६ पदके जिंकण्याचा पराक्रम तीने केला आहे. महाराष्ट्रातील विजेत्यांची भेट घेत पथकप्रमुख नवनाथ फडतरे यांनी अभिनंदन केले आहे.

घोघला समुद्र किनाऱ्यावर रंगलेल्या बीच सॉकर मैदानात महाराष्ट्राच्या मुलांनी साखळी लढतीत चमकदार कामगिरी करत उपांत्य फेरीत मुसंडी मारली होती. उपांत्य लढतीत बलाढ्य केरळकडून १६-१ गोलने महाराष्ट्र पराभूत झाला. या कामगिरीमुळे सलग दुसऱ्या वर्षी कांस्य पदकावर महाराष्ट्राला समाधाव मानावे लागले. बीच कबड्डीतील पुरूषांची महाराष्ट्र विरूध्द हरियाणा लढत लक्षवेधी ठरली. पूर्वार्धात अभिषेक गुंगेसह सुरज दूंदळे यशस्वी चढाय्या करीत लढतीत चुरस कायम राखली होती. पूर्वार्धात १५-१७ गुणांनी हरियाणा आघाडीवर होता. हीच आघाडी निर्णायक ठरली. उत्तरार्धात तुल्यबळ खेळाचे प्रदर्शन करीत शेवटच्या मिनिटापर्यंत ३०-३० बरोबरी करण्यात महाराष्ट्र यशस्वी ठरला होता.

शेवटच्या मिनिटाला हरियाणाने यशस्वी चढाई करीत महाराष्ट्राला ३ गुणांनी पराभूत करीत ३३-३० गुणांनी बाजी मारली. महिलांच्या उपांत्य सामन्यात राजस्थानकडून महाराष्टाला ५६-२८ गुणांनी पराभूत व्हावे लागले. उपांत्य फेरीतील अपयशामुळे महाराष्ट्राच्या दोन्ही संघाला कांस्यपदकावरच खेलो इंडिया मोहिमाचा समारोप करावा लागला आहे.

## सोलापूरचे राजमहेंद्र येमुल राष्ट्रीय बेंचेस स्पर्धेत प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी -**

फिरादाबाद हरियाणा येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत सोलापूरचे राजमहेंद्र येमुल यांनी सुवर्णपदक पटकाविले.

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज आयोजित जिल्हा बेंच प्रेस स्पर्धेत त्याचबरोबर सोलापूर जिल्हा पावर लिफ्टिंग असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये ही त्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले होते. त्यानंतर राष्ट्रीय स्पर्धेमध्ये मास्टर थ्री मध्ये ८३ किलो वजन गटामध्ये त्यांनी १०५ किलो वजन उचलत सुवर्णपदक प्राप्त केले. त्यांना प्रा. संतोष गवळी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल मराठा समाज सेवा मंडळचे संचालक डॉ. सुरेश पवार, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे नूतन प्राचार्य डॉ. मोटे यांनी अभिनंदन केले.



## हिंगुलांबिका प्राथमिक शाळेची ऋतुजा वेदपाठक कराटे स्पर्धेत अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

साखर पेठ येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिलीची ऋतुजा वीरेंद्र वेदपाठकने जिल्हा कराटे स्पर्धेत अजिंक्यपद पटकाविले. राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे आयोजित जे.के.एस. सोलापूर डिस्ट्रिक्ट कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत तिने ही कामगिरी केली. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष बापू ढगे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राथमिकचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे, माध्यमिकचे मुख्याध्यापक गोपी नवले, पर्यवेक्षक शंकर गिरी गिरी व पालक उपस्थित होते.


## 'संगमेश्वर'चा विशाल टेकाळे विद्यापीठ संघात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**



संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या विशाल समाधान टेकाळे याची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या हँडबॉल संघात निवड झाली. जयपूर राजस्थान येथे ८ ते १२ जानेवारी होणाऱ्या पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ हँडबॉल स्पर्धेत तो भाग घेईल. अंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेतून त्याची निवड झाली. त्यास रात्र महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा शरण वांगी, जिमखाना विभाग चेअरमन डॉ. आनंद चव्हाण प्रा. विक्रांत विभुते, प्रा. संतोष खेंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ.एस. डी गोठे आदींनी अभिनंदन केले.

# माळशिरसमध्ये राष्ट्रीय शुटींग बॉल स्पर्धेस सुरूवात



माळशिरस : राष्ट्रीय शुटींग बॉल स्पर्धेतील हरियाणा विरुद्ध विदर्भ या सामन्यातील टिपलेला क्षण

### राज्य स्पर्धेत नाशिक व अहिल्यानगर विजेते

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ९ जानेवारी-**

ॲमॅच्यूअर शुटींग बॉल स्पोर्ट्स असोशिएशन महाराष्ट्र यांच्यावतीने येथील जिल्हा परिषद शाळेच्या क्रीडांगणावर शनिवारपासून शुटींग बॉलच्या राष्ट्रीय स्पर्धेस सुरवात होत आहे. यामध्ये २७ राज्याच्या पुरुष व महिला भाग घेतला असल्याचे सचिव कंटाळे यांनी सांगितले.

तत्पूर्वी शुक्रवारी राज्य निवड चाचणी स्पर्धा झाली. यास्पर्धेत मुलांच्या गटात नाशिक, सांगली, छ. संभाजीनगर व जळगाव संघाने तर मुलींच्या गटात अहिल्यानगर, सांगली दुसरा, पुणे व नाशिक संघाने अनुक्रमे प्रथम चार संघात स्थान मिळविले. यानंतर राज्याचा मुले व मुलींचा संघ राज्य असोसिएशनचे सचिव सुनिल कंटाळे यांनी जाहीर केला. यावेळी तुकाराम देशमुख, रणजित काळे, महादेव देशमुख, मारुती पाटील, रामदास काळे, किरण सावंत, अस्लम मुजावर आदी उपस्थित होत.

**महाराष्ट्र संघात माळशिरसचे जयंत खंडागळे**

**पुरुष** : वकार अन्सारी (नाशिक), सुशांत पवार, अक्षय पवार (सांगली), शोएब शेख (जळगाव), इसत्याक अन्सारी (नाशिक), साबीर शेख (जळगाव), सुधाकर साबळे (छ,संभाजीनगर), जयंत खंडागळे (सोलापूर), झाईद अन्सारी (नाशिक), संदेश घारे (सांगली), चेतन तायडे (छ. संभाजीनगर), परेश मोकल (रायगड). राखीव-संजय बोराडे (पुणे).

**महिला** : लावण्या मठपती (सांगली), प्रज्ञा गडाख (अहिल्यानगर), कावेरी संसारे (अहिल्यानगर), स्नेहल हजारे (सांगली), प्रगती गडाख (अहिल्यानगर), प्राजक्ता आवळे (सांगली), मेघा जगदने (नाशिक), शीतल वाघमारे (छ. संभाजीनगर), समृद्धी पवार (नांदेड), अक्षरा पवार (बीड), ऋतुजा गवाणे (पुणे), सिनाया भोसले (अहिल्यानगर), राखीव- सहना ससाणे(कोल्हापूर), ऋतुजा खिरादार (पुणे), अचल परदेशी (छ. संभाजीनगर).



## एल.बी.पी.एम. महाविद्यालयातील तिघांची विद्यापीठ संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

सात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील सौंदर्या कोल्हापुरे, आरती आगसे व साक्षी बहिरवाडे या खेळाडूंनी आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या बेसबॉल संघात स्थान प्राप्त केले आहे. हा संघ बारामती येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. भक्तराज जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# बार्शीच्या उपनगराध्यक्षपदी रोहित पाटील; चार नामनिर्देशित सदस्यांचीही निवड

## भाजप व उबाठाचे प्रत्येकी दोन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.९ जानेवारी -**

बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीनंतर नूतन नगरसेवकांची पहिलीच विशेष सभा नूतन नगराध्यक्ष तथा पीठासीन अधिकारी तेजस्विनी कथले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यामध्ये उपनगराध्यक्षपदी भाजपचे युवा नगरसेवक रोहित रमेश पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर नामनिर्देशित सदस्य म्हणून भाजपचे विजय राऊत व प्रकाश माने तर उद्धव सेनेचे ज्योतिर्लिंग कसबे आणि बाळासाहेब पवार यांची निवड झाल्याची घोषणा करण्यात आली.



मुख्याधिकारी तैमुर मुलाणी यांनी सभेची रुपरेषा सांगितली. प्रारंभी उपनगराध्यक्ष निवड झाली. त्यानंतर नामनिर्देशित सदस्यांची निवड पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष तेजस्विनी कथले यांनी जाहीर केली.

त्यानंतर झालेल्या अभिनंदनपर भाषणात विरोधी नगरसेवक कृष्णराज बारबोले म्हणाले, समृद्ध राजकीय वारसा असलेल्या कुटुंबातील आपण आहेत. सर्वांना समान वागणूक द्याल ही अपेक्षा. चांगल्या कामांना आमचा पाठिंबा असेल. एकत्र मिळून शहराचा विकास करु.

भाजपचे गटनेते विजय चव्हाण म्हणाले, विरोधीपक्ष विकास कामांना सहकार्य करतील. विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे म्हणाले, उज्वल असा इतिहास बार्शीला आहे. कर, विकास आणि लोकाभिमुख कामाची अपेक्षा आहे. आम्ही २१ नगरसेवक हातात हात घालून विकासासोबत राहण्याचे अभिवचन देतो. संसदीय पध्दतीने कामकाज चालेल. शहर विकासासाठी आम्ही सोबत आहोत. कामाचा लेखाजोखा ठेवावा. शहर विकासाचे चांगले व्हिजन ठेवाल. बार्शीकरांचे हित जोपासण्यासाठी आपण एकत्र काम करु. विरोधक म्हणजे केवळ शत्रू आणि टिकाकार नाहीत. शिवसेनेचे नगरसेवक संदेश काकडे म्हणाले, पूर्वी विकास केला, ऐतिहासिक कामे झाली. आता ही आमचे धोरण विकासाचे असणार आहे. नागरी सुविधा सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असणार आहोत. पाणी योजना मार्गी लागेल. खेळीमेळीचे वातावरणात विकास करु, विकासाच्या मार्गाने पुढे जाऊ. नूतन उपनगराध्यक्ष रोहित पाटील म्हणाले, ज्येष्ठ सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करु. विजय राऊत यांनी सहा महिन्यांच्या आत नियमित पाणी देण्याचे वचन देतो. बार्शी तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर होऊन तो मार्गी लागेल. शहराला विकासाची दिशा देऊ. असे सांगितले. ज्योतिर्लिंग कसबे, भारत पवार, सायरा मुल्ला, अनिकेत कारंडे, कांचन मोहिते यांनीही अभिनंदनाचे भाषण केले.

## महत्वाचे...



### सीईओ जंगम यांनी घेतला पंचायत राज अभियानाचा आढावा

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत सोलापूर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी मार्डी येथे स्वतः भेट देऊन अभियानाचा आढावा घेण्यासाठी भेट दिली. यावेळी जंगम यांनी ग्रामविकास अधिकारी नंदकुमार पाटील तसेच सरपंच प्रांजली गणेश पवार यांच्यासोबत गावामध्ये या अभियानांतर्गत होत असलेल्या विविध कामाचा आढावा घेतला. तसेच अंगणवाडी सेविका प्राथमिक आरोग्य केंद्र येथील सर्व डॉक्टर व कर्मचारी तसेच जि.प. प्राथमीक शाळा मराठी व उर्दू येथील प्रगतीपथावर असलेल्या कामांच्या तपशील मुख्याध्यापक यांच्याकडून घेतला त्याचबरोबर मार्डी गावातील आशा वर्कर महिला बचत गट याबद्दलची माहिती या आढावा बैठकीमध्ये घेण्यात आला. तसेच जंगम यांनी ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी कशाप्रकारे देता येईल त्याचबरोबर सुशासन पारदर्शकता आणि ग्रामीण विकास कार्यात कशाप्रकारे सुधारणा करता येईल यावरती मार्गदर्शनही केले. यावेळी या आढावा बैठकीसाठी आले असता जंगम यांनी आवर्जून मार्डी ग्रामपंचायत होत असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाची स्वतः पाहणी केली व होत असलेल्या कामावर समाधान व्यक्त केले यावेळी उत्तर सोलापूर गट विकास अधिकारी राजाराम भोंग, विस्तार अधिकारी शिंदे, उपसरपंच कांतीलाल मार्तंडे, काशिनाथ कदम, युवराज पवार, गणेश पवार, अझर शेख, संजय इनामदार, अरुण मुडके उपस्थित होते.



### सांगोला विद्यामंदिरची सहल उटी-म्हैसूरकडे मार्गस्थ

**सांगोला,दि.९ जानेवारी -**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजमधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल म्हैसूर-उटी-मडकेरी या प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी दि.८ जानेवारीला मार्गस्थ झाली. यावेळी संस्थाध्यक्ष प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, विभागप्रमुख डी.के.पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सहलीमध्ये इ.९ वी व ११ वीचे १३२ विद्यार्थी व १६ शिक्षक सहभागी आहेत. म्हैसूर पॅलेस, वृंदावन गार्डन, प्राणी संग्रहालय, चामुंडादेवी मंदिर, वॅक्स म्युझियम उटीमधील चॉकलेट फॅक्टरी, दोडाबेटा पॉईंट, बॉटनिकल गार्डन, चहाचे मळे, मडकेरी व श्रीरंगपट्टणम या स्थळांना भेट देणार आहेत.




## बेंबळेतील क्रीडा सप्ताहाचे महाराष्ट्र केसरी काझी यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.९ जानेवारी-**

हरिनगर बेंबळे येथील प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन महाराष्ट्र केसरी असलम काझी यांच्या हस्ते झाले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते क्रीडा ध्वजाचे अनावरण व मशालीचे पूजन करण्यात आले. स्पर्धेत सहभागी झालेल्या ब्ल्यू, रेड, ग्रीन व यलो संघांनी संयुक्त मानवंदना दिली. पत्रकार दिनानिमित्त टेंभुर्णी व बेंबळे परिसरातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. हरिश्चंद्र गाडेकर व दत्तात्रय सुरवसे यांनी धन्यवाद व्यक्त केले. संस्थेचे सचिव बी. बी. इंगळे यांनी अहवाल वाचन करून उपक्रमांची माहिती दिली. महाराष्ट्र केसरी काझी यांनी खेळाच्या माध्यमातून स्वतःचा जीवनप्रवास कसा घडला, तसेच खेळातून जिद्द, संघर्ष, हार-जीत स्वीकारण्याची तयारी व जीवनातील खेळाचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रभावीपणे समजावून सांगितले.

या क्रीडा सप्ताहात कबड्डी, खो-खो, धावणे, लिंबू-चमचा, हॉलीबॉल व गोळा फेक अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

स्कूलचे संस्थापक अध्यक्ष पोपट अनपट, सचिव बी. बी. इंगळे, प्राचार्य समीर तांबोळी, सर्व संचालक, पालक, क्रीडा शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## मतभेद बाजूला ठेवून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करा

### सिनेअभिनेते संदीप पाठक यांचे वाढेगावात आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.९ जानेवारी -**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज हे अभियान म्हणजे महाराष्ट्र शासनाने तुमच्या गावासाठी दिलेली एक अभिनव संधी आहे. या संधीचे सोनं करत स्थानिक मतभेद बाजूला ठेवून हे अभियान यशस्वी करा असे आवाहन सिनेअभिनेते संदीप पाठक यांनी वाढेगाव, ता.सांगोला येथे भेटी प्रसंगी केले. या गावाला मोठी नैसर्गिक देणगी चांगल्या पद्धतीची आहे. तुम्ही थोडासा प्रयत्न केला तर गाव पुरस्कारासाठी योग्य व सुंदर होईल. तुम्हाला आणखी तीन महिने वाढवून मिळाल्यामुळे कामाची संधी मिळाली आहे, या संधीचा उपयोग करून घेऊन गाव समृद्ध करा. आपले गाव पुरस्कारात पुढे राहावे अशा शुभेच्छा सिने अभिनेत्री शिवाली परब यांनी यावेळी दिल्या.



सिने कलावंत व जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, जिल्हा अभियान कक्षातील शिवराज राठोड, सुहास चिळेकर, राज्य अभियानातील प्रवीण कोठुळे, पं.स.विस्तार अधिकारी अमोल तोडकरी यांची वाढेगाव मध्ये आगमन झाल्यानंतर बैलगाडीतून पारंपारिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर त्यांना वाढेगाव येथील त्रिवेणी संगमावर नेण्यात आले. यावेळी वैजिनाथ घोंगडे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत वाढेगाव मध्ये झालेल्या कामाची तपशीलवार माहिती दिली. तसेच नदीवर व पाण्याच्या संदर्भात वृक्ष लागवडीच्या संदर्भात व नावीन्यपूर्ण राबवलेल्या कामाचा तपशील उपस्थितांच्या पुढे सादर केला. यावेळी सरपंच कोमल डोईफोडे, उपसरपंच शिवाजी दिघे, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक इंगोले, ग्रामपंचायत अधिकारी सोमनाथ होळ, ग्रा.पं.स.राहुल घोंगडे, वसंत दिघे, प्रतिभा भगत, अलका दिघे, पोलीस पाटील शुभांगी पवार, महिला बचत गटाच्या सी सी मनीषा मोरे, प्रमुख योजना सूर्यगंध व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी आभार मानले. याप्रसंगी बीट अंमलदार विलास बनसोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी गावाचा दुष्काळ हटविण्यासाठी संघर्ष करणार : आ. जानकर

### बचेरीच्या बिरोबा मंदिराच्या सभा मंडपाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि ९ जानेवारी-**

बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी या दुष्काळी पट्ट्यातील गावांना निरा-देवधर प्रकल्पाचे पाणी मिळवून दिल्याशिवाय शांत बसणार नाही. त्या भागातील बहुतांश मेंढपाळ या भागातील शेतीला पाणी नसल्यामुळे सहा महिने गाव सोडून मेंढरे चारण्यासाठी काळ्यारानाला जातात म्हणून या गावाचा कायमस्वरूपी दुष्काळ हटविण्यासाठी संघर्ष करीत राहणार असल्याचे आमदार उत्तमराव जानकर यांनी सांगितले.

माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर यांच्या स्थानिक विकास निधीमधून मंजूर झालेल्या दहा लाखांच्या निधीचा बचेरी डबच्या वाडा येथील बिरोबा मंदिराससमोरील मंजूर सभामंडपाचे भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी कृषी व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती संग्रामसिंह जहागीरदार, शाम मदने महावीर धायगुडे, सरपंच विश्वजीत गोरड, मोहन शिकारे, ऑडिटर शिवाजीराव सावळजकर, सोमनाथ गाढवे नारायण शिंदे, सुदाम शिंदे, अशोक पाटील, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष गोरख शिंदे, भारत शिकारे, शंकर शिकारे, धनाजी शिकारे, माऊली काटे, शिवाजी शिंदे, नारायण खरात, बापू गाढवे, भीमराव गाढवे, शिवबाबा शिंदे, महादेव लकडे, समाधान लकडे, महादेव गाढवे, आप्पा गाढवे, विकास लकडे, नाना धुलगुडे, मारुती राजगे, पोपट लकडे, राहुल लकडे, दशरथ ढवळे, मारुती पडळकर, नाना मंडले, ज्ञानू बोडरे, बिरदेव ढवळे, अमोल लकडे, सचिन मदने, बिरुदेव शिंदे उपस्थित होते. सरपंच विश्वजीत गोरड यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

## बार्शीत बौद्ध धम्म परिषद उत्साहात; अशोक स्तंभाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पांगरी, दि.९ जानेवारी-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रांतिक परिषदेच्या ऐतिहासिक घटनेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर बार्शीत नुकतीच बौध्द धम्म परिषद घेण्यात आली.

येथील प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्ट व बुद्ध, शाहू, फुले, आंबेडकर समविचारी संघटनेतर्फे ही झाली. पहिल्या सत्राचे उदघाटन आमदार दिलीप सोपल तर दुसऱ्या सत्राचे उदघाटन माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते झाले. यावेळी भंते यश थेरो (श्रीलंका), भंते करुणा नंद (संभाजीनगर), भंते गुनानंद (बुलढाणा), पूज्य भंते सुमितजी नागसेन (खरोसा लातूर) यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. रघुनाथ भोसले यांच्या धम्म दानातून ३ लाख ५० हजार रुपये खर्च करून उभारलेल्या अशोक स्तंभाचे लोकार्पणही यावेळी झाले. स्तंभाला महार रेजमेंट सोलापूर घटकांबळे यांच्या टीमने सलामी दिली. ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे, दत्ता गायवाड, डॉ. कृष्णा मस्तुद, डॉ. कमलाकर कांबळे, प्रशांत पैकेकर उपस्थित होते. येथील विहाराच्या जीर्णद्धारासाठी आमदार सोपल यांच्या फंडातून १० लाख रुपये तर राजाभाऊ राऊत यांच्या फंडातून ३० लाख रुपये दिले आहेत. त्याच प्रमाणे सावळा शिंदे यांनी आपल्या आईच्या आठवणीत ५१ हजार रुपये दिले आहेत. यावेली आमदार सोपल, माजी आमदार राऊत ज्येष्ठ साहित्यिक वाघमारे, प्राचार्य डॉ. कांबळे यांनी बाबासाहेबांच्या चळवळीचा व क्रांती लढ्याचा विचार मांडला. डॉ. बाबासाहेबांनी विज्ञानवादी बुध्द धम्माची ओळख करून दिल्याचे भंते गुणानंद महाथैरो (श्रीलंका) यांनी सांगितले. भंते सुमितजी नागसेन यांच्या नेतृत्वाखाली सध्या टाकळी सिकंदर, तगर भूमी धाराशिव, खरोसा बुध्द भूमी लातूर, श्रवस्ती बुध्द विहार बार्शी या ठिकाणी बुध्द बिहारची कामे आंतीम टप्प्यात असल्याचे सांगितले. परिषदेचे प्रास्ताविक विष्णु कांबळे यांनी केले. प्रा शशीकांत गायकवाड यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### सुशिला माने



**अक्कलकोट,दि.९ जानेवारी-**

श्रीमती सुशीला व्यंकटराव माने (वय-९३) यांचे दि.९ जानेवारी रोजी निधन झाले. येथील श्री.फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या सल्लागार मंडळाचे सदस्य व महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाचे निवृत्त अध्यक्ष सुहास माने यांच्या त्या मातोश्री होत.

### रमेश वाडकर



**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

विद्यानगर, शेळगी येथील रहिवाशी निवृत्त केंद्रप्रमुख कै. रमेश धोंडप्पा वाडकर (गुरुजी) वय ८३ यांचे वृध्दपकाळाने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन सुना, चार नातवंडे असा परविार आहे.

### लक्ष्मण चिलवेरी



**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

न्यू पाच्छा पेठ परिसरातील विजय नगर येथील रहिवासी व साखर पेठ नवरात्र महोत्सव मंडळाचे माजी अध्यक्ष लक्ष्मण विठोबा चिलवेरी यांचे शुक्रवार दि.९ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार मुली, सुना, जावई, एक भाऊ, नातवंडे असा परिवार आहे.


### माजी सैनिक सुदाम थोरबोले



**नरखेड, दि. ९ जानेवारी-**

मोहोळ तालुक्यातील भोयरे येथील माजी सैनिक सुदाम बळीराम थोरबोले-जाधव यांचे (८७) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, दोन भाऊ, सुना व नातवंडे असा परिवार आहे. नागपूरच्या डीवायएसपी पूजा गायकवाड यांचे आजोबा तर जि. प. प्राथमीक शाळा मसले चौधरीचे शिक्षक सुरेश थोरबोले यांचे ते वडील होत. कै. सुदाम थोरबोले यांनी १९६२ भारत -चीन,१९६५ भारत- पाकिस्तान, आणि १९७१ भारत- पाकिस्तान- बांगलादेश मुक्ती युद्धात सहभाग घेतला होता. तिन्ही युद्धात सहभाग घेतलेले मोहोळ तालुक्यातील एकमेव माजी सैनिक होते.

### चाँदबी मुलाणी



**अकलूज, दि. ९ जानेवारी-**

महाळुंग गट नंबर २ येथील चाँदबी जहांगीर मुलाणी (वय ६५ ) यांचे दि. ९ जानेवारी शुक्रवारी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सहा मुली, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील तोहिद मुलाणी यांच्या त्या मातोश्री होत.

## देगाव (वा) येथील अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**नरखेड, दि. ९ जानेवारी-**

संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळ, संगीत भजनी मंडळ आणि हनुमान भजनी मंडळ, समस्त ग्रामस्थ देगाव यांच्या वतीने मोहोळ तालुक्यातील देगाव (वा.) येथे ९ ते १६ जानेवारी या कालावधीत विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या हरिनाम सप्ताहामध्ये रोज पहाटे चार ते सहा काकडा भजन, सकाळी सहा ते सात महापूजा, सकाळी सात ते अकरा ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ११ ते १२ गाथा भजन, दुपारी बारा ते दोन भोजन व विश्रांती, दुपारी तीन ते पाच भावार्थरामायण, सायंकाळी पाच ते सात हरिपाठ, आणि सायंकाळी सात ते नऊ हरिकीर्तन व हरी जागर आदी कार्यक्रम होणार आहे. सप्ताहामध्ये हभप गणेश बर्गे महाराज घोटी, हभप संभाजी सानप महाराज गंगाखेड, हभप दयानंद महाराज कुंभेफळकर परांडा, हभप भगवान पाटील करमाळा, हभप राजन काशीद महाराज पिंपरी, हभप भाग्यवान महाराज रोडगे -परंडा, हभप संतोष महाराज लहाने परळी-वैजनाथ यांची हरिकीर्तने होणार आहेत. तर शुक्रवार दि. १६ जानेवारी रोजी हभप अनिल महाराज पाटील आळंदी यांचे काल्याचे किर्तन सकाळी दहा ते बारा या कालावधीत होणार आहे. सप्ताहाचे सलग २९ वे वर्ष असून दि १५ जानेवारी २०२६ रोजी शनिवारी दुपारी चार ते सात या वेळेत दिंडी सोहळा व कीर्तनानंतर दीपोत्सव हा कार्यक्रम होणार आहे. कालच्या कीर्तनाने महाप्रसादाने या हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे.

## जिल्हा ग्राहक परिषदेवर नऊ जण अशासकिय सदस्यपदी नियुक्त


### ग्राहक पंचायतीचे शशिकांत हरिदास, दीपक इरकल, नंदकुमार देशपांडे आणि संतोष उपाध्ये यांची वर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ जानेवारी -**

सोलापूर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून शशिकांत हरिदास, दीपक इरकल, नंदकुमार देशपांडे, संतोष उपाध्ये यांच्यासह अ. भा. ग्राहक पंचायतीच्या नऊ जणांची नियुक्ती जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात आली.

सुधारित ग्राहक संरक्षण कायदा २०१९ नुसार प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करावी अशी तरतूद आहे. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या सदस्यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. ग्राहकांचे प्रश्न, समस्या, अडचणी तातडीने सुटाव्या यासाठी ग्राहक संरक्षण कायद्याने हे व्यासपीठ उपलब्ध केले आहे. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील या ग्राहक संरक्षण



परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून शशिकांत हरिदास, दीपक इरकल, माधुरी परदेशी, नंदकुमार देशपांडे, शशिकांत नरोटे, ॲड.विजय कुलकर्णी, संतोष उपाध्ये, दत्तात्रय कुलकर्णी, राजन घाडगे यांची तर जिल्हा पोलीस प्रमुख, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सहायक आयुक्त अन्न, औषध प्रशासन, जिल्हा माहिती अधिकारी, अधिक्षक अभियंता महावितरण, अधिक्षक अभियंता दूरसंचार, उपनियंत्रक वैधमापन, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ,जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इत्यादी खात्याचे जिल्हा स्तरावरील अधिकारी शासकीय सदस्य म्हणून नियुक्त केलेले असतात. सदस्य सचिव म्हणून जिल्हा पुरवठा अधिकारी हे काम पाहतात. दरम्यान या निवडीबद्दल अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी, संघटन मंत्री संदीप जंगम, प्रांत सदस्य विनोद भरते, माजी प्रांत सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये यांनी अभिनंदन केले.






# दै. तरुण भारतची दिनदर्शिका आगळी वेगळी : अमोलराजे भोसले

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.९ जानेवारी**

दै.सोलापूर तरुण भारतने प्रकाशित केलेली दिनदर्शिका आगळी वेगळी आहे. सण, वार, धार्मिक उत्सव, जयंती, पुण्यतिथी, संस्कृती आदींविषयीची माहिती ज्ञानात भर घालणारी आहे, असे प्रतिपादन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी केले .

दै.सोलापूर सोलापूर तरुण भारतच्या वतीने काढण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी सचिव शामराव मोरे, दै.सोलापूर तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा आवृत्ती प्रमुख राजाराम मस्के, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाचे पुरोहित विश्वभंर पुजारी यांची उपस्थिती होती. यावेळी दैनिक सोलापूर तरुण भारतचे अक्कलकोट प्रतिनिधी नंदकुमार जगदाळे, पत्रकारद्वय स्वाम ीराव गायकवाड, राजेश जगताप, रमेश भंडारी, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शिवू स्वामी, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# दै. तरुण भारतची दिनदर्शिका परिपूर्ण : महेश इंगळे

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.९ जानेवारी**

दै.सोलापूर तरुण भारतने प्रकाशित केलेली दिनदर्शिका परिपूर्ण असल्याचे गौरवोद्गार श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेश इंगळे यांनी केले. दै.सोलापूर तरुण भारतची दिनदर्शिका स्वामी चरणी ठेऊन प्रकाशन देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, वटवृक्ष देवस्थानचे पुरोहित व्यंकटेश पुजारी, दै.सोलापूर तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात भाविकांची मोठी उपस्थिती होती. दैनिक तरुण भारतच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन केल्यानंतर शुभेच्छा देताना देवस्थानचे चेअरमन इंगळे म्हणाले, तरुण भारतची दिनदर्शिका परिपूर्ण असून हे वृत्तपत्रदेखील अनेक वर्षांपासून वस्तुनिष्ठ बातमीदारीसाठी सुपरिचीत आहे. विजयाबद्दल तरुण भारतच्या वतीने नगरसेवक इंगळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मराठवाडा आवृत्ती प्रमुख राजाराम मस्के, ज्योतिष अभ्यासक नीलेश स्वामी, दैनिक सोलापूर तरुण भारतचे अक्कलकोट प्रतिनिधी नंदकुमार जगदाळे, पत्रकारद्वय स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, रमेश भंडारी, प्रसाद सोनार, वटवृक्ष देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी श्रीशैल गवंडी, पिंटू पवार, सिध्दू कुंभार, मनोज जाधव आदी उपस्थित होते.



# वृद्धाश्रमात सिद्धरामेश्वरांच्या नंदीकोल काठीचे पूजन

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराज यात्रेची चाहूल लागताच संपूर्ण सोलापूर भक्तिभावाने न्हाऊन निघते. पांढरे शुभ्र वस्त्र, घराघरांत सडा-रांगोळ्या आणि नंदीकोल काठ्यांच्या विवाह सोहळ्याचे आकर्षण अनुभवण्यासाठी प्रत्येक सोलापुरकराची धडपड सुरू होते. मात्र वयाच्या संध्याकाळी उभे असलेले, चालणंही कठीण झालेले आश्रमातील ज्येष्ठ या आनंदापासून अनेकदा वंचित राहतात. हीच भावना ओळखून आस्था फाऊंडेशन संचलित आस्था रोटी बँक यांच्या वतीने आकाशवाणी केंद्राजवळील वात्सल्य आस्था अनाथ वृद्धाश्रम ात ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या नंदीकौल (दोन नंबर काठी) यांचे विधिवत पूजन पार पडले. नंदीकौलाचे मानकरी राजशेखर हिरेहब्बू व मलकु म्हेत्रे तसेच आश्रमातील आजी आजोबा व आस्था रोटी बँकेचे महिला सदस्य यांच्या हस्ते नंदीकोलचे पूजन झाले. आस्था फाऊंडेशनचे विजय छंचुरे यांचे सहकार्य लाभले. वासल्य आस्था निराधार वृद्धाश्रमाचे व्यवस्थापिका रेखा घटे व रजनी भाटिया हे पण उपस्थितीत होते.

# ‘भाजपा’ला मत म्हणजे विकासाला मत

## प्र.२२ साठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २२ मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, अंबिका नागेश गायकवाड, चैत्राली शिवराज गायकवाड यांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ‘भाजपा’ला मत म्हणजे विकासाला मत, असे नागरिकांतून सांगण्यात आले.

भीम ज्योत तरुण मंडळाच्या वतीने लिमयेवाडीतील एकमल्ले चौक येथे कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गौतम फडतरे, सागर एकमल्ले, अभिजीत फडतरे, राहुल एकमल्ले, बाबू फडतरे, संजय कांबळे, सचिन फडतरे, विराज जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवराज गायकवाड याप्रसंगी बोलताना म्हणाले, प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी किसन जाधव, नागेश गायकवाड यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी आणून अनेक मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या. ‘भाजपा’चे उमेदवार किसन जाधव म्हणाले, यापूर्वीही प्रभाग २२ मध्ये रस्ते, पाणी, ड्रेनेज व नागरी सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी आणून कामे केली आहेत. मात्र विरोधक त्या कामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करीत असून मतदारांची दिशाभूल करत आहेत.

केंद्र आणि राज्यात भाजपची सत्ता आहे आणि सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदारही भाजपाचे असल्याने प्रभाग २२ च्या विकासासाठी निधी कमी पडणार नाही. विकासासाठी आम्ही कधीच राजकारण केले नाही; पुढील काळात पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या माध्यमातून आणखी भरघोस निधी आणून प्रभागाचा सर्वांगीण विकास साधू, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. दरम्यान, विघ्नहर्ता गणेशोत्सव महिला मंडळाच्या वतीने आयोजित कॉर्नर सभेत प्रमिला जाधव, दीपक जाधव, श्रीनिवास गायकवाड, शिवलाल भानावत व चंद्रकांत गायकवाड यांच्या उपस्थितीत भाजपाच्या चारही उमेदवारांना जाहीर पाठिंबा देण्यात आला.



# राजराजेश्वरी संकुलात सिध्देश्वर नंदीध्वजाचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संकुलात सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर नंदीध्वजाचे उत्साहात पूजन करण्यात आले.

यावेळी प्रशालेतील हजारो चिमुकल्यांनी सिद्धरामेश्वर नंदिध्वजाची काठी पाहून दर्शन घेतले. यात्रेतील गर्दीमुळे लहान मुलांना नंदीध्वजाचे दर्शन घेता येत नसल्याने मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांच्या संकल्पनेतून आज शाळेतील सर्व विद्यार्थी व पालकांनी नंदिध्वजाचे दर्शन आशिर्वाद घेतले. श्री सिद्धेश्वर यात्रेतील प्रमुख आकर्षण असणारे मानाच्या नंदीध्वजाचे शाळेत आगमन झाल्यावर शाळेतील ढोल पथकातील विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात स्वागत केले. प्रथम मुख्याध्यापिका वैशाली कुंभार व माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी नंदिध्वजाच्या मानकरी व पालकांचे स्वागत केले. यावेळी नेताजी माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, विठ्ठल कुंभार उपस्थित होते.

# ब्राह्मण समाजातील भरीव योगदानामुळे उषा काळेंचा विजय मानला जातोय निश्चित



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

माजी उपमहापौर राजेश काळे यांनी आपल्या कार्यकाळात सर्व समाजघटकांना सोबत घेऊन काम करताना ब्राह्मण समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठीही विशेष पुढाकार घेतला. ब्राम्हण समाजासाठी दिलेल्या भरीव योगदानामुळे उषा राजेश काळे यांचा विजय निश्चित मानला जात आहे. गरजू, सुशिक्षित व होतकरू तरुणांना संधी मिळावी, त्यांना स्वावलंबी होता यावे, या उद्देशाने त्यांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलले. परशुराम वित्त महामंडळाचा प्रस्ताव ब्राह्मण समाजातील तरुणांना शिक्षण, स्वयंरोजगार, उद्योग व कौशल्य विकासासाठी आर्थिक पाठबळ मिळावे, यासाठी परशुराम वित्त महामंडळाचा प्रस्ताव महाराष्ट्रात सर्वप्रथम सोलापूर महानगरपालिकेच्या सभागृहात माजी उपमहापौर राजेश काळे यांनी मांडला.

हा प्रस्ताव सर्वसाधारण नव्हता, तर ब्राह्मण समाजाच्या दीर्घकालीन प्रगतीचा दूरदृष्टीने विचार करून तयार करण्यात आलेला होता. त्यांच्या प्रभावी मांडणीमुळे व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. यामुळे ब्राह्मण सम ाजातील अनेक तरुणांसाठी विकासाचे नवे दालन खुले झाले, असेही यावेळी सांगण्यात आले. समाजाच्या कार्याची अधिकृत नोंद व्हावी यासाठी अथक प्रयत्न ब्राह्मण समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व ऐतिहासिक योगदानाची दखल शासनदरबारी घेतली जावी, समाजाच्या कार्याची अधिकृत नोंद व्हावी, यासाठी माजी उपमहापौर राजेश काळे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. सभागृहात विषय मांडणे, प्रशासनाशी संवाद, विविध पातळ्यांवर समन्वय साधणे अशा माध्यमातून त्यांनी अथक परिश्रम घेतले. माजी उपमहापौर राजेश काळे यांचे कार्य केवळ प्रस्ताव मांडण्यापुरते मर्यादित नव्हते, तर समाजाच्या भविष्याचा विचार करून उचललेली ठोस पावले होती. ब्राह्मण समाजातील तरुणांना संधी, समाजाला सन्मान आणि इतिहासाला योग्य स्थान मिळवून देण्याचे काम त्यांनी प्रामाणिकपणे व प्रभावीपणे केले, असे यावेळी सांगण्यात आले.

## जानकी नगर उद्यानास आनंदीबाई जोशी यांचे नाव देण्याचा ऐतिहासिक निर्णय

प्रभाग क्रमांक २४ मधील जानकी नगर उद्यानास भारतातील पहिल्या महिला डॉक्टर, क्रांतिकारक व प्रेरणास्थान असलेल्या आनंदीबाई गोपाळराव जोशी यांचे नाव देण्यात यावे, हा प्रस्तावही माजी उपम हापौर राजेश काळे यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या सभागृहात मांडला. महिलांना शिक्षण, समाजसुधारणा व ब्राह्मण समाजाच्या गौरवशाली परंपरेचा सन्मान या उद्देशाने मांडलेल्या या प्रस्तावाला देखील सभागृहाची मंजुरी मिळाली. यामुळे एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाचे नाव सार्वजनिक ठिकाणी अजरामर झाले.



# हलगीच्या कडकडाटात खेळाडूंचे जोशपूर्ण सादरीकरण

## संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाच्या लेझीम स्पर्धेला मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.९ जानेवारी-**

संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ ते ९ जानेवारी कालावधीत आयोजित केलेल्या २० व्या भव्य लेझीम स्पर्धेत ग्रामीण मुले गटात कोळेगांव तर शहरी मुली ब गटात संग्रामनगर संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त विजय चौक, अकलूज येथे सदरच्या स्पर्धा सुरू आहेत.या स्पर्धेत ग्रामीण मुले गटात- विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय कोळेगाव यांनी प्रथम क्रमांक, श्री संत तुकाराम विद्यालय बोंडलेआणि सदाशिवराव माने विद्यालय माणकी यांनी विभागून द्वितीय क्रमांक व श्री गणेश विद्यालय पिंपळनेर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. शहरी मुली ब गटात- श्री जयसिंह मोहिते पाटील विद्यालय संग्रामनगर यांनी प्रथम क्रमांक, श्री हनुमान विद्यालय लवंग यांनी द्वितीय क्रमांक व कृष्णानंद विद्यामंदिर पाटील वस्ती यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या संघांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील,सौ.ऋतुजादेवी मोहिते पाटील, कार्याध्यक्षा कु. स्वरुपाराणी मोहिते पाटील, नूतन नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, दिपकराव खराडे पाटील, प्रदीपराव खराडे पाटील, माजी पंचायत समिती सदस्य सूर्यकांत शेंडगे, रामभाऊ गायकवाड, आप्पासाहेब मगर यांच्यासह विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी प्रमुख उपस्थित होते.स्पर्धेत एकूण ५८ संघांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेसाठी सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.स्वागत सचिव संजय राऊत यांनी केले. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी, शकील मुलानी, ईलाही बागवान, विशाल दळवी यांनी केले.

# मकर संक्रांती-होळी सणांच्या पार्श्वभूमीवर विशेष रेल्वे गाड्या

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

मकर संक्रांती आणि होळी सणांच्या पार्श्वभूमीवर आणि प्रवाशांच्या मागणीनुसार, रेल्वे कलबुर्गी आणि बंगळूरु कॅन्ट. दरम्यान आठवड्याच्या शेवटी धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या अतिरिक्त १६ फेऱ्यांसाठी सुरू ठेवणार आहे. यामध्ये बंगळूरु कॅन्ट.-कलबुर्गी साप्ताहिक विशेष गाडी २८ फेब्रुवारीपर्यंत दर शनिवारी धावत राहील. या गाड्यांच्या ८ फेऱ्या होतील. तर कलबुर्गी-बंगळूरु कॅन्ट. साप्ताहिक विशेष गाडी १ मार्चपर्यंत दर रविवारी धावत राहील. या गाड्यांच्या ८ फेऱ्या होतील. या विशेष गाड्या मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कलबुर्गी आणि शहाबाद या २ स्थानकांवर थांबतील.



# प्रभाग क्रमांक ७ च्या प्रचारात भाजप उमेदवार आघाडीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ७ च्या भाजप उमेदवारांच्या प्रचारात उमेदवारांचे कुटुंबीयही आघाडीवर असल्याचे दिसत आहे. त्यांच्या प्रचाराला नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

भाजप उमेदवार पद्माकर काळे यांची पत्नी प्रतिभा काळे, पुरुषोत्तम बरडे यांच्या स्नुषा आणि उमेदवार उत्तरा बरडे बचुटे यांच्या नणंद अर्चना बरडे, श्रध्दा पवार यांच्या सासु माजी नगरसेविका मंदाकिनी पवार, आनंद कोलारकर यांच्या पत्नी दुर्गा कोलारकर या प्रचारात आघाडीवर आहेत. प्रभाग क्रमांक ७ मधील उमेदवारांच्या काकू, मामी, पत्नी, कन्या, सुना, सासुबाई, नणंद, भावजय, मेहुणी यांच्यासह आप्तेष्ट, भावकी व पाहुणे आदींसह कुटुंबातील सदस्यांची टीम होम-टू-होम प्रचार करत संपूर्ण प्रभाग पिंजून काढत आहेत. त्यांच्या प्रचाराला नागरिकांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. घरोघरी उमेदवारांचे स्वागत करण्यात येत आहे. तसेच प्रभाग क्रमांक सात मधून भाजपाचे चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचे आश्वासन देखील मतदार बंधू देत आहेत. उमेदवारांचे कुटुंबीय आणि आप्तेष्ट प्रचाराच्या मैदानात उतरल्यामुळे कार्यकर्ते आणि नागरिकही पदयात्रा, कॉर्नर सभा, होम-टू -होम प्रचारात उत्साहाने सहभागी होत आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नळदुर्गमध्ये शेतातून ६८,००० रुपयांचा मुद्देमाल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**

नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्यादी सुरेंद्र फत्तेसिंग ठाकुर (वय ३६, रा. वांगदरी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, वांगदरी शिवारातील त्यांच्या शेतातून आणि शिक्षा जेठीथोर यांच्या शेतातील गोडावून मधून अज्ञात व्यक्तींनी चोरी केली.



चोरीदरम्यान मुह्रा म्हैस, तुरीचे ७ पोते, गॅसची शेगडी, भारत गॅस सिलेंडर असा एकूण ६८,००० रुपये किंमतीचा माल अज्ञात व्यक्तींनी चोरून नेला.

फिर्यादीच्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पोलीस घटनास्थळी पोहचून साक्षीदारांची माहिती गोळा करत असून, चोरीसंबंधी तपास आणि संशयित व्यक्तींना शोधण्याचे काम चालू आहे.

पोलीसांनी स्थानिक शेतकऱ्यांना आपली शेतमाल सुरक्षित ठेवण्याचे आवाहन केले आहे.

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### सुनील तटकरे व रूपाली चाकणकर यांनी घेतले श्री तुळजाभवानीचे दर्शन

**तुळजापूर, दि.९ जानेवारी -**

महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मराठवाडा दौऱ्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाचे खासदार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्षा रूपाली चाकणकर असताना तुळजापूर येथे आले असता त्यांनी आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे स्वागत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार प्रदेश गोकुळ शिंदे व महेंद्र दुरगुडे यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस महेश चोपदार, श्रीकृष्ण सूर्यवंशी, बबनराव गावडे, दुर्गेश साळुंके, विक्की घुगे, दत्ताभाऊ हुंडेकरी उपस्थित होते.



### आर्य चाणक्यच्या विद्यार्थ्यांची रायगडावर सहल संपन्न

**धाराशिव, दि.९ जानेवारी -**

येथील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींची रायगड, प्रतापगड यासह पर्यटन स्थळांवर शैक्षणिक अभ्यास सहल नुकतीच संपन्न झाली. या सहली दरम्यान विद्यार्थी विद्यार्थिनींनी प्रतापगड आणि रायगडाची इत्यंभूत माहिती घेऊन इतिहासाच्या पाऊल खुणांना भेटी देऊन त्यातून ऐतिहासिक प्रेरणा घेतली. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे प्रतीक असलेल्या या गडकिल्ल्यांना भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले.यासह महाबळेश्वरचे नैसर्गिक सौंदर्य, श्रीवर्धनचा समुद्र किनारा यांनाही भेटी देऊन पर्यटनाचा आनंद घेतला. शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या शैक्षणिक सहल या उपक्रमात विद्यार्थी-विद्यार्थिनी सोबत मुख्याध्यापक डॉ. मनीष देशपांडे यांच्यासह शिक्षक-शिक्षिका सहभागी झाले होते.



### लोहारा येथे मुरूम परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा सत्कार

**लोहारा, दि.९ जानेवारी -**

लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मुरूम परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष बापूराव पाटील यांचा भाजपा लोहारा तालुक्याच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी युवा नेते शरण पाटील यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केलेल्या स्वागताचा नगराध्यक्ष बापूराव पाटील व शरण पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमास शंकर जट्टे, तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत काळे, नगरसेवक दीपक मुळे, तसेच भाजपचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### अंगणवाडी क्रमांक एक मध्ये महिलांची मोफत आरोग्य तपासणी

**तुळजापूर, दि.९ जानेवारी -**

येथील तुळजाई नगर गवते प्लॉट मध्ये असणाऱ्या क्रांतीज्योती क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले अंगणवाडी क्र.१ मध्ये ९ जानेवारी रोजी महिलांची मोफत आरोग्य तपासणी युवी कॅन फाउंडेशन व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली. यात ७५ महिलांची ब्रेस्ट कॅन्सर बद्दल सोनोग्राफी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. स्वप्नगंधा कुलकर्णी व डॉ. राधिका मुंदडा यांनी महिलांची तपासणी केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी शिक्षिका उषा जाधव (धाकतोडे) व अंगणवाडी मदतनीस रेश्मा सावंत यांनी सहकार्य केले.

### तेरणा महाविद्यालयात वाङ्मय मंडळ उद्घाटन उत्साहात संपन्न

**धाराशिव, दि.९ जानेवारी -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा महाविद्यालय (कला, विज्ञान व वाणिज्य) येथे शुक्रवारी, दि.९ जानेवारी २०२६ रोजी वाङ् मय मंडळाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात झाले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि भित्तिपत्रिकेच्या उद्घाटनाने झाली. विद्यार्थिनी अमृता रसाळ, अंकिता राऊत, अंकिता साबळे व मधुरा माने यांनी स्वागतगीत सादर केले. यावेळी खो-खो खेळाडू राज चंद्रजीत जाधव यांचा भारतातील उत्कृष्ट आक्रमक खेळाडूचा पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे उपस्थित होते.

# तुळजाभवानी मंदिर विकासाला मिळाली १८६५ कोटींची हिरवळ

## ▸▸ भाविकांसाठी आधुनिक सुविधा लवकरच : पालकमंत्री प्रताप सरनाईक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**

श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या भव्य विकास आराखड्याला शासनस्तरावर गती मिळाली आहे. पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पातील कामांना तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

पालकमंत्री सरनाईक यांनी आज मुंबई येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे संबंधित सर्व यंत्रणांची आढावा बैठक घेतली. बैठकीला आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार, मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्यासह अनेक अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते. तर सभागृहात अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कळवकर, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, मंदिर संस्थान व्यवस्थापक माया माने, नगर परिषद तुळजापूर मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे आणि इतर उच्च अधिकारी उपस्थित होते.

शासनाने या विकास आराखड्यास १८६५ कोटी रुपयांची मान्यता दिली असून, मंजूर कामांमध्ये एकूण ५५५.८० कोटी रुपये खर्चाचा समावेश आहे. यात घाटशीळ पार्किंग, हडको पार्किंग, आराधवाडी पार्किंग आणि जुने एस.टी. स्टँड परिसरात भाविक सुविधा केंद्र, बहुउद्देशीय सभागृह, व्यावसायिक संकुल आणि वाहनतळ उभारणीसाठी निधी मंजूर केला आहे. याशिवाय, ४५७.८० कोटी रुपयांच्या कामांची अंदाजपत्रके तयार करून तांत्रिक मान्यता दिली असून, निविदा प्रक्रिया सुरू आहे. भविष्यासाठी २०२५-२६ मध्ये ५४.२८ कोटी आणि २०२६-२७ मध्ये ५०० कोटी रुपयांची तरतूद नियोजित करण्यात आली आहे. भूमीसंपादनासाठी आधीच २८.८८ कोटी रुपये मंजूर झाले असून





प्रक्रिया सुरू आहे.

पालकमंत्री सरनाईक यांनी या प्रकल्पाबाबत सांगितले की, विकास फक्त धार्मिक नाही तर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्याही लाभदायक ठरावा. भाविकांना सुरक्षित, सोयीस्कर आणि सुव्यवस्थित सुविधा मिळाव्यात, हा आराखडा आदर्श ठरेल. त्यांनी सर्व मंजूर कामे अनुभवी कंत्राटदारांकडून वेळेत पूर्ण करण्याचे, योग्य अंदाजपत्रक मागवण्याचे आणि प्रकल्प जानेवारी २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष आणि जिल्हाधिकारी श्री पूजार यांना प्रोजेक्ट संदर्भातील सूचनांचे पूर्ण अधिकार दिले गेले आहेत. मंदिर परिसरातील महसूली जमीन मंदिर संस्थानच्या नावावर वर्ग करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच परिसरात पोलीस चौकी बांधण्यासाठी स्वतंत्र तरतूद केली जाईल.

आमदार राणाजगजितसिंह यांनी सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रित पाहणी करून स्वतंत्र अहवाल तयार करणे आणि प्रस्ताव मंदिर संस्थान अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे निर्देश दिले.

या विकास प्रकल्पामुळे भाविक सुविधा सुधारणे, तुळजापूर शहराच्या पर्यटन, रोजगार व आर्थिक विकासाला मोठा चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

## गणेश डोंगरे अपघाती मृत्यू प्रकरणी कुटुंबीयांचा संताप; क्युनर्जी संचलित भाऊसाहेब बिराजदार साखर कारखाना बंद

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ जानेवारी -**

तालुक्यातील समुद्राळ येथील क्युनर्जी इंडस्ट्रीज लिमिटेड संचलित भाऊसाहेब बिराजदार साखर कारखान्यात घडलेल्या अपघाती मृत्यूच्या निषेधार्थ मयत ऊस तोड कामगार गणेश डोंगरे यांच्या नातेवाईकांनी मंगळवारी कारखान्याच्या गव्हाणीत ठिय्या आंदोलन करून सायंकाळपर्यंत कारखाना बंद पाडला.

दि.३ जानेवारी रोजी कारखाना परिसरात ऊस तोडकाम करत असताना गणेश डोंगरे यांच्यावर उसाने भरलेली ट्रॉली पलटी झाली. गंभीर जखमी झालेल्या गणेश डोंगरे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.



त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली आणि आई-वडील असा परिवार आहे. अचानक निधनामुळे कुटुंबावर मोठे आर्थिक आणि मानसिक संकट उभे राहिले आहे.

नातेवाईकांनी मागणी केली की, प्रत्येक मुलीच्या नावावर १० लाख रुपयांची मुदत ठेव (एफडी) तसेच कुटुंबाचे योग्य पुनर्वसन करण्यात यावे.

या मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मृतकाची मुलगी म्हणाली, आम्हाला पैसे नकोत, आमचे पप्पा परत द्या, ज्यामुळे उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आले. कुटुंबीयांनी सांगितले की, पैसे किंवा पुनर्वसन देण्यापेक्षा त्यांना वडील परत मिळावेत, अशी त्यांची भावनिक मागणी होती. त्यानंतर कारखान्याचे कामकाज सुमारे पाच तास ठप्प राहिले. कारखाना प्रशासनाने घटनास्थळी मध्यस्थी करण्यास सुरुवात केली आहे.

याशिवाय, हा अपघात त्या क्षणी घडला जेव्हा गणेश डोंगरे यांच्या पत्नीने फेसबुकवर लाईव्ह व्हिडिओ सुरू केला होता. उसाची ट्रॉली अंगावर कोसळल्यामुळे हा दुर्दैवी अपघात झाला होता.

## तुळजापूरमध्ये खरेदी केंद्रात चोरी; १.६६ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**

तुळजापूर पोलीस ठाण्यात फिर्यादी सचिन गोपाळ साखरकर (वय ३२, रा. उजनी, ता. औसा, जि. लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, काक्रंबा येथील डेक्कन फार्मस ग्रो समृध्दी प्रा.लि. कंपनीच्या खरेदी-विक्री केंद्रातील गोडावून शटरचे कुलूप अज्ञात व्यक्तींनी ८ जानेवारी २०२६ रोजी रात्री सुमारे १२.३० ते ५ या दरम्यान तोडून आत प्रवेश केला.

या चोरीदरम्यान आरोपींनी ४० कट्टे सोयाबीन आणि एक डिव्हीआर असा एकूण १,६६,००० रुपये किंमतीचा माल चोरून नेला. फिर्यादीच्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं.



३३४(१), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पोलीस घटनास्थळी पोहचून साक्षीदारांची माहिती गोळा करत असून, चोरीसंबंधी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

पोलीसांनी नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले असून संशयास्पद व्यक्ती दिसल्यास तातडीने पोलीस ठाण्यात माहिती देण्याचे सांगितले आहे.

## मुरूम पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.९ जानेवारी -**

मुरूम पालिकेची पहिली विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवारी पालिकेच्या सभागृहात पार पडली. या सभेत उपनगराध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मुरूम पालिकेत भारतीय जनता पक्षाने २० पैकी १९ जागा जिंकून बहुमत मिळवले असून, नगराध्यक्षपदी बापुराव पाटील हे बहुमताने विजयी झाले आहेत. उपनगराध्यक्ष निवडीसाठी आयोजित सभेत नवनिर्वाचित नगराध्यक्ष बापुराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रक्रिया पार पडली.

उपनगराध्यक्ष पदासाठी रमेश चव्हाण यांचा एकमेव अर्ज असल्यामुळे पालिकेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनी त्यांची निवड जाहीर केली. निवडीनंतर नगराध्यक्ष बापुराव पाटील, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण यांचा भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, युवा नेते मल्हार पाटील, नितीन काळे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

सभेत युवा नेते शरण पाटील, माजी सभापती मदन पाटील, उमरगा जनता बँकेचे संचालक रफिक तांबोळी, चेअरमन दत्ता चटगे, गटनेते गणेश अंबर, नगरसेवक गौस शेख, रुपचंद गायकवाड आणि भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तोरंबा गावात अवैध दारूविक्रीविरोधात ग्रामस्थांचा एल्गार

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.९ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील तोरंबा गावात सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीमुळे निर्माण झालेल्या गंभीर सामाजिक प्रश्नांविरोधात ग्रामस्थ, महिला, सामाजिक संस्था व ग्रामपंचायत एकवटल्या आहेत. अवैध दारू दुकाने तात्काळ बंद करण्यात यावीत, या मागणीसाठी हॅलो मेडिकल फाउंडेशन व कोव्हिजन फाउंडेशन यांच्या पुढाकाराने आणि ग्रामपंचायतीच्या सहकार्याने लोहारा पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

दारूच्या आहारी गेलेली तरुणाई, वाढते कौटुंबिक वाद, आर्थिक अडचणी व महिलांवरील अन्याय यामुळे गावातील सामाजिक शांतता भंग पावत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. संत गाडगेबाबा



स्वच्छता अभियानात प्रथम क्रमांक मिळवलेले व सांस्कृतिक उपक्रमांसाठी ओळखले जाणारे तोरंबा गाव अवैध दारूविक्रीमुळे बदनाम होत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या आंदोलनात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. अवैध दारूविक्री तात्काळ बंद न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला.

यावेळी सरपंच यादव हनुमंत चव्हाण, उपसरपंच रवींद्र रणखांब, तंटामुक्त समिती अध्यक्ष दादासाहेब रणखांब यांच्यासह सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व अनेक महिला उपस्थित होत्या. दारूमुक्त गाव, सुखी कुटुंब आणि सुरक्षित भविष्य असा निर्धार व्यक्त करत प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

## नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेविकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**

मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समिती, धाराशिव यांच्या वतीने धाराशिव नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा तसेच नगरसेविकांचा सत्कार ९ जानेवारी रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुरेखा जगदाळे, सुरेखा जाधव, वैशाली बलवंडे, स्मिता कोल्हे, अमिता देशमुख, सुनीता साळुंके उपस्थित होत्या.

यावेळी नगराध्यक्षा नेहा काकडे, कुरेशी निसाबी, अलका पारवे, राणी पवार, उबरे सोनाली, गायत्री दंडनाईक, आकांक्षा वाघमारे, आंबेकर रूपाली, राजकन्या पवार, दिपाली पाटील, संगीता अकोसकर, वैशाली मुंडे, केशवबाई करवर, देवकते शकुंतला, सोनाली रविंद्र वाघमारे, ज्ञानेश्वरी निकम, पवार वंदना या नगरसेवकांचाही सत्कार करण्यात आला.

## रायगडावरील कामांना लाथा मारल्याप्रकरणी लौकिक गोळे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**

रायगड किल्ल्यावर सुरू असलेल्या संवर्धनात्मक कामांना पायाने लाथा मारून त्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित करत शिवभक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी लौकिक गोळे याच्याविरोधात कठोर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात स्वराज्य पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष महेश गवळी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले आहे.

याप्रसंगी जिवन इंगळे, औदुंबर जमदाडे, सुदर्शन दळवे, प्रताप पठाडे, संतोष पठाडे, गणेश माळी, नागनाथ बचाटे आदी उपस्थित होते. रायगड किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असून कोट्यवधी शिवभक्तांच्या श्रद्धेचे पवित्र स्थान आहे.

अशा पवित्र स्थळी सुरू असलेल्या कामांना पायाने लाथा मारणे हे शिवाजी महाराजांच्या स्मृतींचा व शिवभक्तांच्या श्रद्धेचा अपमान असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदर व्यक्तीने संबंधित कृत्यांचे व्हिडीओ जाणीवपूर्वक तयार करून सोशल मीडियावर प्रसारित केले असून हे काम निकृष्ट आहे असे आरोप करत समाजात रोष व संताप निर्माण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

हे कृत्य पूर्वनियोजित असून त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी धार्मिक भावना दुखावणे, समाजात तेढ निर्माण करणे व सार्वजनिक शांततेस धोका निर्माण करणे, तसेच सोशल मीडियाचा गैरवापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करा अशी मागणी करण्यात आली आहे.

संबंधित आक्षेपार्ह व्हिडीओ तात्काळ हटवावेत व भविष्यात अशा प्रकारचे कृत्य कोणीही करू नये यासाठी कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवभक्त व रायगडप्रेमींनी केली आहे.

## रूई-ढोकीत घरफोडी; पत्नी-पतीला मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन कविता ज्ञानदेव कसबे (वय ५५, रा. रुई ढोकी ता. धाराशिव) यांच्या घरात अनोळखी तीन व्यक्तींनी दि. ७ जानेवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता जबरदस्तीने घरात प्रवेश करून त्यांच्यावर हल्ला केला.

फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, घराचा दरवाजा उघडताच संशयितांनी कविता कसबे आणि त्यांच्या पतीवर लाथाबुक्या, कुऱ्हाडीचा दांडा व स्क्रू ड्रायव्हरने मारहाण केली. या हल्ल्यातून ४ ग्रॅमचे दागिने आणि ११,५०० रुपये रोख रक्कम चोरले गेले.

या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून तपास सुरू आहे.

# सरकार आदेशाच्या अमंलबजावणीसाठी लातूर जिल्हा परिषदेला मुहुर्त सापडेना?

**तभा वृत्तसेवा /सुधीर गंगणे**

**औसा, ९ जानेवारी :** शासन निर्णयाला बगल देत राज्यातील इतर जिल्ह्यात वेगळी तर लातूर जिल्ह्यात वेगळीच वेतनश्रेणी देत विशेष शिक्षकांना त्यांच्या वेतनश्रेणीपासून वंचित ठेवले. याबाबत सातत्याने राज्य सरकारकडे पाठपुरावा करुन वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी काढून दोन महिन्यापुर्वीच आदेशित केले. मात्र जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने राज्य सरकारच्या आदेशाची अमंलबजावणी करण्यासाठी टोलवाटोलवी करीत ७० दिवसाचा कालावधी घालविला. त्यामुळे राज्य सरकारच्या आदेशाची अमंलबजावणी करण्यासाठी लातूरच्या जिल्हा परिषद प्रशासनाला मुहुर्त केव्हा सापडणार? अशी चर्चा सुरु आहे.

लातूर जिल्ह्याच्या आग्रहाने आणि पाठपुराव्याने राज्यात ३१५० विशेष शिक्षक पदाची निर्मिती करण्यात आली. मात्र लातूर जिल्हा परिषद प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा फटका जिल्ह्यातील विशेष शिक्षकांना बसला आहे. राज्य सरकारने जिल्ह्यातील ९८ विशेष शिक्षकांना नियुक्ती आदेश दिले असून या शासन निर्णयाला बगल देत, शासन निर्णय समजून न घेता चुकीचे आदेश देण्यात आले होते.

राज्य सरकारच्या या एकाच आदेशानुसार इतर जिल्ह्यात वेगळी वेतन श्रेणी आणि फक्त लातूर जिल्ह्यात फार मोठा अभ्यास करून वेगळी वेतन श्रेणी देण्यात आली होती.केवळ जिल्हा परिषदेच्या भोंगाळ कारभाराचा फटका जिल्हातील ९८ विशेष शिक्षकांना याचा आर्थिक फटका बसला.

### भोंगळ कारभाराचा जिल्ह्यातील विशेष शिक्षकांना फटका

विशेष शिक्षक संघटनेकडून याचा जाब प्रशासनास विचारला असता वेतनश्रेणी बाबत राज्याकडे मार्गदर्शन मागविले जाईल. आणि राज्य सरकार कडून मार्गदर्शन आल्यावर तात्काळ सुधारित आदेश आणि फरकासह वेतनश्रेणी देण्यात येईल. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून आश्वासन देण्यात आले होते. त् औसा तालुक्याचे आ. अभिमन्यू पवार यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घालत राज्य सरकारकडे पाठपुरावा करून वेतनश्रेणीचा प्रश्न निकाली काढला होता. त्याचे पत्र जिल्हा परिषद लातूरला ३०आक्टोबर रोजीच प्राप्त झाले आहे. आज जवळपास ७० दिवसांचा कालावधी उलटूनही आमंलबजावणी झाली नाही. त्यामुळे अगोदरच वेतनश्रेणीत फार मोठी चूक झालेली असताना सुधारित आदेश येऊनही प्रशासनाला सुधारित आदेश द्यायला मुहूर्त का सापडत नाही? हा संशोधणाचा विषय आहे.

एखादे शासन परिपत्रक येऊन महिना महिना त्यावर कार्यवाही होत नसेल तर संबंधित विभाग किती निर्ढावलेला असेल आणि त्याकडे अधिकारी का कानाडोळा करत असतील? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. प्रशासनाच्या या हलगर्जी पणामुळे जिल्ह्यातील ९८ विशेष शिक्षकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

**एक बळी नाहक गेला**

सुधारित वेतनश्रेणी आदेश आणि मागील वर्षाच्या फरकाची वाट पाहता पाहता औसा तालुक्यात कार्यरत असलेले विशेष शिक्षक रवींद्र मोतेवार यांचे ऐन दिवाळीत निधन झाले आहे. यानंतरही संबंधितानी वेळ काढूपणा सुरुच ठेवला असून अजून किती काळ प्रशासन अंत पाहणार व किती बळी घेणार हा प्रश्न निर्माण झाला आहे.

पुणे शिक्षण संचालक कार्यालयाकडून मागील फरक मागवणे बाबत यापूर्वी ३० डिसेंबर २०२५ अंतिम तारीख दिली होती. परंतु यात वाढ करत संचालक कार्यालयाकडून १० जानेवारी वाढीव अंतिम तारीख दिली आहे. त्यामुळे अजूनही सुधारित आदेश लातूर जिल्हा परिषदेकडून निर्गमित झाला नाही. त्यामुळे आदेश कधी मिळणार आणि १० जानेवारी पर्यंत फरक निधी कसा मागवणार असा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. केवळ जिल्हा परिषद प्रशासनाकडून होणाऱ्या आर्थिक नुकसानीची भरपाई संबधित दिरंगाई करणाऱ्यांच्या पगारातून वसुल करण्यात यावी. अशी मागणी संघटनेचे नेते सचिन वळके पाटील यांनी केली आहे.

गेल्या अनेक वर्षांच्या संघर्षानंतर अखेर ८ आक्टोबर २०२४ रोजी राज्यातील ३१५० विशेष शिक्षक शासन सेवेत कायम झाले होते.

त्यानंतर ३० एप्रिल २०२५ रोजी राज्य सरकार कडून सर्व जिल्हा परिषदांना नियुक्ती देण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्याची सर्वात प्रथम अंमलबजावणी महाराष्ट्रात सर्वात मागास समजला जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याने करून २४ जून २०२५ रोजी करुन नियुक्त्या दिल्या होत्या. परंतु ज्या लातूर जिल्ह्याच्या आग्रहाने आणि पाठपुराव्याने राज्यात ४८६० पदांची निर्मिती करण्यात आली त्याच लातूर जिल्ह्याला अजूनही सुधारित आदेश द्यायला मुहूर्त सापडत नसल्याने नेमक पाणी कुठं मुरत आहे? याची चौकशी करुन योग्य कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

# जनावरांच्या आठवडी बाजाराचा वर्धापन दिन



**त.भा. वृत्तसेवा,**

**कासार शिरसी, ९ जानेवारी :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथे जनावरांच्या आठवडी बाजारचा २५ वा वर्धापनदिन व उद्घाटन सोहळा येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

गेल्या २५ वर्षापूर्वी येथे जनावरांच्या आठवडी बाजाराचा शुभारंभ करण्यात आला होता व त्यास मोठा प्रतिसाद मिळाला होता. परिसरातील अनेक शेतकरी व पशुपालकांना याचा लाभ मिळाला या बाजारात खरेदी विक्रीचे मोठे व्यवहार झाले होते मात्र कोरोना काळ व लंपीच्या साथीपासून या बाजाराला उतरती कळा आली होती.

परिणामी जनावरांचा आठवडी बाजार हा पूर्णपणे संपत आला असताना या आठवडी बाजाराला पुन्हा एकदा नवसंजीवनी देऊन हा बाजार जोमात भरविण्याचा उद्देशाने या बाजाराचे २५ वे वर्धापन दिन साजरे करून पुन्हा एकदा नव्याने उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटन निलंगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलत असताना शिवकुमार चिंचनसुरे यांनी परिसरातील सर्व शेतकऱ्यांना आपली जनावरे विक्री व खरेदी करण्यासाठी या बाजाराचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी व्यासपीठावर निलंगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती लालासाहेब देशमुख, सचिव संतोष पाटील, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी चे चेअरमन गुरुनाथप्पा मेलगिरे, व्हा. चेअरमन ओमप्रकाश चिंचनसुरे, माजी जी.प. सदस्य डॉ. भीमराव पाटील, चन्नप्पा होळकुंदे, पशुधन वैद्यकीय अधिकारी डॉ. निवृत्ती बेंबडे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बाळूमामा वेल्हाळ, माजी सरपंच प्रदीप होळकुंदे, बडेसाब लकडहारे, विद्यमान सरपंच ममता डोंबाळे, उपसरपंच विरेश चिंचनसुरे, माजी ग्रा. पं. सदस्य भरत हाक्के, बंडु सावळकर, मल्लया स्वामी, इलाही बलसुरे, युसूफ मुगळे नबी कुरेशी, गोविंद व्यापारी, व्यंकट पाटील यांच्यासह शेतकरी व पशुप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी बिराजदार कोराळीकर यांनी केले.

# रेणापूरच्या उपनगराध्यक्षपदी खैरुनिसा मारूफ अत्तार यांची निवड





**त.भा. वृत्तसेवा,**


**कासार शिरसी, ९ जानेवारी :** रेणापूर नगर पंचायतच्या उपनगराध्यक्षपदी भारतीय जनता पार्टीच्या खैरुनिसा मारूफ अत्तार यांची निवड झाली आहे. स्वीकृत सदस्यपदी भाजपचे रमाकांत वाघमारे व काँग्रेसचे शिवाजी (पदम ) पाटील यांची निवड करण्यात आली.

उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी गुरुवारी रेणापूर नगर पंचायतच्या जुन्या इमारतीच्या सभागृहात दुपारी एक वाजता निवडणूक झाली. त्यावेळी भाजपकडून एक व काँग्रेसकडून एक असे दोन अर्ज आले. दोन्ही अर्ज वैद्य ठरले व मतदान प्रक्रिया हात उंचावून घेण्यात आली. यात भाजपच्या खैरूनिसा मारूफ अत्तार यांना अकरा मते मिळाली. काँग्रेसच्या राजश्री संतोष शिंदे यांना पाच मते मिळाली. राष्ट्रवादी शरद पवार गट एक व अपक्ष एक हे दोघे तटस्थ राहिले. यात उपनगरअध्यक्ष पदासाठी भाजपच्या खैरूनिसा अत्तार यांना विजयी घोषित करण्यात आले.

### स्वीकृत नगरसेवकपदी भाजपचे रमाकांत वाघमारे व काँग्रेसचे शिवाजी पाटील

त्यानंतर स्वीकृत नगरसेवक पदासाठी भाजपकडून रमाकांत वाघमारे व काँग्रेसकडून शिवाजी पाटील या दोघांची नावे आल्याने त्यांना स्विकृत नगरसेवक करण्यात आले. निवड प्रक्रियेची बैठक लोकनियुक्त नगराध्यक्षा शोभा शामराव आकनगिरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी नपचे मुख्याधिकारी रोहित आरबोळे, प्रशासकीय अधिकारी प्रदीप पाटील, ज्ञानदेव दहिफळे, लेखाधिकारी अंकुश फड, अमोल बाजुळगे उपस्थित होते.

# भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू



**त.भा. वृत्तसेवा,**

**किनगाव, ९ जानेवारी :** किनगाव ते अंबाजोगाई या राज्य मार्गावर आनंदवाडी पाटीजवळ गुरुवारी (दि. ८) रात्री झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. भरधाव व निष्काळजीपणे चालविण्यात आलेल्या मारुती स्विफ्ट कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ही दुर्घटना घडली.

या अपघातात संदीप बिभीषण चाटे (वय ३२) व खुशाल उर्फ विठ्ठल व्यंकटराव चाटे (वय ४०, दोघे रा. आनंदवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी) यांचा जागीच मृत्यू झाला. तर अजय चंद्रकांत दराडे (रा. आनंदवाडी) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### अंबाजोगाई मार्गावरील घटना; एक गंभीर

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ८ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास संदीप चाटे हे दुचाकी (एमएच२४ बीई २९४०) किनगावकडून अंबाजोगाईकडे जात होते. यावेळी अंबाजोगाईकडून किनगावकडे येणाऱ्या मारुती स्विफ्ट कार (एमएच ४६ एडी ५८५४) चालकाने वाहन अतिवेगात चालवत दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीस्वार रस्त्यावर फेकले गेले. संदीप चाटे व खुशाल चाटे यांचा जागीच मृत्यू झाला, तर अजय दराडे गंभीर जखमी झाले. अपघातात कारचालकालाही किरकोळ दुखापत झाली आहे. या प्रकरणी संजय बिभीषण चाटे यांच्या फिर्यादीवरून किनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एम. ए. डोके हे करीत आहेत.

# ग्राहक सेवा संस्था राज्य लातूर ग्रामीण महिला जिल्ह्याध्यक्षपदी संगीता नेत्रगावे

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ९ जानेवारी :** ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य लातूर ग्रामीण महिला जिल्ह्यध्यक्ष पदी संगिता नेत्रगावे यांची निवडीचे पत्र देतानी ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अभिजीत औटे यांच्या हस्ते देण्यात आले



सदरील निवड ही संगिता नेत्रगावे यांची निवड ही आज पर्यंत त्यांचे सामाजिक कार्य व त्यांचा लातूर जिल्ह्य भर असल्याला दांडगा जनसंपर्क व ग्राहक जनजागृतीपर अभियान सक्षपने व ग्राहक जनजागृतीपर काम करुन ग्राहक न्याय देण्यासाठी व या माध्यमातून त्यांनी लातूर जिल्ह्य भर संघटन करुन व ग्राहक कसा जागरुक झाला पाहिजे व त्याची लुट केल्यास आपण त्यास न्याय मिळवून देण्याचे काम आपणच करु शकतात त्या मुळे संगिता नेत्रगावे यांची निवड केल्याचे अभिजीत औटे यांनी सांगितले.

सदरील निवडीबद्दल ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य सचिव दिपाली औटे महिला प्रदेशाध्यक्षा दिपाली कवडे कोशाध्यक्ष रतिकांत घोगरे मराठवाडा अध्यक्ष युनूस चौधरी छत्रपती संभाजीनगर महिला जिल्ह्यध्यक्षा शिल्पा चुडीवाल लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाबुराव कदम व सदस्य सय्यद सलीम यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांनी व्यवसायाभिमुख कौशल्ये आत्मसात करावी : डॉ. कदम

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ९ जानेवारी :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील कौशल्ये फक्त आत्मसात न करता सध्या बाजारपेठेमध्ये उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी जाणून घेऊन त्यानुसार आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत असे मत महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर कर्मवीर कदम यांनी व्यक्त केले.

ते कोअर थ्री इनोवेशन्स, लातूर व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तसेच, संगणक शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संगणक शास्त्र, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी मंचावर कोअर थ्री इनोवेशन्सचे आकाश वाडीकर, बसवेश्वर सोनटक्के, श्रीम. श्रुती पाटील, महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी तसेच संगणकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. गिरीश पाटील आदी उपस्थित होते.

पुढे आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांनी सतत नवीन काहीतरी शिकत राहण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आकाश वाडीकर यांनी विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट क्षेत्रात मिळणारे रोजगार हे तुमच्या क्षमतेवर अवलंबून आहेत त्यामुळे फक्त परिक्षेत मार्क्स मिळाल्याने नोकरी मिळणार नाही तेव्हा सध्या विविध कंपनीचे रोजगार पोर्टल सुरू आहेत तर अशा संधींचा सर्वांनी लाभ घ्यायला हवा असे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनमागील उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांचे आभार प्रा. गिरीश पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयूर शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सुरज सोमवंशी, श्री सचिन महिंद्रकर सुनील वाकळे आदींनी प्रयत्न केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

# सुसंस्कारित, स्वच्छ प्रतिबिंब असलेलं हे आत्मचरित्र : डॉ. देवशेट्टे

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ९ जानेवारी :** कै. सुधीर फडके यांच्या आयुष्याच्या अगदी प्रारंभी पासून लहरी नियतीनं जी वणवण भटकंती करायला भाग पाडलं त्या भंडावून सोडणाऱ्या प्रवासात दैन्याचे दशावतार अनुभवत असताना केलेली संगीतसाधना याचं विलक्षण दर्शन घडवणारं आत्मचरित्र म्हणजे जगाच्या पाठीवर हे सुसंस्कारित मनाचं स्वच्छ प्रतिबिंब होय. असे मत डॉ. सुशील शीलाताई सुरेश देवशेट्टे यांनी व्यक्त केले.

गेल्या पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गतच्या वाचक संवादचे ३५२ वे पुष्प नागोराव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सुशील शीलाताई सुरेश देवशेट्टे यांनी सुधीर फडके लिखित जगाच्या पाठीवर या



आत्मचरित्रावर संवाद साधून गुंफले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, सुधीर फडके यांनी किर्लोस्कर' मासिकातून आपल्या आत्मचरित्राचा काही भाग लिहून प्रसिद्ध केला होता. त्यात त्यांच्या लहानपणीच्या व अगदी सुरुवातीच्या खडतर उमेदीच्या काळातील आठवणी लिहिल्या होत्या.

यावेळी त्यांनी कांही गीते गाऊन दाखवली. या संवादा नंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोपात माजी गट शिक्षणाधिकारी नागोराव भोसले यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजपाल पाटील यांनी केले, संवादकांचा परिचय संदीप चेलवे यांनी करून दिला शेवटी आभार सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी शिवशंकर पाटील यांनी मानले.

# समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी दुआ

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, ९ जानेवारी :** देशात शांतता, सामाजिक सलोखा, बंधुता, एकात्मता, तसेच समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी विशेष दुआ करण्यात आली.धर्मगुरूंनी सत्य, संयम, सदाचार, मानवतेची सेवा आणि समाजात प्रेमभावना वाढवण्याचे महत्त्व उपस्थितांना सांगितले.तसेच प्रत्येक माणूस मानवतेच्या नात्याने एकमेकांचा आदर करावा, असा संदेश देण्यात आला.

### वलांडीतील दोन दिवसीय इज्तेमाची सांगता

वलांडी येथे दि. ७ व ८ जानेवारी २०२६ रोजी पहिल्यांदाच तब्लिगी उमूनी इज्तेमा आयोजित करण्यात आला होता, या दोनदिवसीय धार्मिक संमेलनासाठी देवणी तालुक्यासह वलांडी, गुरनाळ, मोघा, उदगीर, पंचक्की, मुसानगर तसेच कर्नाटक सीमाभागातील कमालनगर या केंद्रातून व



परिसरातून हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निलंगा-उदगीर रोडवरील उस्मानिया कॉलनी येथे महेमूद सौदागर, सलीम सौदागर व सादकसेठ सौदागर यांच्या १२ ते १३ एकर जागेवर हा इज्तेमा पार पडला.

भाविकांच्या सोयीसाठी ३५ हजार स्क्वेअर फुटांचा भव्य मंडप उभारण्यात आला , त्यात एकाचवेळी १५ ते २० हजार भाविक बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली होती तसेच या इज्तेमाच्या निमित्ताने मुस्लिम समाजातील जोडप्यांचे विवाहही संपन्न झाले. साधेपणा, धार्मिक शिस्त व खर्च टाळण्याच्या उद्देशाने सामूहिक स्वरूपात हे निकाह पार पडले. यामुळे विनाकारण केला जाणारा खर्च वाचवून, सामाजिक सुधारणा व सुन्नत पद्धतीने विवाह करण्याचा संदेश समाजात दिला गेला.

या इज्तेमात शिस्त, साधेपणा, बंधुता व एकात्मतेचा संदेश दिला जातो. पाच वेळची नमाज, जिक्र, दुआ व अल्लाहच्या स्मरणावर विशेष भर देण्यात येतो. येथे कोणत्याही प्रकारच्या वाद-विवाद वा टीका-टिप्पणीस पूर्णतः स्थान नसते.

दि. ८ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता दुआने इज्तेमाची सांगता झाली असून, त्यानंतर काही जमाती चार महिने व चाळीस दिवसांच्या धार्मिक दौऱ्यावर रवाना झाल्या आहेत. या इज्तेमामुळे धार्मिक सलोखा, सामाजिक ऐक्य व आत्मिक शांततेचा संदेश सर्वत्र पोहोचला आहे.

दरम्यान, स्थानिक पोलीस प्रशासन व महसूल विभाग आणि ग्रामपंचायत कार्यालय यांच्याकडून इज्तेमागाहचा वेळोवेळी आढावा घेण्यात आला. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी शेकडो स्वयंसेवकांची टीम कार्यरत होती.

# सचिन भिकाणेंना अंधोरी जि.प. गटातून विजयी गुलाल लावणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १० जानेवारी :** आगामी काळात होणाऱ्या जि.प.व.पं.स.निवडणुक २०२६ च्या



निवडणुकीत अंधोरी जिल्हा परिषद गटातुन भारतीय जनता पार्टीचे इच्छुक उमेदवार सचिन शिवाजीराव भिकाणे यांना निवडुण आणण्याचा निर्धार भव्य कार्यकर्त्यां संवाद बैठकीत घेण्यात आला.

ढाळेगाव ता.अहमदपूर येथे शिवाजीराव भिकाणे यांच्या निवासस्थानी अंधोरी जि.प.गटातील भाजपा कार्यकर्त्यांची संवाद बैठक पार पडली. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करत सर्व मिळून विजयाचा गुलाल लावणार असल्याचा निर्धार व्यक्त केला.

या बैठकीसाठी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांना शिवाजीराव भिकाणे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले अंधोरी जिल्हा परिषद गट आणि त्यातील समस्या दूर करण्यासाठी आता तरूण नेतृत्वाची गरज असल्याने सचिन भिकाने हे येणाऱ्या निवडणुकीत उमेदवार असणार आहेत. त्यांना या भागाचा संपूर्ण परिसर माहिती आहे व काम करण्याची जिद्द असल्याने त्यांना संधी देत सर्वांच्या सहकार्यानं आपल्याला यश मिळवायचे आहे. या संवाद बैठकीसाठी असंख्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जिल्ह्यात विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने १ जानेवारी ते ८ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हाभर विविध जनजागृती व सुरक्षा उपक्रम राबविण्यात आले.

मांजरा साखर कारखाना परिसरात ट्रॅक्टर-ट्रेलर व ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली. वायुवेग पथकातील मोटार वाहन निरीक्षक व सहायक मोटार वाहन निरीक्षकांनी रिफ्लेक्टर टेप लावून त्याचे फायदे चालकांना समजावून सांगितले.

तसेच धाराशिव शहरातील वरुडा रोड येथे पादचाऱ्यांसाठी 'वॉक ऑन राईट' संकल्पनेबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी माहितीपत्रके व बॅजचे वाटप करण्यात आले. तामलवाडी टोल नाका येथे टोल कर्मचारी, वाहतूक पोलीस व वाहन चालकांना रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत दुचाकीस्वारांनी हेल्मेट व चारचाकी वाहनचालकांनी सीट बेल्ट वापरणे, मद्यपान करून वाहन चालवू नये तसेच अपघातग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### तरुण भारतचे अंबादासराव पोपळे यांना राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्कार प्रदान

**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
सोलापूर तरुण भारतचे तुळजापूर विशेष प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार अंबादासराव पोपळे यांना सहायक माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई निलेश तायडे यांच्या हस्ते शाल श्रीफळ फेटा व भव्य सत्कार करून राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्कार देण्यात आला. मराठी पत्रकार दिनानिमित्त हिंदी म राठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दर्पण रत्न पुरस्कार २०२६ कार्यक्रम मलकापूर येथील मराठा मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ ९००१२०१५ प्रमाणित हिंदी मराठी पत्रकार संघच्या वतीने विविध क्षेत्रातील दर्पण रत्न पुरस्कार २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.प्रा. अनिल खर्चे (प्राचार्य व्ही. बी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज) तर प्रमुख पाहुणे अशांत भाई वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ, धनश्री काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले.



### पत्रकार दिनानिमित्त नळदुर्ग येथे पत्रकारांचा सन्मान

**नळदुर्ग, दि.९ जानेवारी -**
नळदुर्ग नगरपालिकेवर भाजपची सत्ता येण्यात शहरातील पत्रकारांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त आयोजित सत्कार समारंभात केले. शहर भाजप व नगराध्यक्षांच्या वतीने भाजप कार्यालयात पत्रकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष धरणे म्हणाले की, निवडणुकीदरम्यान पत्रकारांनी भाजपच्या कामांची वस्तुनिष्ठ माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली. भविष्यातही शहर विकासासाठी सकारात्मक पत्रकारितेचे सहकार्य अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पत्रकार भवन उभारणीची मागणी लवकरच पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन दिले. कार्यक्रमास नगरसेवक, भाजप पदाधिकारी व शहरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मराठी पत्रकार दिनानिमित्त इटकळ येथे पत्रकारांचा सन्मान

**इटकळ दि.९ जानेवारी -**
६ जानेवारी रोजी मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त समर्थ हॉटेल इटकळ व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हा सचिव अब्दुल शेख यांच्या वतीने पत्रकारांचा यथोचित सन्म ान करण्यात आला. इटकळ बिटचे पोलिस हेड कॉन्स्टेबल संदीपान कोळी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, २०२६ डायरी व पेन देऊन पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अब्दुल शेख यांनी पत्रकारितेचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. सत्काराला उत्तर देताना दयानंद काळूके व दिनेश सलगरे यांनी आयोजकांचे आभार मानले. कार्यक्रमास विविध पत्रकार व मान्यवर उपस्थित होते.



### 'अविष्कार २०२६'मध्ये तेरणा इंजिनिअरिंगची ऐश्वर्या सक्राते प्रथम

**धाराशिव दि.९ जानेवारी -**
विद्यापीठस्तरीय 'अविष्कार २०२६' संशोधन प्रकल्प स्पर्धेत तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज, धाराशिव येथील एम.टेक (संगणक अभियांत्रिकी) प्रथम वर्षाची विद्यार्थिनी ऐश्वर्या दत्तात्रय सक्राते हिने उत्कृष्ट संशोधन प्रकल्प सादर करून प्रथम क्रमांक व सुवर्णपदक पटकावले. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या झोनल फेरीत तेरणा महाविद्यालयाच्या सात विद्यार्थ्यांनी यश मिळवले होते. त्यानंतर ६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विद्यापीठस्तरीय फेरीत पदव्युत्तर गटातून ऐश्वर्या सक्राते हिने सर्वोच्च यश संपादन केले. व्यवस्थापन, वाणिज्य व कायदा या विषयगटातील तिच्या संशोधन प्रकल्पाला सामाजिक उपयुक्तता, डेटा विश्लेषण आणि सादरीकरणासाठी परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, व्यवस्थापन, मार्गदर्शक प्राध्यापक व सर्व विभागप्रमुखांनी ऐश्वर्या सक्राते हिचे अभिनंदन केले.

# नळदुर्ग नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदाची निवड १६ जानेवारीला; उत्सुकता शिगेला




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ जानेवारी -**
नळदुर्ग नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदाची निवड सोमवार दि. १६ जानेवारी रोजी होणार असून या पदावर कुणाची वर्णी लागणार याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे. नगराध्यक्षपदाचा निकाल लागून पंधरा दिवसांहून अधिक कालावधी लोटला असून आता उपनगराध्यक्षपदाच्या निवडीबाबत राजकीय हालचालींना वेग आला आहे.

उपनगराध्यक्षपद तसेच स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी दि. १६ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता नगरपालिका कार्यालयात सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. नगरपालिकेत भाजप-शिवसेना युतीचे बहुमत असून युतीचे ११ नगरसेवक तर काँग्रेसचे ९ नगरसेवक आहेत. त्यामुळे उपनगराध्यक्षपदावर भाजप-शिवसेना युतीचाच उमेदवार विराजमान होणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

सध्या भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक दत्तात्रय दासकर आणि नय्यर जहागीरदार यांच्या नावांची जोरदार चर्चा आहे. मात्र आमदार राणा जगजितसिंह पाटील आणि भाजपचे नेते सुनिल चव्हाण हे अनुभवी नगरसेवकाला संधी देणार की नव्या चेहऱ्यावर विश्वास ठेवणार, याबाबत उत्सुकता आहे. नव्या चेहऱ्याला संधी दिल्यास प्रभाग क्र. ५ मधून प्रथमच निवडून आलेले नगरसेवक तानाजी जाधव यांची उपनगराध्यक्षपदी वर्णी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण या प्रभागातून भाजपचे दोन्ही उमेदवार विजयी झाले असून नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनाही याच प्रभागातून मोठे मताधिक्य मिळाले आहे. दरम्यान, नगरपालिकेच्या दोन स्वीकृत सदस्यांच्या निवडीकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. पक्षीय संख्याबळ पाहता एक स्वीकृत सदस्य भाजप-शिवसेना युतीचा तर एक काँग्रेसचा होणार आहे. भाजपकडून स्वीकृत सदस्यपदासाठी अनेक इच्छुक असल्याने नेत्यांना निवड करताना मोठी कसरत करावी लागणार आहे. निवडणुकीत पक्षासाठी प्रामाणिकपणे काम केलेल्या जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

एकूणच १६ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडीकडे नळदुर्ग शहराचे लक्ष लागले असून उपनगराध्यक्षपदाच्या निर्णयामुळे नगरपालिकेतील राजकीय समीकरणे स्पष्ट होणार आहेत.

## शिवजयंतीनिमित्त धाराशिव येथे सर्वधर्मीय, बिगर हुंडा सामुदायिक विवाह सोहळा

**माजी मंत्री तथा आ.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
केवळ शिवजयंती साजरी करण्यापुरते मर्यादित न राहता समाजाच्या गरजा ओळखून प्रत्यक्ष कृतीत उतरावे, या उद्देशाने मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीने यंदा सर्वधर्मीय, बिगर हुंडा सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले आहे. हा विवाह सोहळा संपूर्ण महाराष्ट्रातील गरजू कुटुंबांसाठी खुला असणार आहे.



२०२४-२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असून, आर्थिक अडचणींमुळे शिक्षण व विवाह करणे कठीण झाले आहे. ही सामाजिक गरज लक्षात घेऊन हा उपक्रम राबवण्यात येत असल्याचे प्रा.डॉ. आमदार तानाजी सावंत यांनी सांगितले. हा उपक्रम केवळ धाराशिवपुरता मर्यादित नसून राज्यभरातील गरजू कुटुंबांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावर्षी मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती म होत्सवाचे अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे असून, त्यांच्या संकल्पनेतून हा समाजोपयोगी उपक्रम साकारत आहे. हा भव्य मात्र साधेपणात पार पडणारा सामुदायिक विवाह सोहळा ८ फेब्रुवारी २०२६ रोजी धाराशिव शहरातील कन्या प्रशाला प्रांगणात होणार आहे. शिवजयंतीच्या म ाध्यमातून समाजसेवेचा नवा व प्रेरणादायी आदर्श निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी किसान विकास पत्र योजना कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद धाराशिव यांच्या वतीने पाच टक्के दिव्यांग कल्याण निधीतून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या जास्त दिव्यांगत्व असलेल्या प्रथम २०० विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी २० हजार रुपये प्रमाणे किसान विकास पत्र देण्याची योजना राबविण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थी २०० विद्यार्थ्यांची यादी व एकूण ४० लाख रुपयांचा धनादेश २ जानेवारी २०२६ रोजी टपाल खात्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना कार्यान्वित करण्यात आली.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी सचिन कवले, देवदत्त गिरी, सच्चिदानंद बांगर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नळदुर्ग शहर स्वच्छतेला सुरुवात : नगराध्यक्ष धरणे ॲक्शन मोडवर

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ जानेवारी -**
नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारताच नळदुर्ग नगरपालिकेचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी शहर स्वच्छतेला प्राधान्य देत कामास सुरुवात केली आहे. अनेक दिवसांपासून अस्वच्छ राहिलेला गोलाई चौक ते रोकडया हनुमान मंदिरापर्यंत राष्ट्रीय महामार्गालगतचा भाग ६ जानेवारीपासून स्वच्छ करण्यात येत आहे.

प्रशासकीय राजवटीत गंभीर बनलेला स्वच्छतेचा प्रश्न सोडवण्यासाठी थेट मैदानात उतरून नगराध्यक्षांनी काम हाती घेतले आहे.

पहिल्या टप्प्यात महाम ार्गालगतचा भाग स्वच्छ केल्यानंतर शहरातील सर्व धर्मीय स्मशानभूम ींची स्वच्छता करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्वच्छता मोहिमेत नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह नगरसेवक दत्तात्रय दासकर, तानाजी जाधव, पांडुरंग पुदाले, रीजवान काझी, किशोर नळदुर्गकर उपस्थित होते. स्वच्छतेत हलगर्जीपणा झाल्यास कडक कारवाईचा इशाराही नगराध्यक्षांनी दिला आहे.

दरम्यान, मराठा गल्ली येथील सहा महिन्यांपासून बंद असलेली नगरपालिका बोअरही कार्यान्वित करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून नगराध्यक्षांच्या कामगिरीचे स्वागत होत आहे.



## दर्पण दिनानिमित्त 'रा.स्व. संघा'कडून पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
मराठी पत्रकार दिनानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रचार विभागाच्या वतीने पत्रकारांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी भास्कर ब्रम्हनाथकर लिखित आणीबाणीचे ते दिवस या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जिल्हा कार्यवाह अजय जानराव यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन करत संघाच्या शताब्दी वर्षानिमि त्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

पंचपरिवर्तन, गृहसंपर्क अभियान, हिंदू मेळावे आदी उपक्रमांतून सामाजिक प्रबोधन व संघटनाचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

पुस्तक प्रकाशनप्रसंगी बोलताना लेखक भास्कर ब्रम्हनाथकर यांनी आणीबाणीच्या काळातील अनुभव मांडत लोकशाही बळकट करण्यासाठी नागरिकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले.

यावेळी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय रणदिवे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष देविदास पाठक, विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी व इतर मान्यवरांनी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास शहरातील विविध दैनिके व वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ समाजसेवक रमाकांत कुलकर्णी यांचा सोमवारी नागरी सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.९ जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा (ताड) येथील सहयोग निर्मिती संस्थेचे संस्थापक, ज्येष्ठ सम ाजसेवक रमाकांत बापू कुलकर्णी यांचा नागरी सन्मान १२ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा सन्मान हिप्परगा (ताड) येथील ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात येत आहे.



शहरी कष्टकऱ्यांचे विस्थापन, पाणीप्रश्न, नदी प्रदूषण, हवामान बदल अशा विविध विषयांवर कार्य करणारे रमाकांत कुलकर्णी अनेक शासकीय व निमशासकीय पुरस्कारांचे मानकरी आहेत.

या नागरी सन्मान सोहळ्यास माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, पर्याय संस्थेचे संस्थापक विश्वनाथ तोडकर, समाज विकास संस्थेचे अध्यक्ष भुमिपुत्र वाघ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रम ुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती आयोजक अरुण दळवे यांनी दिली आहे.

### तेरणा महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन व नशा मुक्त भारत अभियान शिबिर

**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण उस्मानाबाद आणि यश मेडिकल फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिन व नशा मुक्त भारत अभियान व कायदेविषयक जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमात वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश भाग्यश्री पाटील, डॉ. संदीप तांबारे, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, अँड. अभय पाथरूडकर, डी.के. देवळे, प्रा.डॉ. प्रीती माने व अँड. मोहिनी शिरुरे उपस्थित होते.

## वाममार्गाची प्राप्ती विनाशाकडे वाटचाल : रामचंद्र आलुरे

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.९ जानेवारी -**
दर्पण दिनाचे औचित्य साधून अणदूर ग्रामपंचायतीच्या वतीने अणदूर येथील सर्व पत्रकारांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना अणदूरचे सरपंच तसेच शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव रामचंद्र आलुरे यांनी पत्रकारांनी सम ाजातील समस्या व अडचणी सत्ताधाऱ्यांपुढे मांडत आरशाची भूमिका बजावावी, असे मत व्यक्त केले.



वाममार्गाने मिळवलेली संपत्ती विनाशाकडे नेते, तर सन्मार्गाने मिळालेली संपत्ती सुख, समृद्धी व सन्मान देणारी ठरते, असे सांगून त्यांनी खोटी किंवा खात्री न करता दिलेली बातमी समाजात गैरसमज निर्माण करते, याकडे लक्ष वेधले. निस्पृह, निस्वार्थ व वस्तुनिष्ठ पत्रकारिता ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अणदूर गावाचा शैक्षणिक, सामाजिक व राजकीय वारसा म हाराष्ट्रभर पोहोचविण्यात स्थानिक माध्यम प्रतिनिधींचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्राम पंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे यांनी केले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य बालाजी घुगे, डॉ. विवेक बिराजदार, अनिता घुगरे, ग्राम विकास अधिकारी संजय माशाळे, माजी सरपंच प्रबोध कांबळे यांच्यासह सर्व माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते.

## पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरीय कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होऊन लिंग गुणोत्तराचे प्रमाण सुधारावे व सम ाजात जनजागृती व्हावी या उद्देशाने धाराशिव जिल्ह्यात तालुकास्तरावर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत आजपर्यंत सात तालुकास्तरीय कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडल्या असून आज धाराशिव तालुक्याची कार्यशाळा जिल्हा रुग्णालयातील जिल्हा परिचारिका प्रशिक्षण सभागृहात उत्साहात संपन्न झाली.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या सूचनेनुसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी पीसीपीएनडीटी कायद्याचे महत्त्व, गर्भलिंग निदानास प्रतिबंध व लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठीच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यशाळेत धाराशिव तालुक्यातील सोनोग्राफी व एमटीपी केंद्रधारक, स्त्रीरोगतज्ज्ञ, शासकीय व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक, आयएमए व एफओजीएसआयचे पदाधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी तसेच आशा कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.

मार्गदर्शन करताना डॉ. धनंजय चाकूरकर यांनी लिंग गुणोत्तर संतुलनासाठी जनजागृती व खबरी योजनेचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. दत्तात्रय खुणे यांनी गावपातळीवर सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज व्यक्त केली. पीसीपीएनडीटीचे नोडल अधिकारी डॉ. अनिल चव्हाण यांनी तालुकानिहाय लिंग गुणोत्तराचा आढावा घेतला, तर विधी सल्लागार ड. रेणुका शेटे यांनी कायद्याच्या तरतुदी स्पष्ट केल्या.

कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तानाजी लाकाळ, एफओजीएसआयचे अध्यक्ष डॉ. आदिनाथ राजगुरू, आयएमएचे अध्यक्ष डॉ. महेश कानडे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन किंवा गर्भलिंग निदानाबाबत माहिती देणाऱ्यास खातरजमा होऊन गुन्हा दाखल झाल्यास राज्य शासनामार्फत एक लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येते व माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते. यासाठी हेल्पलाईन क्रमांक १८००-२३३-४४७५/१०४ किंवा www.amchimulgimaha.in या संकेतस्थळावर तसेच नजीकच्या आरोग्य कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## निवडणुकीनिमित्त लातूर शहरातील मद्यविक्री राहणार बंद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका निवडणूक २०२५ अंतर्गत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी, तर मतमोजणी १६ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. ही निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ (सी) अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार मतदानापूर्वीचा संपूर्ण दिवस म्हणजे १४ जानेवारी २०२६, मतदानाचा संपूर्ण दिवस १५ जानेवारी २०२६ रोजी लातूर शहर महानगरपालिका क्षेत्राच्या हद्दीतील सर्व अबकारी अनुज्ञप्त्या (मद्य दुकाने) बंद राहतील. याशिवाय, मतमोजणीच्या दिवशी म्हणजे १६ जानेवारी २०२६ रोजी ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, त्या ठिकाणच्या परिसरातील मद्यविक्री अनुज्ञप्त्याही बंद राहतील. एफएल-२, एफएलबीआर-२, एफएल-३, एफएल-४, एफएलबीआर-११ तसेच ताडी अनुज्ञप्ती इत्यादी सर्व प्रकारच्या मद्यविक्री अनुज्ञप्त्या या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केले आहेत. याबाबतची कार्यवाही संबंधित यंत्रणांना निर्देशित करण्यात आली आहे.



# लातूरकरांनी ठरवले तर काहीही करु शकतात : अजित पवार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** लातूरचा मतदार सुजाण आणि चाणाक्ष आहे. लातूरकरांनी ठरवले तर ते काहीही करू शकतात, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केले.

लातूर येथे मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने शुक्रवारी दुपारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या भव्य मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या विकास संकल्प सभेत ते मार्गदर्शन करत होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, आ. संजय बनसोडे, या. विक्रम काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, बबन भोसले, मुर्तूजा खान, माजी महापौर




विक्रांत गोजमगुंडे, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे ५६ अधिकृत उमेदवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत सहा अपक्ष अशा एकूण ६१ उमेदवारांची प्रमुख उपस्थिती होती. भाजप प्रदेशाध्यक्षांचा नामोल्लेख न करता उपमुख्यमंत्री अजित पवारांनी रवींद्र चव्हाणांच्या लातुरातील वक्तव्याबद्दल बोलताना, कोणीतरी येथे आले आणि त्यांनी स्व. विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसून काढण्याची भाषा केली, असे सांगताना महाराष्ट्र हा प्रकार कदापि सहन करणार नाही असे सांगितले. बोलायला पैसे पडत नाहीत म्हणून काहीही बोलायचे नसते. राज्याच्या विकासात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, विलासरावांचाही मोलाचा वाटा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे असेही ते म्हणाले.

लातूर शहर मनपा राष्ट्रवादी काँग्रेसच्याताब्यात द्या, येथेही पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर नेत्रदीपक असा विकास करू. लातूरचा चेहरा - मोहरा बदलून टाकू. लातूरच्या सर्वच नागरी समस्यांची सोडवणूक करण्यास आपण कटिबद्ध असल्याचे पवार यांनी सांगितले. आपण लातूरबद्दल आपल्या लहानपणापासून ऐकत आलो आहोत. मराठवाड्यातील सर्वाधिक वेगाने होणारे हे एक विकसनशील शहर आहे. लातूरच्या मतदारांनी आतापर्यंत अनेकांना संधी दिली आहे. यावेळी आम्हाला संधी द्या. लातुरात काँग्रेसचे वर्चस्व असतानाही लातूरकरांनी नगराध्यक्ष म्हणून राष्ट्रवादीच्या डॉ. जनार्दन वाघमारे यांना निवडून दिले होते, त्यामुळे लातूरकरांनी ठरवले तर ते काहीही करू शकतात, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसने यावेळी उच्च विद्याविभूषित उमेदवारांसह सर्व जाती धर्माच्या चेहऱ्यांना उमेदवारी देऊन समाजाचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. लातूरच्या विविध प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या आश्वासनसोबतच त्यांनी विकासासाठी नेतृत्वाकडे तशी दृष्टी असणे खूप महत्वाचे असल्याचे बोलून दाखविले.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आ. संजय बनसोडे, आ. विक्रम काळे, विक्रांत गोजमगुंडे, व्यंकट बेद्रे, बळवंत जाधव , विनोद खटके, ऐश्र्वर्या खटके यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. अफसर शेख, राष्ट्रवादीचे लातूर जिल्ह्यातील सर्व नवनिर्वाचित नगरसेवक यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. शेवटी चंद्रकांत बोराजदार यांनी आभार प्रदर्शन केले.

## लातूर बॅडमिंटन लिगचे आज उद्‌घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** लातूर जिल्हा बॅडमिंटन लिगच्या वतीने आयोजित लातूर बॅडमिंटन लिग सिजन-२ चे उद्घाटन शनिवार दि. १० जानेवारी रोजी संपन्न होणार आहे. भारताचे पॅराऑलिम्पिक मधील पहिले सुवर्ण पदक विजेते, निवृत्त सैनिक, पद्मश्री व अर्जून पुरस्कार प्राप्त मुरलीकांत पेठकर यांच्या हस्ते या लिगचे उद्घाटन संपन्न होणार आहे.

यावेळी जिल्हा पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांच्यासह दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, असोसिएशनचे सचिव आशिष बाजपाई हे देखील उपस्थित राहणार आहेत. दयानंद इनडोअर स्टेडिअम येथे सकाळी नऊ वाजता उद्घाटन समारंभ संपन्न होणार आहे.

स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून दि. १० ते १२ जानेवारी आणि १७ व १८ जानेवारी रोजी या स्पर्धा होणार आहेत. मुरलीकांत पेठकर यांच्या जिवनावर चंदु चॅम्पियन हा चित्रपटही काढण्यात आलेला आहे. ते या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असणार आहेत.

१० जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजता क्रीडा संकुल ते दयानंद बॅडमिंटन हॉल अशी शोभा यात्रा निघणार आहे. त्यात स्पर्धेत सहभागी होणारे ३०० खेळाडू सहभागी होतील. १२ संघ मालकांनी लिलावातून निवडून घेतलेल्या खेळाडूंमध्ये ही स्पर्धा होणार आहे.

स्पर्धेच्या आयोजनासाठी आशिष सोमाणी, बाबूराव गायकवाड, आनंद बंग, आनंद लाहोटी, श्रीकांत चांडक, दुर्गेस ब्रिजवासी व पवण मालपाणी हे परिश्रम घेत आहेत. या स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष सतीश देशमुख व आशिष बाजपाई यांनी केले आहे.

## तंबाखू नियंत्रण समितीची आढावा बैठक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समितीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत वर्षभरातील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

उपजिल्हाधिकारी ठाकूर यांनी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये व त्यांच्या परिसरात तंबाखूचा वापर पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश दिले. कोपटा २००३ कायद्यानुसार कार्यालय प्रमुखांनी दंडात्मक कारवाई करून आपले कार्यालय तंबाखूमुक्त ठेवावे, असे आवाहन श्रीमती ठाकूर यांनी




केले. तसेच, जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना तंबाखूमुक्त करण्यावर भर देण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी शालेय प्रशासनाने प्रयत्न करावेत आणि तंबाखूमुक्त शाळेचे निकष पूर्ण करावेत, अशा सूचना शिक्षण अधिकारी व शिक्षण विभागाला देण्यात आल्या.

बैठकीला पोलीस उपाधीक्षक दिलीप सगर, सहाय्यक आयुक्त (अन्न व औषधी प्रशासन) प्रशांत काकडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ. आनंद कलमे, विक्रीकर अधिकारी श्री. सुरवसे तसेच सर्व तालुकास्तरीय गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

## १७ अपक्ष उमेदवार शिंदे सेनेत दाखल!

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निकाला आधीच धडाका लावला आहे. लातूर महापालिका निवडणुकीमध्ये उभे असलेल्या तब्बल १७ अपक्षांनी शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिला आणि पक्षात प्रवेशही केला आहे.

शिंदे यांनी पक्षाच्या वतीने सर्वांचे स्वागत करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी शिंदेंच्या उमेदवारासाठी ही निवडणूक सोपी झाल्याची चर्चा आहे. लातूर महानगरपालिकेतील १७ अपक्ष उमेदवारांनी भगवा झेंडा हाती घेत शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत त्या सर्वांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

## ४ लाख ४४ हजार वीज ग्राहकांकडे ११७ कोटी ८८ लाखांची थकबाकी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** महावितरणच्या लातूर मंडळात लघूदाब वर्गवारीतील ४ लाख ४४ हजार ४१२ वीजग्राहकांकडे ११७ कोटी ८८ लाख रुपयांची थकबाकी आहे. अशावेळी थकबाकीदारांवर महावितरणने वसुली मोहीम अधिक तीव्र केली असून वीजपुरवठा खंडीत केलेल्या वीजग्राहकांना पुनर्जोडणीचा दंड भरण्यापासून वाचायचे असेल तर देय तारखेच्या आत आपले वीजबील थकबाकीसह भरावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणने थकबाकी वसुली मोहिम अधिक गतिमान केली आहे. लातूर मंडळात लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्य व औद्योगिक व इतर वर्गवारीतील ४ लाख ४४ हजार ४१२ ग्राहकांकडे ११७ कोटी ८८ लाख रूपये वीजबिलांची थकबाकी आहे. यामध्ये उदगीर विभागातील आज अखेर १ लाख ४१ हजार ८८१ वीजग्राहकांकडे ४५ कोटी ११ लाख रूपये थकबाकी आहे. तर निलंगा विभागातील १ लाख ७०२ वीजग्राहकांकडे २० कोटी ४४ लाख रूपये थकबाकी आहे. त्याचबरोबर लातूर विभागातील २ लाख १ हजार ८२९ वीजग्राहकांकडे ५२ कोटी ३३ लाख रूपये थकबाकी आहे. वारंवार आवाहन करूनही गेल्या ९ दिवसात घरगुती ग्राहकांनी ६ कोटी ७९ लाख तसेच व्यावसायिक ग्राहकांनी २ कोटी ४ लाख, औद्योगिक ग्राहकांनी १ कोटी २२ लाख व इतर वर्गवारीतील २९ लाख रूपयांचे वीजबील भरले आहे. मागणीच्या तुलनेत हे प्रमाण अत्यल्प असल्याने थकबाकीचा डोंगर सातत्याने वाढतच जात आहे.

महावितरणने ग्राहकांना महावितरणच्या संकेतस्थळावर, महावितरण मोबाईल ॲपद्वारे कधीही व कुठूनही ऑनलाईन पध्दतीने नेटबँकिंग, क्रेडिट-डेबिट-कॅश कार्ड, मोबाईल वॅलेटव्दारे वीजबिले भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच थकबाकीदार ग्राहकाचा वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरूपात खंडित केला असल्यास पुर्नजोडणी शुल्कापोटी सिंगल फेजसाठी ३१० रुपये, थ्री फेजसाठी ५२० रुपये व अधिक जीएसटीसह भरावे लागतात. ही पुर्नजोडणी शुल्कही ऑनलाईनची सुविधा आहे.

## खेलो इंडिया ट्रायबल गेम्ससाठी निवड चाचणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** छत्तीसगढ राज्यात निश्चित झालेल्या पहिल्या खेलो इंडिया ट्रायबल गेम्स-२०२५-२६ साठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात राज्यस्तरीय निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येत आहे.

या स्पर्धेत फुटबॉल, हॉकी, आर्चरी, थलेटिक्स, जलतरण, वेटलिफ्टिंग आणि कुस्ती अशा ७ खेळप्रकारांचा समावेश आहे. राज्यस्तरीय निवड चाचण्यांमधून राष्ट्रीय निवड चाचणीसाठी खेळाडू व संघांची निवड करण्यात येईल. संबंधित खेळ संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीनुसार राज्यस्तरीय निवड चाचण्यांचा कार्यक्रम १३ जानेवारी २०२६ रोजी विविध ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

## अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणी न्यायाची उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** जवाहर नवोदय विद्यालयात शिकणाऱ्या अनुष्का पाटोळे हिच्या मृत्यूप्रकरणाची सखोल चौकशी व्हावी व तिच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, अशी मागणी युवा सेनेच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे. युवा सेनेचे लातूर जिल्हा प्रमुख कुलदीप सूर्यवंशी यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन यासंबंधीचे निवेदन सादर केले.

सदर निवेदनात कु.अनुष्का पाटोळे हिस लातूरच्या जवाहर नवोदय विद्यालयातील शिक्षक-कर्मचाऱ्यांनी मारहाण केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. कमिटीलाही सह आरोपी करण्यात



यापूर्वीही या विद्यालयामध्ये दोन वेगवेगळ्या घटना घडलेल्या असून प्रशासनांकडे त्याकडे दुर्लक्ष्य केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

अनुष्काच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या सर्व आरोपींना कठोर शिक्षा व्हावी तसेच जिल्हाधिकारी व जवाहर विद्यालयाच्या यावेत, अशी मागणी निवेदनात केली आहे. यावेळी युवा सेना निरीक्षक धीरज देशमुख, महिला जिल्हा प्रमुख अर्चना बिरादार, रेणापूर शहर प्रमुख रवी चव्हाण, अजय गजाकोष, सौरव साबदे, शाम राजे, निलेश मांदळे, अनंतराम चव्हाण, जोगदंड आदी उपस्थित होते.

## विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी स्वतंत्र चौकशीची मागणी

### एनएसयूआयचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** जवाहरलाल नवोदय विद्यालय, लातूर येथे इयत्ता सातवीत शिक्षण घेत असलेल्या कु. अनुजा पाटोळे या विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणाची आत्महत्या म्हणून नोंद करण्यात आल्याने संशय व्यक्त होत असून, या घटनेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी एन.एस.यू.आय. (विद्यार्थी काँग्रेस) लातूरच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी व शिक्षण अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, उपलब्ध माहिती व परिस्थिती लक्षात घेता हा मृत्यू आत्महत्येचा नसून, शाळेतील मानसिक ताण, शैक्षणिक दबाव, समुपदेशनाचा अभाव तसेच प्रशासनाची दुर्लक्षाची




भूमिका कारणीभूत असण्याची शक्यता आहे. इतक्या लहान वयातील विद्यार्थिनीचा मृत्यू ही अत्यंत गंभीर बाब असून, केवळ आत्महत्येचा ठपका लावून प्रकरण बंद करणे अन्यायकारक ठरेल, असेही नमूद करण्यात आले आहे.

एनएसयूआयने या प्रकरणाची सखोल व पारदर्शक चौकशी करणे, संबंधित शाळा प्रशासन, शिक्षक व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्र्चित करणे, दोषी आढळल्यास कठोर कारवाई करणे, मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबाला न्याय व योग्य मदत देणे तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी नवोदय विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशा मागण्या केल्या आहेत. यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, महेश सोळंके, उबेद शेख, प्रथमेश राठोड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## विधी अभ्यासक्रमाच्या सीइटीचे ऑनलाईन अर्ज

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ जानेवारी :** एल एल बी (पाच वर्ष) व एलएलबी (तीन वर्ष) विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाची एमएचटी सीईटी लॉ ही प्रवेश परीक्षा द्यावी लागते. त्यासाठी ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज करण्याची प्रक्रिया चालू झाली असून बारावीनंतर एल एल बी (पाच वर्ष) अभ्यासक्रमासाठी दि. ९ जानेवारी २०२६ ते दि. २४ जानेवारी २०२६ या कालावधीत तर पदवी नंतर एलएलबी (तीन वर्ष) अभ्यासक्रमासाठी दि. ८ जानेवारी २०२६ पासून सुरू झाली असून दिनांक २३ जानेवारी २०२६ पर्यंत ऑनलाइन प्रवेश परीक्षा अर्ज भरता येतील. इच्छुक विद्यार्थी वेबसाइटला भेट देऊन ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज भरू शकतात. बारावीनंतर एलएलबी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ८ मे २०२६ रोजी तर पदवी नंतर एलएलबी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा १ ते २ एप्रिल २०२६ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

बऱ्याच विद्यार्थ्यांना विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा असते हे माहिती नसल्यामुळे ते प्रवेशापासून वंचित राहतात. तरी जास्तीत जास्त विदयार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा व आपले करिअर निश्र्चित करावे असे आवाहन दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूनम नाथानी यांनी केले आहे.


**नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लि.**

साईनगर, रांजणी, ता. कळंब जि. धाराशिव
फोन नं . (०२४७३) २६५५०५.
ईमेल : naturalgadgmail.com,/ web : www.naturalsugar.in
CIN-U72214MH1998PLC121048

**जाहीर निवेदन**

या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, कै. बिडवे शामल हानुमंत रा. पिंपळगांव अंबा, ता. व जि. लातूर यांचेकडून आमच्या कारखान्याचे भाग प्रमाणपत्र क्र. ०६३८२ डिस्टिंक्टिव्ह नं. ६३८१०१ ते ६३८२०० हरवलेले आहे. कै. बिडवे शामल हानुमंत हे मयत झाल्यामुळे त्यांचे मुलाने श्री. बिडवे हरीदास हानुमंत यांनी कारखान्याकडे डुप्लिकेट भाग प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

तरी वरील प्रमाणपत्र सापडले असल्यास त्वरित कारखाना कार्यालयात जमा करावे किंवा त्या प्रमाणपत्रा बाबत कोणाची काही तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत खालील पत्त्यावर आपली तक्रार लेखी स्वरुपात पाठवावी, याची माहिती सर्वांना व्हावी म्हणून ही जाहीर नोटीस दिलेली आहे. त्यानंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही व त्यास कारखाना बंधनकारक राहणार नाही. त्यानंतर सदरील अर्जदाराला डुप्लिकेट भागप्रमाणपत्र दिले जाईल, याची नोंद घ्यावी.

: ठिकाण :
साईनगर, रांजणी.
: दिनांक :
१०/०१ /२०२६

कंपनी सेक्रेटरी
नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज,लि. साईनगर, रांजणी
ता. कळंब, जि. धाराशिव
फोन नं. : (०२४७३) २६५५०५.